- दृष्टिकोनांमधील टर्नर व गीर्ट्झ यांच्या योगदानाचे मूल्यमापन करणे

## ३.१ प्रतिकात्मक आणि व्याख्यात्मक मानवशास्त्र (SYMBOLIC AND INTERPRETIVE ANTHROPOLOGY)

संस्कृती व्यक्तिपुरतीच मर्यादित असते असे प्रतिकात्मक आणि व्याख्यात्मक मानवशास्त्राच्या सिद्धांतामध्ये गृहित धरले जाते. व्यक्तीला घटनांचे व त्याच्या सभोवतालच्या वस्तूंचे जसे आकलन होते त्यालाच हा सिद्धांत संस्कृती मानतो. समाजात सुप्रस्थापित झालेल्या संकेत व प्रतिकांच्या अनुषंगाने लोक आपले वर्तन करत असतात आणि त्यांना येणाऱ्या अनुभवांचेही ते त्यानुसारच अर्थ लावतात. त्यामुळे लोक आपल्या वास्तवाचा कसा अर्थ लावतात व हे वास्तव त्यांच्या सांस्कृतिक प्रतिकांमधून कसे व्यक्त होते याचे विश्लेषण करणे हा प्रतिकात्मक आणि व्याख्यात्मक मानवशास्त्राचा उद्देश असतो. केवळ भव्यदिव्य सिद्धांत न मांडता मानवशास्त्राचा कल संस्कृती व अर्थगर्भतेकडे वळविणे ही प्रतिकात्मक मानवशास्त्राची प्रमुख उपलब्धी आहे.

## ३.२ प्रतिकात्मक आणि व्याख्यात्मक मानवशास्त्राचा उगम

**व्हिक्टर टर्नर, क्लिफर्ड गीर्ट्झ व डेव्हिड स्नेईडर** शिकागो विद्यापीठात अध्यापन करत होते तेव्हा १९६० च्या दशकात प्रतिकात्मक आणि व्याख्यात्मक मानवशास्त्राचा उगम झाला. प्रतिकात्मक आणि व्याख्यात्मक मानवशास्त्र भौतिकी विज्ञानाप्रमाणे अनुभवजन्य भौतिक घटनांच्या अभ्यासाच्या मॉडेलवर आधारित नसते तर, त्याचा आधार साहित्यिक असतो. याचा अर्थ प्रतिकात्मक व व्याख्यात्मक मानवशास्त्रज्ञ प्रत्यक्ष जागेवर जाऊन अभ्यास करत नाहीत, असा मुळीच नाही. याचा अर्थ एवढाच की, हे शास्त्र आपल्या अभ्यासासाठी मानवशास्त्राखेरीज अन्य साहित्याचा प्रामुख्याने आधार घेते. प्रतिकात्मक व व्याख्यात्मक मानवशास्त्रज्ञ संस्कतीला एक मनसिक स्थिती मानतात. संस्कृतीची गणित किंवा तर्कशास्त्राप्रमाणे मुद्देसूद मांडणी करता येते, हा विचार त्यांना मान्य नाही. एखाद्या संस्कृतीमधील प्रतिकात्मक क्रियांचा अभ्यास करण्यासाठी ते मानसशास्त्र, इतिहास आणि साहित्यांमधील विविध गोष्टींचा साधन म्हणून वापर करतात. ही पद्धत वस्तुनिष्ट नाही, अशी टीका केली जाते. या पद्धतीने अभ्यास करणारा घटना व प्रतिकांना आपल्याला हवा तसा व हवा तेव्हा अर्थ लावू शकतो, असा टिकाकारांचा आक्षेप आहे. अशी टीका होत असूनही या प्रतिकात्मक व व्याख्यात्मक मानवशास्त्राने, मानवशास्त्रज्ञांना, आपण ज्या सांस्कृतिक साहित्याचा अर्थ लावत आहोत व त्यातून जे संस्कृतीवर्णनात्मक साहित्य तयार करत आहोत त्याचे भान राखणे  भाग पाडले आहे. आंतर-सास्कृतिक व्याख्याकार म्हणून काम करताना मानवशास्त्रज्ञांना आपल्या स्वत:च्या मनातील सांस्कृतिक पूर्वग्रह व ज्यांचा अभ्यास करायचा त्या अन्य संस्कृतींविषयी जाणीव असणे गरजेचे असते.

## ३.३ प्रतिकात्मक व व्याख्यात्मक मानवशास्त्रातील विचारप्रवाह (SCHOOLS OF THOUGHT)

प्रतिकात्मक व व्याख्यात्मक मानवशास्त्रात दोन प्रमुख विचारप्रवाह आहेत. यापैकी **ब्रिटीश विचारप्रवाहाला,** समाज आपला एकजिनसीपणा कसा टिकवून ठेवतो हे जाणून घेण्यात स्वारस्य आहे. **व्हिक्टर टर्नर व मेरी डग्लस** हे या विचारप्रवाहाचे मुख्य प्रवर्तक होते. **दुसरा विचारप्रवाह अमेरिकी आहे.** यात व्यक्तीची आत्मनिष्ठता व कृती यावर तिच्या विचारांचा कसा प्रभाव पडतो, याच्या अभ्यासावर मुख्यत: भर दिला जातो. (जॉन्सन २०१३: ८४२). **क्लिफर्ड गिर्ट्झ व शेरी ऑर्टनर** हे या वैचारिक पंथाचे मुख्य संस्थापक मानले जातात. खास करून क्लिफर्ड गिर्ट्झ यांची 'भरदार वर्णना'ची शैली (Thick Description) हे प्रतिकात्मक व व्याख्यात्मक मानवशास्त्राचे एक मुख्य योगदान आहे. मानवी वर्तनाचे सांकृतिक महत्व समजून घेण्याचे अंतिम उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून त्या वर्तनाचे भरदार वर्णन व स्पष्टिकरण करण्यास या विचारशैलीत प्रोत्साहन दिले जाते. गिर्ट्झ यांनी ही संकल्पना ऑक्सफर्डचे एक तत्वचिंतक गिल्बर्ट रायले यांच्याकडून घेतली. डोळे मिचकावणे व डोळ्यांची उघडझाप यातील फरक लक्षात घेणे हे 'भरदार वर्णना'चे उत्तम उदाहरण आहे. डोळ्यांची उघडझाप होणे ही एक आपोआप घडून येणारी अनैश्चिक अशी क्रिया असते, तर डोळे मिचकावणे ही क्रिया मुद्दाम केलेली असते. या दोन्ही क्रिया वरकरणी सारख्या दिसत असल्या तरी त्यातून ध्वनित होणारा अर्थ वेगळा असतो. डोळ्यांच्या उघडझापीतून ती व्यक्ती कोणताही संकेत देत नसते. पण डोळे मिचकावणारी व्यक्ती एक प्रकारे गोपनीयतेचा संकेत देत असते. त्यामुळे मानवी क्रियांचा वरकरणी अभ्यास करणे (Thin Description) आणि अर्थगर्भ अभ्यास करणे (Thick Description) यात हा फरक आहे.

**तुमची प्रगती तपासा**

**१. प्रतिकात्मक आणि व्याख्यात्मक मानवशास्त्र उग**माची आढावा घ्या.?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## ३.४ प्रतिकात्मक मानवशास्त्र

एडवर्ड टेलर यांना मानवशास्त्रातील १९ व्या शतकातील अग्रदूत मानले जाते. शब्दांच्या प्रत्यक्ष उचारण्याने जे विचार थेट व्यक्त होते नाहीत त्यांचा शोध त्या शब्दांच्या प्रतिकात्मक वापरातून शोधण्याचे तंत्र टेलर यांनी विकसित केले. भाषा किवा प्रतिकात्मक संवाद हा मानवी प्रतिभेचा सर्वोच्च आविष्कार आहे, असे टेलर यांचे मत होते. याच

आविष्काराने मानवी समाजाच्या सर्व जाती मानसिक ऐक्याने पस्परांशी जोडल्या गेल्या आहेत, असे ते मानत.

माणूस आपल्या मनातील विचार प्रतिकांमधून, वस्तूंमधून, शाब्दिक संवादातून किंवा लेखी स्वरूपात व्यक्त करत असतो. भाषा ही माणसाच्या प्रतिकात्मक संवादाचे प्राथमिक स्वरूप असते. तरी माणूस कला, नृत्य, संगीत, वास्तुकला, चेहºयावरील हावभाव, खाणाखुणा, देहबोली, पेहराव, कर्मकांड, धर्म, नातेसंबंध, राष्ट्रीयत्व, स्थानरचना व वस्तूसंग्रह याखेरीज इतर अनेक माध्यमांतूनही संवाद साधत असतो.

ज्यातून विचार, कल्पना किंवा भावना प्रगट होईल अशा कोणत्याही घटनेला, कृतीला किंवा वस्तूला माणूस आपापल्या परीने अर्थ देत असतो. म्हणूनच माणसाकडून अभिव्यक्तीसाठी केल्या जाणाऱ्या प्रतिकांच्या वापराचा अभ्यास करणे हा मानवशास्त्राचा एक महत्वाचा उद्देश ठरतो. माणूस ही प्रतिकांचा वापर करणारी कशी एक प्रजाती आहे हे सांगताना लेस्ली व्हाईट (१९४०) यांनी एका लेखात प्रतिके अर्थवाही होण्यात संदर्भ कसे महत्वाचे ठरतात, याचे विवेचन केले. अर्नेस्ट कॅसियर म्हणतात की,प्रतिकांच्या अन्योन्य संबंधांखेरीज सुसंबद्ध असा विचार अभिव्यक्त करणे अशक्य आहे. संबंध वेगळे करून त्यातील अमूर्त अर्थ शोधण्याची क्षमता मानवात आहे. उदाहरणार्थ भूमितीमध्ये सैधान्तिकदृष्ट्या सार्वत्रिक अशा आकृती संबंधांचा विचार केला जातो व त्यासाठी एक प्रतिकात्मक भाषा व प्रातिनिधिक स्वरूपाचा वापर केला जातो. असे असले तरी या अमूर्त पद्धतीचा वापर इमारत बांधकामातील समस्या सोडविण्यासाठी केला जाऊ शकतो. मानवी अनुभूतीचे प्रतिकात्मक स्वरूप कॅसियर असे स्पष्ट करतात:

''माणूस हा केवळ भौतिक जगातच नव्हे तर प्रतिकात्मक विशावातही राहात असतो. भाषा, मिथके, कला व धर्म हे विश्वाचे भाग आहेत. या विविध धाग्यांनी मानवी अनुभूतीचे गुंतागुंतीचे असे प्रतिकात्मक जाळे विणले जाते. मानवाच्या विचारांत आणि अनुभूतीत होणाऱ्या प्रगतीने या जाळ्याची वीण अधक घट्ट होत जाते.'' संस्कृती ही प्रतिके, अर्थ व मूल्यांच्या विशिष्ठ मांडणीने तयार होत असते हा दृष्टिकोन मानवशास्त्रज्ञांमध्ये विकसित होत गेल्यावर या दृष्टीने विचार करणाºया मानवशास्त्राच्या अनेक उपशाखा निर्माण झाल्या. अर्थवाचक मानवशास्त्र व प्रतिकात्मक मानवशास्त्र या त्यापैकी दोन उपशाखा आहेत. सैधान्तिक मतभेद असले तरी प्रतिके हा संस्कृतीचा मुख्य आधार आहे, यावर सर्व वैचारिक शाखांच्या मानवशास्त्रज्ञांमध्ये एकमत आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ कट्टर भौतिकवादी असलेल्या लेस्ली व्हाईट यांनीही लिहिले होते की, 'मानवी विश्व प्रतिकांचे विश्व आहे.' (१९४९:२२) तरीही प्रतिकांतून नेमका अर्थ कसा व्यक्त होतो याचा विचार तुलनेने कमी मानवशास्त्रज्ञांनी केला. यासाठी सापिर याचे उदाहरण देता येईल. त्यांनी एखाद्या वस्तूचे हुबेहूब चित्रण करणारी प्राथमिक प्रतिके (कुत्र्याच्या चित्राचा अर्थ 'कुत्रा' असाच होतो) व दुय्यम प्रतिके यांच्यातील फरक स्पष्ट केला. दुय्यम

प्रतिकाचे नेमके स्वरूप स्पष्ट करण्यासाठी त्यांनी इंग्रजीतील “The red, white, and blue stands for freedom” या वाक्याचा संदर्भ देऊन असे सांगितले की, या वाक्यातून व्यक्त होणाऱ्या प्रतिकात्मक अर्थाचा वाक्यातील शब्दांशी किंवा शब्दसमुहाशी थेट संबंध दिसत नाही. (१९२९:२११)

## ३.५ प्रतिकात्मक मानवशास्त्राचे स्वरूप

देवाण-घेवाणीची खुणा व प्रतिकांवर आधारित अशी जी पद्धत आहे त्यात माणूस हा संदेशवाहक असतो व त्याचा निर्माताही असतो. तसेच तो त्याचा उद्देशही असतो व उपयोगकर्ताही असतो असा विचार प्रतिकात्मक मानवशास्त्रात केला जातो. माववी कृती व वर्तनाचा तसेच त्याच्या विचार आणि मूल्यांचा तोच मुख्य आधार असतो. मानवाला प्रतिकात्मक जीवन जगणारी करणारी प्रजाती मानणाऱ्या मॉडेलवर संस्कृतीची प्रतिकात्मक थिअरी आधारलेली आहे. या उलट संस्कृतीच्या भौतिकवादी थिअरीमध्ये मानवाला मुख्यत: प्रतिके निर्माण करणारी प्रजाती मानले जाते. संस्कृतीच्या प्रतिकात्मक व्याख्येत संस्कृतीला अर्थाचे विज्ञान मानले जाते. माणसाला इतर माणसांशी व निसर्गातील अन्य गोष्टींशी येणाऱ्या संबंधांतून जे संकेत व संदेश मिळतात त्याचा अभ्यास प्रतिकात्मक मानवशास्त्रज्ञ करतात. चिन्हमीमांसेचा पाया घालणारे चार्ल्स पियर्स म्हणतात की, संपूर्ण ब्रह्मांड चिन्हांनी ओतप्रोत भरलेले आहे. प्राण्यांच्या सर्वच प्रजाती या ना त्या प्रकारच्या चिन्हे आणि प्रतिकांमधून आपसात संवाद साधत असल्याने प्रतिकात्मक मानवशास्त्रात केल्या जाणाऱ्या अभ्यासाची व्याप्ती सार्वत्रिक स्वरूपाची असते. माणसाचे बहुतांश ज्ञान, विचार, भावना व आकलन भाषेतून अभिव्यक्त होत असते. भाषा ही सुद्धा वस्तू व विचारांचे वर्गीकरण करून ते अर्थपूर्ण अशा प्रतिकात्मक स्वरूपात व्यक्त करण्याची पद्धत आहे. त्यामुळे प्रतिकांमागे दडलेल्या शब्दांचे काल्पनिक आकलन भाषेमुळे होते. भाषेमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रतिकात्मक शब्दांचे अर्थ ठराविक काळ व स्थळानुरूप ठरत असतात. ‘खगोलिय ग्रह’ (Planet) या शब्दाचा पहिल्या शतकात असलेला अर्थ विसाव्या शतकातील अर्थाहून निराळा आहे. भाषा व तिच्या विकासाचा अभ्यास केल्याने संस्कृतीकडे प्रतिकात्मक दृष्टीने पाहण्याचा आधार तयार होतो. मानवी व्यवहार आणि विचारांना आकार देणाऱ्या हेतू, अनुभव व ज्ञानाच्या गुंत्याची उकल करण्यासाठी प्रतिकात्मक मानवशास्त्रज्ञ भाषाशास्त्रातील तंत्राचा उपयोग करतात. त्यामुळे भाषाशास्त्र ही प्रतिकात्मक मानवशास्त्राची ऐतिहासिक अशी आधीची पायरी आहे. प्रतिकात्मक आणि अर्थवाचक मानवशास्त्रज्ञांच्या विचारांना दिशा देण्याचे महत्वाचे काम इमॅन्युएल काण्ट यांच्या तात्विक कल्पनांनी व लेवी-स्ट्राऊस यांच्या संरचनावादाने केले. काण्ट यांनी प्रतिकात्मक स्वरूपांचा एक सर्वसाधारण सिद्धांत विकसित केला. त्यांनी असे म्हणणे मांडले की, विचारांच्या गाभ्याहून पूर्णपणे स्वतंत्र अशी एक मुलभूत वैचारिक बैठक असते. काण्ट यांचा असा दावा होता की, वास्तविक विश्वाचे थेट आकलन करून घेण्याची क्षमता माणसात नाही. त्यांच्या मते शक्यता, अस्तित्व, गरज, वस्तुविषय, कारण, वेळ व स्थळ

यासारख्या विशुद्ध बौद्धिक संकल्पनांच्या मदतीने माणसाला बाह्य विश्वाचे ज्ञान करून घेण्याचे साधन उपलब्ध होते. काण्ट यांच्या मते माणसाला जेव्हा एखाद्या गोष्टीचे ज्ञान होते तेव्हा त्याचे मन त्या वस्तूनुरूप झालेले नसते तर ती वस्तू त्याच्या मनानुरूप झालेली असते. (एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका, १९८५, खंड २२: ४९३-४९४)

मानवी ज्ञान हे भाषा या प्रतिकरूपी पद्धतीत गुरफटलेले असते. शब्दांमधून ज्ञान मिळते आणि ज्ञान शब्दांमागे दडलेले असते. शब्द जेव्हा लिहिले जातात तेव्हा ती प्रतिके होतात आणि अशी प्रतिके ठराविक समाजांसाठी ठराविक काळात आणि ठरविक ठिकाणी योग्य ठरतात. ऐतिहासिक परंपरा आणि संवादाची ठराविक पद्धत असलेल्या समाजांनी विकसित केलेले ज्ञान अशा प्रतिकात्मक पद्धतींमधून व्यक्त होते. या प्रतिकांची चिकित्सा व्यक्तिंच्या व समाजांच्या पातळीवर केली जाऊ शकते.

बाह्य विश्व आणि त्याविषयीचा सापेक्ष दृष्टिकोन परस्परांत गुंतलेले असतात. बोधात्मक व प्रतिकात्मक दृष्टिकोनांमध्ये उद्देश आणि उद्दिष्ट एकरूप होतात. सांस्कृतिक प्रतिकांच्या एका पद्धतीत घटना, वस्तू व अनुभवांचे अर्थ गुंफलेले असतात. वस्तुस्थिती विशुद्ध अनुभव किंवा विशुद्ध घटनांप्रमाणे नसते. प्रतिकात्मक दृष्टिकोनातून संस्कृती हा ठोस वा वस्तुनिष्ठ वास्तवाचा व त्या वास्तवाच्या चेनतेस होणाऱ्या अनुभूतीचा अर्थपूर्ण पैलू असतो. व्हिक्टर टर्नर यांच्या मते प्रतिकात्मक मानवशास्ज्ञांचे दोन गटांमध्ये वर्गीकरण होते:

**१. भाषाशास्त्रज्ञ, संरचनावादी आणि बोधात्मक यारख्या अमूर्त पद्धतींचा अवलंब करणारा गट.** (हा गट औपचारिक चिकित्सेवर लक्ष केंद्रीत करतो व त्याला आशयाहून पद्धत व तर्क यात जास्त स्वारस्य असते.)

२. **दुसरा गट प्रतिके व सामाजिक घडामोडांचा अभ्यास करणाऱ्यांचा**. यात चिन्हमीमांसक व प्रतिकवादी मानवशास्त्रज्ञ, सामाजिक भाषाशास्त्रज्ञ, लोकसाहित्याचे अभ्यासक व साहित्यिक मिमांसाकारांचा समावेश होतो. (हा गट औपचारिक चिकित्सेला वस्तुविषय व आकलन तसेच अर्थ व सामाजिक कृतीचीही जोड देतो.)

**तुमची प्रगती तपासा**

**१. प्रतिकात्मक मानवशास्त्राचे स्वरूप** स्पष्ट करा.?

---

## ३.६ प्रतिकात्मक मानवशास्त्रावर व्हिक्टर टर्नर यांचे विचार

टर्नर याकडे लक्ष वेधतात की, चिन्हे ही अचूक संवादासाठी मुद्दाम तयार केलेली साधने असतात आणि म्हणूनच ती खास करून तांत्रिक, राजकीय आणि आर्थिक

यासारख्या सामाजिक क्रियांमध्ये महत्वाची भूमिका बजावतात. तंत्रज्ञनामध्ये यंत्रे चालविण्यासाठी संगणकाची कॅड/कॅम पद्धती असते. राजकारणात नेते व त्यांच्या धोरणांना देश पातळीवर पाठिंबा मिळविण्यासाठी त्या नेत्यांची चित्रे व पोस्टर यांचा वापर केला जातो. अर्थशास्त्रामध्ये अर्थव्यवस्थेचा विकास किंवा ऱ्हास दर्शविणारे निर्देशांक असतात. त्या निर्देशांकांनुसार बाजारांमधील उलाढालीला चालना मिळते किंवा खिळ बसते.

जेथे चिन्हे कृतीची दिशा ठरवितात तेथे त्या चिन्हांना एक सामाजिक संदर्भ असतो. त्यामुळे त्या चिन्हाला किंवा प्रतिकाला सामाजिक संदर्भानुरूप विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. कुंटुंब रचनेत 'Father' या शब्दाला एक अर्थ असतो तर कॅथॉलिक धार्मिक व्यवस्थेत त्याच शब्दाला निराळा अर्थ प्राप्त होतो. विविध मर्यादा व सामाजिक संदर्भांमध्ये वावरणाºया व्यक्तिंच्या कृतींच्या व वर्तनाच्या एकत्रीकरणातून समाज तयार होतो. चिन्हे व प्रतिके ही माणसाला चालना देणारे संकेतक असतात. मानवशास्त्राच्या प्रतिकात्मक दृष्टिकोनात माणसाच्या कृती व वर्तनाला अर्थ देण्याचे व त्यांची व्याख्या करण्याचे काम चिन्हे, प्रतिके व संदर्भ करत असतात. सामाजिक कृतीच्या ठराविक क्षेत्रात राहून प्रतिकांचा विचार करणे हे टर्नर यांचे योगदान आहे. तसेच ते त्यांच्या व्यवहारज्ञानाचेही ज्ञोतक आहे. एन्डेम्बू कर्मकांडाची चिकित्सा करताना ते म्हणतात:

*इतर घटनांच्या संदर्भात काळानुरूप विश्लेषणाखेरीज त्या कर्मकांडातील प्रतिकांचे विश्लेषण करणे शक्य नाही, असे मला आढळले. कारण प्रतिके ही सामाजिक प्रक्रियांवर ठरत असतात. अंतर्गत बदल आणि बाह्य वातावरणाशी जुळवून घेऊन व्यक्तींचे समूह सामाजिक प्रक्रियांच्या विविध टप्प्यांना ही कर्मकांडे कशी करतात हे पाहण्यासाठी मी आलो होतो. या दृष्टीने विचार करता या विधींची प्रतिके ही सामाजिक कृतीमधील एक घटक व कृतीमधील एक सकारात्मक शक्ती ठरतात. अशा प्रकारे ही प्रतिके माणसाच्या हिताशी, उद्देशांशी, अंतिम ध्येयाशी व त्याच्या प्राप्तीच्या माध्यमांशी निगडित होतात. मग त्यांची रचना मुद्दाम तशी केलेली असो किंवा दृष्य कृतीवरून त्यातून तसा अर्थ निघत असो. निदान केल्या जात असलेल्या कृतीच्या संदर्भात तरी त्या प्रतिकांची रचना व गुणवैशिष्ट्ये त्या गतीशील व्यक्तीशी निगडित असल्याचे भासते.* (१९६७:२०)

त्यामुळेच एखाद्या शाळेच्या मैदानातील ध्वजस्तंभावर फडकणारा अमेरिकेचा राष्ट्रध्वज, एखाद्या शेवरलेट व्हॅनच्या पाठीमागच्या बाजूस लटकणारा राष्ट्रध्वज आणि युद्धात मारल्या गेलेल्या सैनिकाच्या शवपेटिकेस गुंडाळलेला राष्ट्रध्वज एकच असला व त्याची दृष्य प्रतिमा एकच असली तरी त्यातून स्थलकाळानुरूप निरनिराळे अर्थ ध्वनित होतात.

कर्मकांडांमधील प्रतिकांसह सांस्कृतिक प्रतिके, चिरकाल टिकणारी नसतात तर, सामाजिक संबंधांमध्ये होणाऱ्या सांसारिक बदलांच्या प्रक्रियांमधून ती जन्माला येतात व त्यामुळेच त्या प्रक्रिया टिकून राहतात, असे टर्नर मानतात. (१९७४:५५) प्रतिकांमध्ये काही मुलभूत गुणवैशिष्ट्ये सामायिक असतात. प्रतिकांमध्ये संक्षेप रूपाने अर्थ ठासून

भरलेला असतो. प्रतिकांची एकच रचना अनेक गोष्टी व कृतींचे प्रतिनिधित्व करत असते. (टर्नर १९६७:२८) उदाहरणार्थ टर्नर चिशिंगा एन्डेम्बु येथील शिकाऱ्यांच्या मंदिराशी निगडित गोष्टींतून व्यक्त होणाऱ्या अर्थाची चिकित्सा करतात. त्या मंदिरात जमिनीवर फक्त एक दुहेरी टोक असलेली काठी ठेवलेली असते. तिच्या खालच्या टोकाशी वाळणीच्या वारुळातील मातीचा आयताकृती तुकडा व गवताची विणलेली दोरी ठेवलेली असते. टर्नर यांच्या मते या वस्तूंशी निगडित प्रतिकांमधून शिकाऱ्यांमधील आपसातील सामाजिक संबंध, शिकाऱ्याचे निकटचे कुटुंबिय व त्या कुटुंबाची महिला प्रमुख, शिकाऱ्याची शारीरिक व मानसिक मजबुती, शिकाऱ्याच्या मनातील पूर्वजांविषयी दयाबुद्धी, प्रजननक्षमता, शस्त्रे वापरण्यातील कौशल्य व शिकार केलेल्या प्राण्याच्या मांसाचे रास्त पद्धतीने वाटप केले जाणे असे १५ निरनिराळे अर्थ काढले जाऊ शकतात. टर्नर म्हणतात, 'कर्मकांडाशी संबंधित प्रतिकांच्या समन्वयक व उठावदार अभिव्यक्तीचे हे एक उदाहरण आहे. यावरून असे म्हटले जाऊ शकते की, प्रतिक जेवढे जास्त अर्थवाही असेल तेवढे त्याचे स्वरूप साधे, सोपे असते. (१९६७:२९८) ख्रिश्चन लोकांच्या क्रुसामध्ये (Cross) असमान लांबीचे व लंबरेषेत बसविलेले लाकडाचे दोन तुकडे असतात. परंतु त्याच्यातून व्यक्त होणाऱ्या सुस्पष्ट अर्थाचा क्षणभर विचार केला तरी टर्नर यांच्या या म्हणण्यातील सत्यता पटते. म्हणूनच प्रतिके ही बहुआयामी असतात व त्यांच्यातून अनेक अर्थ निघू शकतात. परंतु त्या अर्थांमध्येही दोन परस्परविरोधी टोके असतात. एका टोकाला मानसिक व नैसर्गिक अवस्थेशी निगडित अर्थ असतात तर दुसऱ्या टोकाचे अर्थ सामाजिक संबंधांविषयी माहिती देणारे असतात. उदाहरणार्थ अमेरिकेच्या राष्ट्रध्वजातील लाल रंग हा काहीवेळा देशाच्या रक्षणासाठी बलिदान दिलेल्यांनी सांडलेल्या रक्ताचे प्रतिक मानला जातो, ध्वजावरील आडवे पट्टे हे मूळ १३ वसाहती दर्शवतात व संपूर्ण ध्वज मिळून राष्ट्रभक्ती व देशाप्रती आदराची भावना मनात जागवितो.

परंतु महत्वाचा मुद्दा असा की, प्रतिके ही बहुआयामी व अर्थांने ठासून भरलेली असली तरी ती निरनिराळ्या लोकांशी निरनिराळ्या पद्धतीने संवाद साधू शकतात. सामाजिक प्रक्रियांमधील बदलांनुरूप अर्थाची रचना व फेररचना होत असते. या संकल्पनेचे सैधान्तिक परिणाम खूप गहन स्वरूपाचे होतात. अनेक मानवशास्त्रज्ञांनी म्हटल्याप्रमाणे प्रतिके ही संस्कृतीची कुंजी असेल व टर्नर सूचवितात त्याप्रमाणे प्रतिके ही एकाच वेळी परस्परविरोधी अर्थ ध्वनित करणाऱ्या सामाजिक स्थित्यंतरांतून निर्माण होत असतील तर, अशा गतिशील संदर्भांतून संस्कृतीचा एखादा पैलू किंवा सामाजिक रचनेचा बोध कसा बरे करून घेता येऊ शकेल? सामाजिक जीवनाचे स्वरूपच मुळात स्थिर, एकरूप व गतिहीन नव्हे तर अनिश्चित, विरोधाभासी व गतिशील असताना सांस्कृतिक आकृतीबंधांतून सामाजिक स्थैर्य निर्माण होऊ शकते (रॅडिक्लिफ-ब्राऊन) किंवा त्याने दृष्य अशा मानवी गरजांची पूर्तता होऊ शकते, यावर कोणाही का बरं विश्वास ठेवावा?

टर्नर यांच्या या चिंतनाने २० व्या शतकातील मानवशास्त्रीय विचाराच्या गाभ्याला स्पर्श केला गेला. संस्कृतीचे अस्तित्व अनुभवाच्या स्वरूपात असते व प्रत्यक्ष आचरणाने ती

आकाराला येत असते. यातून कामगिरीवर आधारित मानवशास्त्राचा उदय झाला व त्यात निव्वळ सामाजिक रचनेऐवजी प्रत्यक्ष कृतीचा विचार करणे सुरु झाले.(जसे कला किंवा कौशल्याच्या सादरीकरणामागील कृती किंवा सराव)

**तुमची प्रगती तपासा**

**१. व्हिक्टर टर्नर यांचे प्रतिकात्मक मानवशास्त्राचे विचार** स्पष्ट करा.?

______________________________________________

______________________________________________

________________________________________

## ३.७ प्रतिकात्मक मानवशास्त्रातील एक घटना चिकित्सा (CASE STUDY)

लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमधील मानवशास्त्राच्या प्राध्यापक मेरी डग्लस यांनी 'लेले' (The Lele) या प्राचीन मानवी समुहातील सामाजिक व धार्मिक प्रतिकात्मकतेवर बरेच लिखाण केले आहे. इतर अनेक प्राचीन लोकांप्रमाणे 'लेले' या मानवी समुहाचे कोणतेही पद्धतशीर धर्मशास्त्र नव्हते किंवा ज्यावरून त्यांच्या धर्माचा अभ्यास करता येईल अशी व्यवस्थित मांडणी केलेली कोणतीही धार्मिक शिकवणही नव्हती. काही मानवी समाजांच्या बाबतीत असे गोंधळात टाकणारे नाना प्रकारचे निषेध-नियम नेहमीच पाळले गेल्याचे दिसून येते. परंतु त्यांच्या कर्मकांडांमागील अर्थ समजून घेण्यासाठी त्यांची औतित्याविषयी कल्पना, त्यांचे स्त्रीत्व व पुरुषत्वाविषयीचे आदर्श व व्यक्तिगत शुचितेविषयीचे निकष आपल्याला जाणून घ्यावे लागतात.

हा 'लेले' मानवी समूह मक्याची शेती करायचा, शिकार करायचा, जाडीभरडी वस्त्रे विणायचा व ताडवर्गीय झाडांपासून मदिरा तयार करायचा. हे लोक सर्व कामांमध्ये शिकार करणे सर्वाधिक प्रतिष्ठेचे मानायचे. त्यामुळे त्यांची सांस्कृतिक प्रतिके प्राणीजीवन आणि त्याचे माणसाशी नाते व पशु-पक्ष्यांच्या विविध जातींमधील आपसातील संबंध यावर मुख्यत: आधारलेली असणे आश्चर्याचे नव्हते. ते शिकारी होते तरी या पृथ्वीतलावरील अन्य सजीवांविषयी त्यांच्या मनात सहानुभूतीची भावनाही होती, हे त्यांच्या प्रतिकांवरून ध्वनित होते.

माणूस आणि अन्य प्राणी यांच्यात एका बाबतीत मूलभूत फरक असल्याची जाणीव या 'लेले' लोकांना होती. त्याला ते 'बुहोन्यी' (म्हणजे लज्जा, बुजरेपणा व विनयशीलता) असे म्हणत. कुत्रा हा त्याच्या मालकाच्या कुटुंबासोबत राहतो पण तो माणसाकडून 'बुहोन्यी'चा गुण कधीही घेत नाही म्हणून कुत्रा हा सर्व प्राण्यांमध्ये सर्वात जास्त निर्लज्ज प्राणी असल्याचे ते मानत.

या 'लेले' लोकांच्या मते 'बुहोन्यी' म्हणजे औचित्याचे भान असणे. कोणीही सुसंस्कृत व्यक्ती इतरांच्या अनुचित वर्तनावर जी प्रतिक्रिया देईल त्यालाही 'बुहोन्यी' असे

म्हणता येईल. त्यांच्या दृष्टीने सर्व सामाजिक संबंधांचा तो नैतिक मापदंड होता. अर्भकांमध्ये हा गुण उपजत असण्याची अपेक्षा नसल्याने बालवयातील संस्कारांनी मुलांमध्ये ही 'बुहोन्यी'ची भावना बाणविण्याची त्यांची प्रथा होती. 'लेले' समाजाच्या दृष्टीने सन्मान्य व उदार वर्तनाचे 'बिहोन्यी' हे एका शब्दाचे नैतिक सूत्र होते. त्यामुळे प्रतिकात्मक मानवशास्त्रज्ञ मानवी वर्तनाचे बारकावे समजून घेण्यासाठी त्यांची भाषा व प्रतिकांचा अभ्यास करतात. यातून व्यक्त होणाऱ्या निश्चित अशा अर्थावर मानवी समुहांची सामाजिक वर्तनाची प्रक्रिया व व्यक्ती-व्यक्तिंमधील संबंध ठरत असतात.

## ३.८ व्याख्यात्मक दृष्टिकोन (INTERPRETATIVE APPROACH)

सांस्कृतिक मानवशास्त्रात मानवी वर्तनाची साधी, सरळ स्पष्टिकरणे शोधण्याचे धोरण अवलंबिले जाते. मात्र मानवीय किंवा व्याख्यात्मक मानवशास्त्रात मानवी कृतींच्या व्याख्या करून त्यातून ध्वनित होणारा अर्थ शोधला जातो. यात मानवशास्त्राच्या अभ्यासासाठी विज्ञानाऐवजी मानवी व्यवहारांची चिकित्सा करण्याचे मॉडेल वापरले जाते. यात कलांमधील यंत्रशास्त्र व जैविक रचनांच्या अभ्यासाऐवजी नाट्यकला व साहित्यामधून सदृश्यता शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

मानवीय मानवशास्त्राची अभिमुखता मानसिकतेवर आधारित असते. त्यात संस्कृतीकडे कल्पना, मूल्ये व एक अर्थगर्भ व्यवस्था म्हणून पाहिले जाते. व्याख्यात्मक किंवा मानवीय मानवशास्त्रात कारणवाचक स्पष्टिकरण त्याज्य मानले जाते व मानवी व्यवहार आणि लेखी साहित्यातून अर्थ शोधण्याचा दृष्टिकोन स्वीकारला जातो.

व्याख्यात्मक मानवशास्त्रात लोक कसे वागतात याकडे जेवढे पाहिले जाते त्याहून अधिक लक्ष समाजात वावरत आसताना लोकांच्या कृतीतून आणि वर्तनातून काय अर्थ काढला जातो याकडे दिले जाते. हे अर्थ मूल्ये, नियम व नियमावलीच्या निदर्शक अशा प्रतिकांमधून शोधले जातात. या दृष्टिकोनात जगातील भौतिक गोष्टी पूर्णपणे नाकारल्या जात नाहीत. पण समाजात राहणारा माणूस समाजाने निर्माण केलेल्या संस्थाकडे कसे पाहतो व त्यांचे पालन कसे करतो हे समजून घेण्याने माणसाचे भौतिक व सामाजिक विश्व अधिक चांगल्या प्रकारे समजू शकते, असे हा दृष्टिकोन मानतो. स्थानिक लोक त्यांच्या सामाजिक व्यवस्थेकडे कसे पाहतात याचे आकलन करणे हे मानवशास्त्रज्ञांचे काम असते.

## ३.९ क्लिफर्ड गीर्ट्झ

क्लिफर्ड गीर्ट्झ यांना मानवशास्त्रातील व्याख्यात्मक दृष्टिकोनाचे संस्थापक नव्हे तरी सैधान्तिक नेते तरी मानावेच लागेल. त्यांचा असा ठाम विश्वास होता की, अनुभवजन्य व तपासून बघता येऊ शकणाऱ्या माहितीच्या आधारे तयार केलेले नियम व अनुमाने यावर आधारित असलेल्या अन्य भौतिक विज्ञानाच्या शाखांप्रमाणे मानवशास्त्र हे विशुद्ध विज्ञान कधीच होऊ शकत नाही. मानवशास्त्र वास्तवावर आधारित हवे हे मान्य, पण मानवशास्त्रात

या वास्तवातून भाकिते करण्यापेक्षा अर्थ काढले जायला हवेत, असे गीर्ट्झ मानत. सामाजिक चिकित्सेसाठी ठराविक मॉडेलचा वापर केल्याने त्यातील जिवंतपणा नाहिसा होतो. त्यामुळे मानवशास्त्रात अधिक मानवीय विद्याशाखांचा, वर्णनांचा, काव्यात्मकतेचा, साहित्याचा, मिथकांचा, प्रतिकांचा व ज्यामुळे माणसाचे अन्य प्राण्यांहून वेगळेपण दिसते अशा सर्व गुणविशेषांचा वापर केला जायला हवा, असा गीर्ट्झ यांचा आग्रह असे. मानवीय विज्ञान हे नैसर्गिक विज्ञानाच्या अन्य शाखांहून वेगळे आहे, हा विचार मांडणारे गीर्ट्झ हे काही पहिले नव्हते. त्यांच्याआधी रिकेट आणि डिथे (विल्क १९८४: १७६) यांनीही असा विचार मांडला होता की, मानवी व्यवहारांचा अभ्यास अमूर्त व सरधोपटपणे न करता ऐतिहासिक आणि अन्योन्यदर्शी पद्धतीने केला जायला हवा. अन्योन्यदर्शी अभ्यासाची एक ठराविक आणि वेगळी अशी पद्धत असते. हा अभ्यास प्रत्यक्ष अनुभवांतून केला जात असल्याने त्यात सामाजिक जीवनातील सर्व गुंतागुंत व विविधता प्रतिबिंबित होते. रुथ बेनेडिक्ट (१९३४) व त्यांचे बौद्धिक गुरु फ्रान्झ बोआस यांनीही अन्योन्यदर्शी अभ्यासाचे महत्व विषद केले होते. बेनेडिक्ट याचे असे मानणे होते की, दोन संस्कृतींची तुलना केल्याने व सरधोपट अनुमाने काढल्याने त्या दोन संस्कृतींमध्ये असणाऱ्या खंडत्वाकडे दुर्लक्ष होते.

जर्मन तत्वज्ञांना असे वाटे की, माणसाकडे भाषेची व ज्ञानसंपादनाची क्षमता असल्याने मानवी समाजांच्या अभ्यासासाठी अन्य नैसर्गिक घटनांहून वेगळ्या पद्धती, तंत्रे व दृष्टी वापरायला हवी. गीर्ट्झ व अन्य मानवीय मावशास्त्रज्ञ हा विचार मानणारे होते. माईल्स रिचर्डसन तर व्याख्यात्मक मानवशास्त्र हे मानवतेचे विज्ञान असल्याचे सांगतात. त्यांच्या मते व्याख्यात्मक मानवशास्त्रात संस्कृतीकडे प्रतिक म्हणून व सामाजिक संबंधाची संकल्पना या दोन्हींचा मिलाफ करून पाहिले जाते. मानवी वर्तनामागील कारणे शोधण्याने जीवनातील खरा चमत्कार हरविला जातो.

गीर्ट्झ सांस्कृतिक संदर्भांकडे सर्वसाधारण विधाने म्हणून पाहात नाहीत, तर माणसाकडून दैनंदिन व्यवहार करत विणले जाणारे एक गुंतागुंतीचे जाळे म्हणून पाहतात. जगाकडे केवळ कारण आणि परिणामांच्या दृष्टिकोनातून पाहण्याने माणसामधील माणूसपण दिसत नाही, असे ते मानतात. जीन पॉल सार्त यांनीही अस्तित्वाच्या भौतिकवादी आधाराकडे दुर्लक्ष न करता सामाजिक चिकित्सा करताना माणसाच्या दैनंदिन व्यवहारांना महत्व देण्याच्या अस्तित्ववादी सिद्धांतात हाच विचार मांडला होता.

गिर्ट्झ यांनी एकाच केस स्टडीला दिलेले महत्व त्यांच्या पूर्वसूरींहून वेगळे नाही. बोआस, मॅलिनोवस्की व रॅडक्लिफ-ब्राऊन यांनीही मानवी समाजाच्या कार्यकलापांचे आकलन करून घेण्यासाठी एखाद्या संस्कृतीचा सखोल अभ्यास करण्याची पद्धतच अवलंबिली होती. तसेच कोणत्याही समाजातील रीतीरिवाजांचा अर्थ स्थानिक लोकांच्या दृष्टिकोनातूनच पाहायला हवा, हे गिर्ट्झ यांचे म्हणणेही मानवशास्त्रातील पूर्वीच्या परंपरेला सोडून नाही. एका ठराविक वांशिक परंपरांवर लक्ष केंद्रित करण्यास नकार देणे व सर्व

संस्कृतींचा एकात्मिक पद्धतीने विचार करण्याचा आग्रह धरणे हाही इतरांच्या संस्कृतीकडे स्थानिकांच्या दृष्टीने पाहण्याच्या दृष्टिकोनाचाच भाग आहे. बोआस यांच्या मानवशास्त्रातील हाच एक भक्कम घटक आहे.

प्रतिमांच्या अर्थाकडे स्थानिकांच्या दृष्टीने पाहण्याचा गीर्ट्झ यांचा हा दृष्टिकोन स्पष्टपणे सापेक्षीय आहे. त्यामुळे मानवशास्त्रज्ञ इतरांच्या दृष्टिकोनाविषयी संवेदनशील होतो. पण यात शून्यवाद किंवा काहीही खपवून घेणे मान्य नाही. त्याउलट गीर्ट्झ पाहणारा आणि तो ज्यांना जाणून घेऊ इच्छितो ते इतर यात स्पष्ट फरक करण्यासाठी गीर्ट्झ स्व-ज्ञान, स्व-जाणीव व स्व-बोध याचा आधार घेतात. गीर्ट्झ कोणत्याही ठराविक गोष्टीचा अभ्यास करताना त्याविषयीच्या स्थानिकांच्या ज्ञानापासून सुरुवात करतात व त्याला साक्षी म्हणून स्वत:च्या ज्ञानाची जोड देतात.

साहित्य किंवा कलांमध्ये ज्याप्रमाणे व्यक्तीचे स्वत:चे व्यक्तिमत्व व मानवी वर्तनातील गुंतागुंत यांच्यातील वेगळेपणा कायम ठेवला जातो तसाच दृष्टिकोन गीर्ट्झ ठेवत असल्याने त्यांचा मानवशास्त्रीय अभ्यास मानवीय तसेच व्याख्यात्मकही ठरतो. अमूर्त सैधान्तिक मांडणीने एरवी माणसाच्या मनाचे जे कंगोरे दुलर्क्षित राहतात ते कथा-कादंबरी, नाटक, चित्रकला किंवा काव्यात अचूकपणे अभिव्यक्त होत असतात. ते स्वत:च्या मानवशास्त्रास कृतिशील शब्दार्थमीमांसा मानतात.

## ३.१० गीर्ट्झ यांच्या व्याख्यात्मक दृष्टिकोनावरील टिका

मानवशास्त्रात सैधान्तिक अभ्यास व एखाद्या गोष्टीची ठोस मीमांसा या दोन्हींना वाव आहे, हे बहुतेक सर्वच मानवशास्त्रज्ञ मान्य करतात. मात्र माझाच दृष्टिकोन इतरांहून सरस असल्याचा दावा गीर्ट्झ करतात तेव्हा मतभेद निर्माण होतात. गीर्ट्झ स्वत:च्या दृष्टिकोनास अधिक मानवीय मानतात. याचा प्रतिवाद करताना शान्कमन म्हणतात की, कोणत्याही दृष्टिकोनाच्या श्रेष्ठत्वचा निकष त्याच्यामुळे एखाद्या दृकघटनेचे आकलन इतरांहून अधिक चांगले होऊ शकते का, हा असायला हवा.

गीर्ट्झ यांच्या व्याख्यात्मक मानवशास्त्रातील दोन गृहितांना आव्हान दिले जाऊ शकते. माणसाच्या संस्कृतीचे खरे मर्म तिच्यातील प्रतिकांमधूनच प्रकट होते. याच्या विरोधात असे म्हणता येईल की, फॅसिझम, गर्भलिंगचिकित्सा आणि वंशकेंद्रित अंधश्रद्धा यासारख्या माणुसकीस कमीपणा आणणाऱ्या गोष्टींच्या समर्थनार्थ नव्हे तर विरोधातच नेहमी वैज्ञानिक सिद्धान्त व माहितीचा वापर केला गेला आहे. स्वत:च्या कृतींमधून, कल्पनांमधून व मूल्यांमधून ध्वनित होणाऱ्या प्रतिकात्मक महत्वाविषयी लोक अनभिज्ञ असतात, असाही प्रतिवाद केला जाऊ शकतो. त्यामुळे स्थानिकांच्या माहितीवर आधारित व्याख्यात्मक दृष्टिकोन व वैज्ञानिक निरीक्षणाची मॉडेल या दोन्हींचा मिलाफ केल्यानेच संस्कृतीचा कोणताही अभ्यास अधिक प्रगल्भ होत असतो.

गिर्ट्झ यांच्या लिखाणात या गोष्टीवर नेहमीच भर दिला गेला की, व्यक्तींहून वेगळी अशी संस्कृती व सामाजिक संघटना अस्तित्वात नसते. आपल्याला संस्कृती व सामाजिक संघटना म्हणून जे दिसते ते व्यक्तींना त्यांच्या सभोवतालच्या घटना व वस्तूंचे त्यांच्या नजरेतून झालेले आकलन असते. सामाजिक व्यवस्था वस्तुनिष्ठ व सापेक्ष अशा दोन्ही प्रकारची आसते. तिचे स्वरूप व्यक्तिगत मूल्ये व प्रेरणांवर ठरत असते. तरीही त्यांची अभिव्यक्ती सार्वजनिक प्रतिके व संवादातून होत असते, ही कल्पना गिर्ट्झ यांनी जोरदारपणे मांडली.

गिर्ट्झ यांच्या या विचारांची तुलना हेईडेगर (१९२७) यांच्या विचारांशी करणे उपयुक्त ठरेल. सत्य हे माणसाच्या जगाशी येणाऱ्या संपर्कातून व्यक्त होत असते, असे हेईडेगर मानत. त्यांच्या मते व्याख्यात्मक चिकित्सा हा जग समजून घेण्याचा मार्ग नाही. माणसाचे मूळ स्वरूप जाणून घेण्यानेच जगाची खरी ओळख होऊ शकेल. कोणत्याही गोष्टीची व्याख्या करणे हे एक साधन नाही तर तो माणूसपणाचा मूळ गाभा आहे. ते असे मानत की, पाहणाऱ्या व्यक्तीला पाहायच्या गोष्टीपासून पूर्णपणे अलिप्त राहणे शक्य नाही. या मतानुसार ज्ञानोपासनेला संस्कृती, संदर्भ व इतिहासाच्या मर्यादा असतात.

गेडॅमर (१९७५) यांनी आग्रहपूर्वक असे प्रतिपादन केले की, डेस्कार्टेस म्हणतात त्याप्रमाणे मानवी चेतना कधीच निर्विकार राहू शकत नाही. आपल्या प्रवृत्ती व भाषा, सांस्कृतिक संकेत आणि पद्धतींच्या गुफणीतून चेतनेचा हळूहळू विकास होत असते. सामाजिक विज्ञानातून माणसाला त्याच्या संस्कृतीत जखडलेल्या संदर्भांच्या पलिकडे नेऊन स्वत:ला आहे तसे पाहणे शक्य नाही, असे गेडॅमर यांचे मत होते. हेईडेगर व गेडॅमर यांचे हे विचार गिर्ट्झ यांच्या मानवशास्त्रीय दृष्टिकोनातही पाहायला मिळतात.

**तुमची प्रगती तपासा**

१. क्लिफर्ड गीर्ट्झ यांच्या व्याख्यात्मक दृष्टिकोनाची मीमांसा करा.?

____________________

____________________

____________________

____________________

## ३.११ सारांश

सारांशाने असे म्हणता येईल की, समाजातील व्यक्ती 'संस्कृती' नावाच्या प्रतिकांच्या आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या अर्थांच्या एका पद्धतीचे पालन करत असतात, या कल्पनेवर प्रतिकात्मक मानवशास्त्र आधारलेले आहे. लोकांच्या वास्तव जीवनाचे प्रतिबिंब या संस्कृतीरूपी व्यवस्थेत उमटलेले असते. समाजात राहताना व्यक्ती जगरहाटीनुसार वागत असल्याने प्रतिकात्मक मानवशास्त्र या घट्ट किंवा विस्कळित बांधणीच्या सामाजिक

व्यवस्थेवर भर देते. सानवी समाजाचे 'संवाद' हेच व्यवच्छेदक लक्षण असेल प्रतिके आणि खाणाखुणंचा उपयोग करून आपल्या कृतीला व विचारांना माणसाकडून दिलेल्या अभिव्यक्तीने संस्कृती निर्माण होत असते. लोक जगाकडे व स्वत:कडे ज्या अर्थाने पाहून वर्तन करत असतात त्या प्रक्रियेचा अभ्यास व चिकित्सा प्रतिकात्म मानवशास्त्रात केला जातो. गीर्ट्झ यांचे व्याख्यात्मक व मानवीय मानवशास्त्र संक्षेपाने सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, इतर कोणत्याही सामाजिक विज्ञानाप्रमाणे यातही नेमका अर्थ जाणून घेणे हिच मुख्य अडचण असते.

सकारात्मकता हा १९ व्या शतकापासून सुरु झालेल्या जगाकडे पाहण्याचा तत्वज्ञानावर आधारित दृष्टिकोन आहे. तो दृष्टिकोन जाणिवांची अनुभूती व तर्कावर आधारित आहे.

कोणाला दुसऱ्या कोणाची संस्कृती जाणून घ्यायची असेल तर त्याला त्या दुसऱ्याच्याच भूमिकेत जावे लागेल, असे पारंपरिक मानवशास्त्र मानते. मॅलिनोवस्की म्हणतात की, स्थानिक लोकांची भूमिका समजून घेतली तरच आपल्याला त्यांची त्यांच्या संस्कृतीविषयीची कल्पना समजू शकते. गीर्ट्झ हेही मानवशास्त्रीय आकलनासाठी स्थानिकांच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा आग्रह धरतात. त्याही पलिकडे जाऊन ते याला व्याख्यात्मक दृष्टिकोनाची जोड देतात. या दृष्टिकोनात सांस्कृतिक प्रतिके व संकेतांमधून निघणारे निरनिराळे अर्थ एकत्र करून त्यांची परस्परांशी तुलना केली जाते. बाहेरच्या निरीक्षकाचा स्वत:चा दृष्टिकोन व ज्ञान याच्याशी स्थानिकांच्या दृष्टिकोनाचा मिलाफ केला जातो. व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाचा अर्थ व्यक्त करणाऱ्या प्रतिकांची तुलना करण्याची पद्धत यासाठी वापरली जाते.

लिखित साहित्य, माणसांच्या कृती, प्रतिके, सामाजिक संरचना व घटना या सर्वांमधून व्यक्त होणाऱ्या अर्थांचे संकलन केले की त्यातून एक समग्र चित्र तयार होते. यालाच गीर्ट्झ 'थिक डिस्क्रिप्शन' म्हणतात. यातून स्वत:च्या व इतरांच्या संस्कृतीचे ज्ञान मिळविता येते. थोडक्यात क्लिफर्ड गीर्ट्झ यांचा व्याख्यात्मक व मानवीय दृष्टिकोन हा असा आहे. यात मानवी व्यवहारांच्या अभ्यासाचे मॉडेल वापरले जाते. मानवशास्त्रातील हा नवा मतप्रवाह आहे. काही अंशी तो मानवीय शास्त्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या नव्या वैज्ञानिक पद्धतींवर आधारलेला आहे. या नव्या तंत्राने व दृष्टिकोनाने पारपंररिक अनुभवजन्य पद्धतीमध्ये बदल होऊन त्या अधिक व्याख्यात्मक झाल्या आहेत.

१९ व्या शतकात होऊन गेलेले मानवशास्त्रातील अग्रदूत एडवर्ड टेलर यांच्या लिखाणातून गीर्ट्झ यांच्या व्याख्यात्मक दृष्टिकोनाचे महत्व स्पष्ट होते. टेलर लिहितात, 'शब्दांच्या उच्चारातून जे विचार थेट व्यक्त होत नाहीत ते व्यक्त करण्यासाठी प्रतिकांचा वापर करणे ही मानवाला लाभलेली भाषेतील सर्वात उच्च प्रतीची प्रज्ञा आहे. यामुळेच विविध वंशाची माणसे मनोव्यापारांमध्ये एका सूत्राने बांधली गेली आहेत.`` माणसांची खास क्षमता म्हणून प्रतिकांकडे पाहणे हे आता मानवशास्त्रीय अभ्यासाचे एक महत्वाचे

उद्दिष्ट झाले आहे. सुसान लँगर याकडे मानवी बौद्धिक क्रियांमधील नव्या परिवर्तनाचा प्रवाह म्हणून पाहतात.

## ३.१२ प्रश्न

- प्रतिकात्मक व व्याख्यात्मक मानवशास्त्राचा उगम व त्यातील विविध विचार प्रवाहांचा थोडक्यात उहापोह करा.
- खास करून व्हिक्टर टर्नर यांच्या दृष्टिकोनातून प्रतिकात्मक मानवशास्त्राचे स्वरप स्पष्ट करा.
- क्लिफर्ड गीर्ट्झ यांच्या व्याख्यात्मक मानवशास्त्राच्या विविध पैलूंचा सविस्तर आढावा घ्या.

## ३.१३ संदर्भसूची


- Brown, Curtis. “Functionalism.” In International Encyclopedia of the Social Sciences, Vol. 3, edited by William A. Darity, Jr., 231-233. Detroit: Macmillan Reference USA, 2008.
- Douglas, Mary. 1970. Natural Symbols: Explorations in Cosmology. New York: Pantheon.
- Geertz, Clifford. 1973a. The Impact of the Concept of Culture on the Concept of Man. In The Interpretation of Cultures. Pp. 33-54. New York: Basic Books, Inc.
- Geertz, Clifford. 1973b The Cerebral Savage: On the Work of Claude Levi-Strauss. In The Interpretation of Cultures. Pp. 345-359. New York: Basic Books, Inc.
- Geertz, Clifford. 1973c The Interpretation of Cultures. New York: Basic Books, Inc.
- Geertz, Clifford. 1973d Thick Description: Toward an Interpretive Theory of Culture. *In* The Interpretation of Cultures. Pp. 3-30. New York: Basic Books, Inc.
- Geertz, Clifford. 1973e Religion as a Cultural System. In The Interpretation of Cultures. Pp. 87-125. New York: Basic Books, Inc.
- Geertz, Clifford. 1973f Notes on the Balinese Cockfight. In The Interpretation of Cultures. Pp. 412-453. New York: Basic Books, Inc.
- Harris, Marvin and Orna Johnson. 2007. Cultural Anthropology, 7th edition. Boston: Pearson.
- Harrison, Anthony Kwame.2013. “Thick Description.” In Theory in Social and Cultural Anthropology: An Encyclopedia, Vol. 2, edited by R. Jon McGee and Richard L. Warms, 860-861. Thousand Oaks, CA: SAGE .

- Johnson, Michelle C. 2013 “Symbolic and Interpretive Anthropology.” In Theory in Social and Cultural Anthropology: An Encyclopedia, Vol. 2, edited by R. Jon McGee and Richard L. Warms, 841-846. Thousand Oaks, CA: SAGE
- Lukas, Scott A. “Postmodernism”. 2013. In Theory in Social and Cultural Anthropology: An Encyclopedia, Vol. 2, edited by R. Jon McGee and Richard L. Warms, 639-645. Thousand Oaks, CA: SAGE
- Margolis, Maxine L. 2013.“Cultural Materialism.” In Theory in Social and Cultural Anthropology, Vol. 1, edited by R. Jon McGee and Richard L. Warms, 147-149. Thousand Oaks, CA: SAGE.
- Sapir, Edward 1929 The Status of Linguistics as a Science. Language 5(4):207–214.
- Turner, Victor.1967 The Forest of Symbols: Aspects of Ndembu Ritual. Ithaca: Cornell University Press.
- Turner, Victor.1969 The Ritual Process Structure and Antistructure. Chicago:Aldine.
- Turner, Victor.1974 Symbolic Action in Human Society, IthacaComellU'sity Press.
- Turner, Victor.1974 Dramas, Fields, and Metaphors: Symbolic Action in Human Society. Ithaca: Cornell University Press.
- Turner, Victor.1980.Social Dramas and Stories about Them. Critical Inquiry 7:141-168.
- https://emporiaslim.libguides.com/c.php?g=891108&p=6407585#:~:text=To%20aid%20anthropologists%20in%20the,patterns%20of%20cultural%20and%20social
- https://courses.lumenlearning.com/culturalanthropology/chapter/symbolic-and-interpretive-anthropology/


❖❖❖❖

# ४

# दाट वर्णन, सीमियता आणि सामाजिकता (THICK DESCRIPTION, LIMINALITY AND COMMUNITAS)

**फाल्गुनी वाहनवाला**

**खंडाची रचना:**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ संकल्पना

४.२ प्रस्तावना

४.३ 'दाट वर्णन' (Thick Description)

४.४ सीमियता (Liminality)

४.५ सामाजिक क्षेत्रे आणि रिंगणे (Social Fields and Arenas)

४.६ सामाजिकता (Communists)

४.७ सीमियात, सामाजिकता व प्रवास

४.८ निष्कर्ष

४.९ टीका


## ४.० उद्दिष्ट्ये

- क्लिफर्ड गीर्ट्झ यांनी विकसित केलेला अन्वयार्थक दृष्टिकोन समजून घेणे
- आपल्या दैनंदिन जीवनातील 'दाट वर्णना'चे महत्व जाणून घेणे
- सीमियता व सामाजिकता यामागील संकल्पना व त्यांचे परस्परांशी संबंध तपासणे

## ४.१ संकल्पना

- **सीमियता (Liminality)**: हा संक्रमण काळ किंवा प्रवासाचा काळ असतो. यात सहभागी व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठा किंवा दर्जा नसतो. ती अनामिक असते. ती आज्ञाधारक व विनयशील असते व वर्तन, पेहराव इत्यादीच्या बाबतीत ठराविक प्रथा-परंपरांचे पालन करतो.

- **सामाजिक क्षेत्रे (Social Fields)**: जेथे पर्यायांचा विचार करून ते  विकसित केले जातात अशा जागा
- **सामाजिक नाट्य (Social Drama)**: समाजात पर्यायी सामाजिक आकृतीबंध व मूल्यांचे पालन सुरु केल्यावर निर्माण होणारे संघर्ष.
- **सामाजिकता (communities):** समाजशीलतेची उत्स्फूर्त भावना, परस्परांविषयीचे प्रेम, एकोपा व समानतेची भावना आणि उत्कट भावनिक, मुक्तिदायक किंवा आत्मिक अनुभव.

## ४.२ प्रस्तावना

अमेरिकी मानवशास्त्रज्ञ क्लिफर्ड गीर्ट्झ (१९२६-२००६) यांनी असे स्पष्ट मत मांडले की, संस्कृतीवर्णन हे निव्वळ निरनिराळे अन्वयार्थ काढणे असते. गीर्ट्झ यांच्या मते दुसऱ्या संस्कृतीमधील आशय व क्रियांविषयी मानवशास्त्रज्ञाचे ताडून न बघता येणारे मत म्हणजे 'अन्वयार्थ' नव्हे. तर एका ठराविक सांस्कृतिक संदर्भात ते आशय व कृती कशा अर्थपूर्ण ठरतात याविषयी विचारपूर्वक केलेली मांडणी म्हणजे अन्वयार्थ. गीर्ट्झ यांनी सन १९७३ मध्ये 'Thick Description: Toward an Interpretive Theory of Culture' या निबंधात आपली मते औपचारिकपणे मांडली. त्यात ते असे विवेचन करतात की, ' माणूस हा स्वत:च स्वत:ला महत्व देऊन विणलेल्या जाळ्यात अडकलेला प्राणी आहे. माझ्या दृष्टीने माणसाने विणलेले जाळे ही त्याची संस्कृती आहे. त्यामुळे त्याची चिकित्सा करणे नितीनियमांचा शोध घेणारे प्रायोगिक विज्ञान नव्हे तर अर्थाचा मागोवा घेणारे अन्वयार्थक विज्ञान आहे.'

'The Interpretation of Cultures,'च्या पहिल्या प्रकरणात क्लिफर्ड गीर्ट्झ संस्कृती वर्णनकाराची नेमकी भूमिका स्पष्ट करतात. ढोबळ मानाने संस्कतीचे निरीक्षण करणे, नोंद घेणे व चिकित्सा करणे हे संस्कृती वर्णनकाराचे उद्दिष्ट असते. खास करून त्या वर्णनकाराला प्रतिकांचा अन्वयार्थ त्या संस्कृतीमध्येच शोधावा लागतो. सर्व तऱ्हेचे अर्थ समोर येण्यासाठी प्रतिकांचा अन्वयार्थ 'दाट वर्णना'च्या आधारे लावायला हवा. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते डोळा मिचकविण्याचे उदाहरण देतात. माणूस जेव्हा डोळा मिचकवतो तेव्हा तो त्याच्या डोळयाची वेगाने निव्वळ उघड-झाप करत असतो की, तो आपल्या एखाद्या मित्राचा उपहास करण्यासाठी डोळा मिचकविण्याचे नाटक करून काही तरी कपट सुरु असल्याचा समज करून देऊन त्या बिचाऱ्याची फसवणूक करत असतो? शेवटी गिर्ट्झ अशी आशा व्यक्त करतात की, संस्कृतीवर्णनकार प्रतिकांची जेवढी खोलवर उकल करू शकेल तेवढीच विविध संस्कृतींमधील संवादाची कवाडे अधिक खुली होतील. (एम. मर्फी)

## ४.३ 'दाट वर्णन' (THICK DESCRIPTION)

मानवशास्त्रज्ञ या नात्याने गीर्ट्झ यांचे पहिले आणि सर्वाधिक स्वारस्य संस्कृतीवर्णनात होते. परंतु संस्कृतींचा केवळ वरकरणी अभ्यास करून काही मानवशास्त्रज्ञ जे निष्कर्ष काढत होते त्याने त् हताश झाले होते. (गीर्ट्झ १९७३/२०१३) पण यात एवढे वाद होण्यासारखे काय होते? सरळ सांगायचे तर गीर्ट्झ यांनी हे ओळखले होते की, संस्कृती ही एक गुंतागुंतीची व बहुधा गहन गोष्ट असते. तिच्यात परस्परांमध्ये गुंतलेल्या प्रतिके आणि चिन्हांचे अनेक थर असतात. (प्राचीन हिंदू श्रद्धेचा संदर्भ देत त्यांनी एके ठिकाणी संस्कृतीला कासवाची उपमा दिली होती: १९७३, पृ. २९) यावरून त्यांचे म्हणणे असे की, संस्कृतीची व्याख्या करणे सोपे नाही व तिचे वर्णन करणे तर त्याहूनही कठीण आहे. मानवशास्त्रज्ञांना त्यांच्या सांस्कृतिक अभ्यासात मदत करण्यासाठी या विद्याशाखेत 'दाट वर्णन' (Thick Description) या संकल्पनेची भर टाकली. 'दाट वर्णन' म्हणजे प्रत्यक्ष जागेवर जाऊन आलेल्या अनुभवांतून चिकित्सकाने सांस्कृतिक आणि सामाजिक संबंधांचे सुस्पष्ट असे आकृतीबंध तयार करणे व त्यांना संदर्भांची जोड देणे. (हॉलोवे आणि आरडब्लयूजेएफ, परिच्छेद ३)

**एक उदाहरण: डोळे मिचकवण्याची बहुअर्थी कृती**

'दाट वर्णन' म्हणजे नेमके काय हे स्पष्ट करण्यासाठी गीर्ट्झ यांनी खालीलप्रमाणे एक साधे उदाहरण दिले:

समजा.. दोन मुले त्यांच्या उजव्या डोळ्याची वेगाने उघड-झाप करत आहेत. यापैकी एकाच्या डोळ्यांची उघडझाप ही अनैच्छिक क्रिया आहे तर दुसरा त्या कृतीतून गोपनीय संकेत देत आहे. हालचाली म्हणून या दोन्ही कृती एकसारख्या आहेत. एक घटना म्हणून डोळ्यांची ही हालचाल कॅमेऱ्यात टिपली तर त्यापैकी कोणते 'डोळा मिचकावणे' आणि व कोणते ' डोळा मारणे' आहे यातील फरक सांगता येणार नाही. किंवा त्यापैकी एक किंवा दोन्ही डोळा मिचकवणे अथवा डोळा मारणे आहे, हेही कळणार नाही. डोळा मिचकवणे व डोळा मारणे यातील फरक कॅमेऱ्यात टिपला जात नसला तरी त्या दोन्हींमध्ये मोठा फरक आहे. जो कोणी या दोन्हींमध्ये दुर्दैवाने गल्लत करेल त्याच्या हा फक लक्षात येईल. डोळा मारणारा काही तरी सांगत असतो आणि त्याचे हे सांगणे नेमक्या व खास प्रकारचे असते... जेव्हा अशा प्रकारे सहेतूक डोळ्याची उघडझाप करणे म्हणजे काही तरी गुपिताचा तो संकेत आहे असे मानण्याची परंपरा रूढ असते तेव्हा ते डोळा मिचकवणे न राहता 'डोळा मारणे' होते. यातून संस्कृतीचा एक पैलू उघड होतो.

पण हे एवढ्यावरच संपत नाही. समजा तेथे तिसराही मुलगा आहे. या तिसऱ्या मुलाने आपल्या मित्रांची थट्टा करण्यासाठी त्या पहिल्या मुलाच्या डोळयांची उघडझाप करण्याच्या कृतीचे विडंबन केले. नवशिका असल्याने त्याला ती नक्कल हुबेहूब जमली नाही, पण त्याच्याही डोळ्याची हालचाल पहिल्या दोघांसारखीच होती. तरी तो त्या दोघांप्रमाणे डोळा मिचकवतही नव्हता व डोळा मारतही नव्हता. ही तिसरा मुलगा त्या

कृतीचा अन्वयार्थ न कळता नुसती नक्कल करत असतो. म्हणजे डोळे मिचकवणे व डोळा मारणेयाचेही समाजाने घालून दिलेला काही नीतीनियम आहेत, हे आपल्या लक्षात येते. ‘विरळ वर्णन’ (Thin Description) यातील फक्त क्रिया लक्षात घेते. त्याउलट ‘दाट वर्णन’ (Thick Description) त्या क्रियेमागील अन्वयार्थ शोधत असते. संस्कृतीवर्णनाचा उद्देशच तो आहे. यात कोण काय करतो एवढेच न पाहता, त्याच्या त्या कृतीतून त्याला व समाजाला कोणता अर्थ अभिप्रेत आहे, याचा शोध घेणे यात महत्वाचे मानले जाते. असे न करता संस्कृतीकडे केवळ वरकरणी पाहिले तर संस्कृतीचे खरे मर्म कळणार नाही, असे गीर्ट्झ मानतात. (१९७३, पृ. ६-७)

ज्याचे खरे आकलन फक्त ‘दाट वर्णन’ पद्धतीनेच होऊ शकते अशा मानवी वर्तनाचे चपखल उदाहरण गीर्ट्झ यांनी या छोट्याशा परंतु प्रभावी परिच्छेदातून दिले आहे. यात डोळा मिचकवणारा, डोळा मारणारा व विडंबन करणारा अशी ही तिन्ही मुले वरकरणी एकसारखी दिसणारी शारीरिक क्रिया करत असली तरी तिघांच्या क्रियांमधील अन्वयार्थात खूप फरक आहे. गिर्ट्झ म्हणतात की, संस्कृती वर्णनकाराला मानवी वर्तन व त्याव्दारे संस्कृती समजून घ्यायची असेल तर त्याला हा खोलवर असलेला संदर्भ खोदून काढावाच लागेल.

‘संस्कृती म्हणजेच संदर्भ’ हे गिर्ट्झ यांचे विधान (शान्कमन , १९८४, पृ. २६२) ‘दाट वर्णना’तून त्यांना काय अभिप्रेत आहे, हे अचूकपणे स्पष्ट होते. गीर्ट्झ यांनी विकसित केलेले ‘दाट वर्णना’चे हे मॉडेल व्हिक्टर टर्नर यांनीही वापरले. पण त्यांनी त्याला व्हॅन जेनेप यांच्या ‘संक्रमणावस्थे’च्या (rites of passage) मॉडेलचीही जोड दिली. १९६०च्या दशकात उदयाला आलेली विद्रोही संस्कृती (counter culture) व ‘वूडस्टॉक’ किंवा न्यूयॉर्कमध्ये झालेली समलिंगी लैंगिक प्रवृतीच्या समाजाची ‘स्टोनवॉल’ दंगल यासारख्या घटनांमधील या संस्कृतीवाद्यांचे अनुभव समजून घेण्यासाठी टर्नर यांनी या सुधारित मॉडेलचा वापर केला. एकूण व्यापक सामाजिक व्यवहारांच्या संदर्भात सामाजिक चळवळींची, वांशिक गटांची व समाजाने बहिष्कृत केलेल्या अन्य अल्पसंख्य गटांची भूमिका समजून घेण्यासाठी त्यांनी क्रियात्मक मॉजेल्सचीही पुनर्बांधणी केली. पूर्वी मानवशास्त्रीय अभ्यास औद्योगिकीकरणापूर्वीच्या दूरवरच्या विदेशी जनसमुदायांपुरता केंद्रीत होता. तो समकालीन औद्योगिक समाजांकडेही वळविण्याचे श्रेय बऱ्याच अंशी टर्नर यांच्याकडे जाते. हे करत असताना त्यांनी मानवशास्त्राच्या पारंपरिक सैधान्तिक मॉडेल्सचेही मोठ्या प्रमाणावर पूनर्मूल्यांकन घडवून आणले.

टर्नर यांना विज्ञान व मानव्यविद्या या दोन्हींकडे ओढा होता. यापैकी कशाची कास धरायची याविषयीचे मनातील द्वंव्द त्यांनी विद्यापीठत मानवशास्त्राचे शिक्षण घेऊन सोडविले. या विद्याशाखेत त्यांना संस्कृतीविज्ञान व मानवी व्यवहारशास्त्र या दोन्हींचा ढांडोळा घेता आला आणि सौंदर्यशास्त्र, प्रतिकात्मकता व अन्वयार्थांचे समाजातील नेमके

स्थानही अभ्यासता आले. माणसांच्या आपसातील संबंधांमधील नाट्यमयतेचेही त्यांना आकर्षण होते. व्यावहारिकदृष्ट्या ती भूक साहित्य व नाटकांमधून भागवत असत. मानवशास्त्राच्या अभ्यासाने त्यांना या गोष्टी प्रत्यक्ष सामाजिक पातळीवरही शोधता आल्या.

मानवशास्त्रात प्रत्येक गोष्टीकडे वस्तूविषय म्हणून पाहिले जाते व त्यामुळे ज्यांचा अभ्यास करायचा त्यांच्यावरच अन्याय होतो, हे म्हणणे टर्नर यांना मान्य नव्हते. काही वेळा असे घडते, हे ते नाकारत नाहीत. पण वसाहतवादाच्या नंतरचे टिकाकार मानवशास्त्रज्ञांचे समाजाशी असलेले खरे नाते समजू शकलेले नाहीत, असा त्यांचा आक्षेप होता.

जेव्हा मानवशास्त्रज्ञ ज्या समाजाचा अभ्यास करायचा आहे त्या समाजासोबत बहुधा आपल्या कुटुंबासह दोन-तीन वर्षे जाऊन राहतो, तेव्हा त्याचे त्यांच्याशी जे गुंगागुंतीचे संबंध जुळून येतात त्याला टर्नर 'सामाजिक नाट्य' (Social Drama) असे म्हणतात. या संबंधांनी एवढी एकरुपता निर्माण होते की, वस्तुनिष्ठतेने पाहणारी त्रयस्थ व्यक्ती एवढीच भूमिका न राहता तो मानवशास्त्रज्ञ त्या समुदायाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा एक हिस्सा बनून जातो. परिणामी या 'सामाजिक नाट्या'ची भूमिका, व्यक्तींच्या प्रवृत्ती आणि संभाषणांतून व्यक्त होणारा अर्थ या सर्व बाबी मानवशास्त्रज्ञाने त्या समाजाचा एक हिस्सा असल्याच्या भूमिकेतून समजून घेणे हे मीसांसेच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

प्रत्येत संस्कृती व त्यातील प्रत्येक व्यक्ती आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी सर्व ज्ञानेद्रियांचा उपयोग करतीत असते.व्यक्तिगत पातळीवर ही अभिव्यक्ती शारीरिक हावभाव, चेहᵒयावरील भाव, देहबोली, जलद, मंद किंवा खोलवरचे श्वसन, अश्रू इत्यादींमधून व्यक्त होते. तर सांस्कृतिक पातळीवर ती ठराविक पद्धतीचे हातवारे, नृत्याचे प्रकार, अर्थपूर्ण मौन, कवायतीसारखे ताला-सुरात चालणे, खेळ व क्रीडाप्रकार आणि कर्मकांडे यातून दिसते.

परंतु टर्नर यांनी वैज्ञानिक सिद्धांतांना पूर्णपणे सोडचिठ्ठी दिली नाही, तर मानवी व्यवहारांच्या अभ्साच्या नव्या क्षेत्रांमध्ये त्यांनी वैज्ञानिक पद्धतींचा वापर सुरु केला. त्यासाठी त्यांनी रचनात्मक कृतिशीलता, नातीगोती, वर्गवारी आणि अधिकारांची उतरंड या तत्त्वांचा उपयोग केला. तरीही मानवी अभिव्यक्तीचा भावनिक आविष्कार अभ्यासण्यासाठी त्यांनी व्यक्तिनिहाय वेगळेपण, व्यक्तिगत शैली, संभाषण चातुर्य, व्यक्तिगत पसंती आणि संवादामधील प्रतिकांचे महत्वाचे स्थान याकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. थोडक्यात त्यांना व्यक्तीगत प्रत्यक्ष अनुभव व भावनिक किंवा आत्मिक पैलूचे महत्व या मुख्य आधारावर एक समाजविज्ञान म्हणून त्यांनी मानवशास्त्राचा पाया घालण्याचा प्रयत्न केला. सामाजिक अन्वयार्थ एखाद्या लिखित साहित्यासारखे वाचता येतात, असे मानणाᵒया गीर्ट्झ यांच्या उलट टर्नर यांनी संस्कृतीचा खरा अर्थ समजण्यासाठी सामाजिक व्यववहारांकडे एकाद्या नाट्याप्रमाणे पाहण्याचा आग्रह धरला.

**तुमची प्रगती तपासा**

१. सांस्कृतिक जीवनामधील **'दाट वर्णन' (THICK DESCRIPTION)** संकल्पनेची मीमांसा करा.?

______________________________________________

______________________________________________

__________________________________________

## ४.४ सीमियता (LIMILALITY)

व्हॅन जेनेप यांनी 'राईट्स ऑफ पॅसेज'चा सिद्धांत विकसित केला तेव्हा त्यांच्या कल्पनेतील संक्रमणाचा किंवा 'लिमिनल' टप्पा असा होता जेथे सामाजिक बंधनांतून थोडीफार मुक्तता मिळू शकत होती. सुनिश्चित अशा सामाजिक रचनेच्या दोन टोकांच्या मधील, जेथे काहीही घडू शकते अशी मोकळी जागा, म्हणजे 'लिमिनल' स्थान, अशी व्याख्या त्यांनी केली. व्हॅन जेनेप यांनी येथे वापरलेला 'Liminal' हा शब्द लॅटिन भाषेतील असून त्याचा अर्थ मर्यादा किंवा सीमा असा होतो. टर्नर यांनी त्यांनी त्यांच्या 'सीमियते'च्या संकल्पनेत याचा महत्वाचा घटक म्हणून विकास केला. वास्तविक किंवा प्रतिकात्मक मर्यादा हा कर्मकांडांच्या आणि प्रतिकात्मक अनुभवांचा महत्वाचा हिस्सा असतो. या टप्प्यावर असलेली व्यक्ती वर्गीकरणाच्या निश्चित बिंदूंच्या मधल्या भागात असते, तिची अवस्था संदिग्धतेची असते व ती समाजाच्या वर्गीकरणाच्या पद्धतींमध्ये दृष्टीस पडत नाही. दर्जाच्या अनुक्रमात मधल्या टप्प्याला असणे यास ते 'लिमिनॅलिटी' म्हणतात.

समाज जेव्हा स्वत:ची दखल घेतो, भावनिक, आध्यात्मिक आणि सामाजिक विश्वात लोकांच्या स्थानांचा आढावा घेतो आणि सामाजिक व्यवस्थेस आकार देणाऱ्या सामाजिक संबंधांची फेरआखणी करतो तेव्हा ते त्या समाजाचे 'लिमिनल' टप्पे असतात, असे टर्नर सांगतात. या स्थित्यंतराच्या अवस्थेत व्यक्ती तिच्या नेहमीच्या सामिजेक भूमिकेच्या बाहेर जाऊन पर्यायी सामाजिक रचना व मूल्यांचा स्वीकार करू शकते. या काळात निषिद्धततेचे अनेक नियम तयार होत असल्याने समाजाची घट्ट वीण सैल होऊ शकेल अशी ही धोक्याची घडी असते. सामाजिक दर्जा कसा विसर्जित होतो हे 'लिमिनॅलिटी'तून दिसून येत असल्याने याची संकल्पना मांडताना आपण या 'लिमिनल' अनुभवातही संस्कृती हाच मुख्य पैलू मानण्याऐवजी बहुधा त्याच्या स्वरूपावर अधिक लक्ष केंद्रीत करतो. टर्नर यांच्या या मॉडेलमध्ये सुप्रस्थापित प्रथा मोडीत निघाल्यावर दोन गुणविशेष प्रकट होतात- विमुक्त चेतना आणि नैसर्गिक अशी शारीरिक व आत्मिक अवस्था.

## ४.५ सामाजिक क्षेत्रे आणि रिंगणे (SOCIAL FIELDS AND ARENAS)

प्रबळ सामाजिक संरचनेस घातपाती असे पर्याय जेथे उभे केले जाऊ शकतात त्या मोकळ्या जागांना टर्नर 'सामाजिक क्षेत्रे' (Social Fields) म्हणतात. या सामाजिक नाट्यातून किंवा विरेचक अनुभवांतून समाज कसा असू शकतो याचे पर्याय स्थित्यंतराच्या या मानसिक व सामाजिक रिक्त जागांमध्ये मांडले जाऊ शकतात. म्हणजेच सामाजिक व्यवहारांच्या, मूल्यांच्या व प्रतिकात्मक अभिव्यक्तींच्या पर्यायी रचना तयार केल्या जातात, प्रस्थापित होतात व त्यांचा प्रस्थापित सामाजिक आणि प्रतिकात्मक रचनांशी संघर्ष निर्माण होतो. अशा अव्यक्त सांस्कृतिक प्रभावक्षेत्रांना टर्नर 'सामाजिक क्षेत्रे' असे म्हणतात. ज्यात सामाजिक व प्रतिकात्मक रचना नवी सनातन व्यवस्था म्हणून प्रस्थापित होते त्याच्यासाठी टर्नर 'रिंगण' (Arena) असा शब्द वापरतात. सामाजिक-सास्कृतिक आकृतीबंधाच्या या पर्यायी मॉडेल्सचा पुरस्कार करणाऱ्यांमध्ये यानंतर वर्चस्वासाठी संघर्ष सुरु होतो. यातूनच समाजात 'सामाजिक नाट्य' बजावते, हे स्पष्ट होते.

**तुमची प्रगती तपासा**

१. सांस्कृतिक जीवनामधील **सीमियता** संकल्पनेची भूमिका कोणती.?

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## ४.६ सामाजिकता (COMMUNITIES)

यात अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी टर्नर यांनी 'सामाजिकते'ची (Communities) संकल्पना विकसित केली. हा मुख्यत: धर्म, नाट्य व साहित्यातून प्रत्यक्षात येणारा अनुभव असतो. पण त्याची चिकित्सा अनुभवसिद्ध किंवा वैज्ञानिक दृष्टिकोनातून केली जात नाही. हे प्रवासाचे विधीनियम, विदिरोही संस्कृती व धार्मिक चळवळींमध्ये पाहायला मिळते. यामुळे धर्माच्या क्रियावादी मॉडेलऐवजी सामाजिक रचना समजून घेण्यात परिवर्तनीय, विरेचक व धार्मिक अनुभव मध्यवर्ती भूमिका बजावतो हे स्पष्ट होते.

टर्नर असे सांगतात की, 'सामियते'च्या अवस्थेत उत्फूर्त समाजशीलता, परस्परांविषयीचे प्रेम, एकोप्याची व समानतेची भावना आणि उत्कट भावनिक व आत्मिक अनुभव या रूपाने सामाजिकता (communities) उदयाला येते. यातून आनंदाच्या, कल्याणाच्या व आत्मियतेच्या उत्कट भावनांचा उगम होऊन सनातन सामाजिक व

सांस्कृतिक व्यवस्थेला आव्हान दिले जाते. ही अशी वेळ असते जेव्हा अद्भुतरम्य आदर्श व आकांक्षा व्यक्त केल्या जाऊ शकतात व सामाजिक-सांस्कतिक रचनेची पर्यायी व्यवस्था तयार केली जाऊ शकते. लोकांनी सर्वमान्य सामाजिक विश्वाचे बुरखे काढून टाकले आहेत व सामाजिक बंधनांच्या जोखडातून लोक आता खऱ्या अर्थी मुक्त झाल्याची भावना याच्याशी बहुधा निगडित असते. टर्नर यांच्या मते, या टप्प्याला लोकांना आनंदाची व नातेसंबंधांतील सच्चेपणची जी उत्कट जाणीव होते तीच १९६० च्या दशकातील हिप्पी चळवळीसारख्या विद्रोही सामाजिक चळवळीमधील अद्भुतरम्य आदर्शांमागील मुख्य प्रेरकशक्ती होती. ते म्हणतात की, जगरहाटीच्या बाहेर पडून पर्यायी समुदाय तयार करण्याची ही प्रवृती ही काही अंशी तशा लोकांच्या कायमस्वरूपी सामाजिकतेच्या अवस्थेत राहण्याच्या इच्छेची अभिव्यक्ती होती.

सर्वच समाजांमध्ये समाजाची कल्पना असमान लोकांच्या वर्गीकरणाने केली जाणारी रचना, अशीच असते. याउलट सामाजिकतेच्या संकल्पनेत कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसलेल्या समग्रपणे एकजिनसी अशा समाजाच्या रचनेची आकांक्षा असते. अद्भूतरम्य कल्पना डोळयापुढे ठेवून उभ्या राहणाऱ्या सामुदायिक धार्मिक किंवा राजकीय चळवळींमध्ये अथवा जनजातीय कर्मकांडांमध्ये ती दिसून येते. यात समाजाकडे सामायिक मूल्ये, आदर्श व आत्मियतेच्या भावनेने मुक्त आणि समान बांधवांनी एकत्रित येऊन उभी केलेली व्यवस्था यादृष्टीने पाहिले जाते. जेथे सहयोगाचे व समानतावादी वर्तन हा विशेष असतो आणि दर्जा व दुजाभावाच्या नेहमीच्या व्याख्या दुलर्क्षित केल्या जातात तेव्हा सामाजिकतेचे व्यवहार केले जाऊ शकतात. एरवी सर्वसाधारणपणे विभागले गेलेले व परस्परांच्या विरोधात असणारे लोक अशा वेळी एकत्र येऊन मनवतेच्या सामायिक अनुभवासाठी आपल्या मतभेदांच्या पलिकडे जाऊ शकतात. टर्नर लिहितात...

'संरचनेत वेळोवेळी होणाऱ्या परिवर्तनाने या सामाजिकतेमध्ये अनेक क्रियाविधी होत असतात. सामाजिकतेची ही अवस्था कालातीत आहे व ती चिरंतन असल्याने तिला काळाच्या नेहमीच्या कल्पना लागू होत नाहीत, असे यात रममाण होणारे मानत असतात.

अशी सामाजिकता उत्स्फूर्तपणे व आपोआप उदयाला येते व टर्नर यांच्या मते समाजाची ती एक अपरिहार्य गरज आहे. सामाजिकतेची ही भावना कायम ठेवण्यासाठी तुम्ही दर्जा व भेदभावाची बाह्य लक्षणे दूर करण्याचा प्रयत्न करत असता आणि व्यक्तीच्या दर्जाकडे किंवा समाजाने तिला दिलेल्या भूमिकेकडे न पाहता माणुसकीच्या सामायिक अनुभवावर लक्ष केंद्रीत करत असता. हेच ठामपणे स्पष्ट करताना टर्नर पुढे लिहितात, सीमियतेचा आव आणण्यासाठी मुक्तीचा बुरखा धारण करावा लागणार असला तरी लोकांनी दर्जानिर्देशक बुरखे, पेहराव व अधिकारचिन्हे वेळोवेळी झुगारून देणे गरजेचे असते.समाजिकता प्रस्थापित बाह्य रचनांच्या बाहेर असते असे टर्नर मानत असले तरी सीमियतेच्या अवस्थेचीही स्वत:ची अशी पर्यायी रचना व प्रतिकात्मकता असते. पण तीही बव्हंशी त्यांच्या समाजाच्या मुख्य सामाजिक प्रवाहातूनच उयाला आलेली असते. उदाहरणार्थ या रचनेत पुरुष व स्त्रियांमधील पेहराव, श्रृंगार व स्वीकार्य वर्तनातील भेदाभेद

अधिक तीव्र होऊ  शकतात. मात्र सामाजिकतेच्या अवस्थेत असलेले लोक हे भेदाभेद मुद्दाम कमी करण्याचा प्रयत्न करतील किंवा स्त्री व पुरुषांच्या भूमिकांची अदलाबदलही करू शकतील. क्रियावादी दृष्टिकोनातून सामाजिक एकजिनसीपणावरील हा धोकादायक व विनाशकारी आघात ठरू शकतो. पण या अवस्थेतूनही सामाजिकतेची सकारात्मक क्षमता दिसून येते. त्यातून एकजूट, मूल्ये व लोकांमधील सामाजिक दुवा यांना बळकटी मिळते.

सीमियता व सामाजिकता यांच्या रचनेसाठी वापरली जाणारी प्रतिके बहुधा समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या किना॰यावर असलेल्या लोकांकडूनच घेतलेली असतात. उदाहरणार्थ, मुख्य संस्कृतीहून विरोधाभासी किंवा तिचा काठावर असल्याचे मानले जाणारे जिप्सी, मूळ रहिवासी, चेटकिणी इत्यादींचा बहुतेक वेळा सामाजिकतेचे प्रतिक म्हणून उपयोग केला जातो. मुख्य मुद्दा असा की, समाजाच्या मुख्य प्रवाहाहून वेगळेपणाची किंवा त्या समाजाने बहिष्कृत केल्याची ही प्रतिके असतात. याच प्रतिकांची फेरआखणी करून ती व्यक्तिवादाची, पर्यायी समुदायांची व समाजाच्या मुख्य प्रवाहापासून विभक्ततेची प्रतिके बनतात.मूळ रहिवासी जेव्हा आपली स्वत:ची सामाजिक-राजकीय व सांस्कृतिक ओळख व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात व जेव्हा ते हिच प्रतिके सामाजिकतेसाठी व समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वेगळेपण दाखविण्यासाठी वापरू पाहणा॰यांशी स्पर्धा करतात तेव्हा संघर्षाची स्थितीनिर्माण होते.

या समाजवर्गांच्या सामाजिक संबंधांच्या, प्रतिकांच्या व सांस्कृतिक साचेबंधांच्या ज्या स्वत:च्या अशा पर्यायी रचना असतात त्याही मान्यतेसाठी व परिणामकतेसाठी सांस्कृतिक मुख्य प्रवाहावरच अवलंबून असल्याने व काही प्रमाणात त्या त्याच्यावरच विसंबून असल्याने जी अवस्था हे त्याला टर्नर 'विद्रोही रचना' () म्हणतात. बहुतेक वेळा धक्कातंत्र म्हणून वापरली जाणारी ही प्रतिके व चिन्हे संस्कृतीच्या मुख्य प्रवाहातील त्यांच्या स्थानावरूनच नावारूपाला येतात व ती परिणामकारक ठरण्यासाठी मुख्य प्रवाहात त्यांच्याविषयी काय दृष्टिकोन आहे हे महत्वाचे ठरते. याविषयी टर्नर म्हणतात, विद्रोही रचना व सामाजिकतेचा उगम समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या काठावर होते हे आपण समजून घेतल्यावर काठावर त्यांची नेमकी काय भूमिका असते हे समजण्यासाठी ही प्रतिके काय सांगतात हेही आपल्याला जाणून घ्यावे लागेल.

**तुमची प्रगती तपासा**

१. 'सामाजिकते' ची (Communities) संकल्पना सुस्पष्टता करा.?

________________________________________
________________________________________
________________________________________
________________________________________

## ४.७ सीमियता, सामाजिकता आणि यात्रा

वर म्हटल्याप्रमाणे टर्नर यांनी सीमियतेची संकल्पना व्हॅन जेनेप यांच्याकडून घेतली आणि जेव्हा स्थित्यंतर हेच प्रभावी सूत्र असते असे समाजजीवनातील विशेष टप्पे समजून गेण्याचे साधन म्हणून त्याचा विस्तार केला. टर्नर लिहितात की, ''दर्जानिहाय रचना' हे जर आपले समाजाचे मूलभूत मॉडेल असेल तर सीमियतेच्या काळास आपल्याला दोन रचनांच्या दरम्यानचा काळ मानावा लागेल' (१९६७:९३) यात्रेच्या विधींमध्ये, अन्य कर्मकांडात किंवा तीर्थाटनातील असे स्थित्यंतराचे कालखंडही असेच असतात. म्हणजे ते धड इकडे नसतात किंवा तिकडे नसतात, ते ठरलेल्या स्थानांच्या मध्ये कुठेतरी असतात व त्याची जागा नीतीनियम, रुढी-परंपरा, प्रथा व उत्सवांवरून ठरत असते. परिणामी सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरांनाही औपचारिकता देणाऱ्या अनेक समाजांमध्ये त्यांचे असे संदिग्ध व अनिश्चित गुणविशेष दिसून येतात. (टर्नर १९६९:९५)

टर्नर यांना सीमियतेच्या कालखंडांचे आकर्षण वाटे कारण नेहमीचे सामाजिक संबंध प्रलंबित होणे व त्यात परिवर्तन हे त्यांचे लक्षण असते. सीमियतेचे कालखंड केवळ काळाच्या आत-बाहेर नसतात तर सामाजिक रचनेच्याही आत-बाहेर असतात. (टर्नर १९६९: ९६) यातून मानवी संबंधांची दोन प्रमुख मॉडेल्स सूचित होतात:

पहिले अशा समाजाचे ज्याची सुव्यवस्थित बांधणी असते, ज्यात फरक केलेले असतात व ज्यात कमीपणाच्या व अधिकपणाच्या निकषावर माणसांना निराळे करून त्यांच्या राजकीय-वैधानिक- आर्थिक स्थानांच्या उतरंडीची व्यवस्था ठरविलेली असते. दुसरे सीमियतेच्या काळात ज्याचे वेगळेपण स्पष्टपणे जाणवते अशासा सुव्यवस्थित बांधणी नसलेल्या किंवा अगदी जुजबी बांधणी असलेल्या व तुलनेने कमी भेदाभेद पाळल्या जाणाऱ्या सामाजिकतेचे. (टर्नर १९६९: ९६) विस्कळित समाज विरुद्ध सुव्यवस्थित बांधणीचा समाज, स्थित्यंतर/ स्थैर्य, समानता/ असमानता, अनामिकता/ नामकरण पद्धती, नि:शब्दता/संभाषण, दर्जा/दर्जचा अभाव अशा कितीतरी परस्परविरोधी व्दि-अंगी गुणवैशिष्ट्यांची उदाहरणे चर्नर देतात. (१९६९:१०६-१०७) पारंपरिक समाजांमध्ये ही गुणवैशिष्ट्ये प्रवासाशी निगडित क्रियांचा भाग असतात. परंतु ती प्रमुख धर्मांमधील व खास कररून धार्मिक तीर्थयात्रांमधील प्रसंगही दर्शवितात.

तीर्थयात्रांच्या प्रतिकात्मकतेतून त्यांचे संक्रमणात्मक स्वरूप अधोरेखित होते. ख्रिश्चन धर्माच्या साहित्यात अशी रूपके वारंवार पाहायला मिळतात. चाऊसर यांच्या मध्ये इंग्रजी साहित्यातील असे सर्वात सुप्रसिद्ध रूपकात्मक तीर्थाटन वाचता येते.

आणि हे १९ व्या शतकातील अमेरिकी स्तोत्र हेही त्याचेच उदाहरण आहे:

ख्रिश्चन प्रतिकात्मकता प्रवासाचे सीमिय स्वरूप व्यक्त करते. शेवटी येशू ख्रिस्ताचा जन्मही प्रवासातच झाला होता. त्याचे मानवी अस्तित्व हे त्यांच्या वास्तवापासून अल्पावधीसाठी झालेली ताटातूट होती.

ख्रिश्चन परंपरांच्या बाहेरही सामाजिक संबंधांमधील सामाजिकतेचा दर्जा यात्रांच्या सीमिय स्वरूपांतून व्यक्त होतो. (टर्नर १९७४: १६६-१६७) सामाजिक भेदभावांची बाह्य प्रतिके दूर केली की अशी सीमियता स्पष्ट होते.

सामाजिकता, सीमियता व समाजातील सर्वात कनिष्ठ दर्जा यांच्यातील दुव्यावर टर्नर भाष्य करतात. बहुस्तरिय समाजांमध्ये सर्वात खालच्या जाती व वर्गांमध्ये सर्वात जास्त अव्यवधान व वर्तनातील अनैश्चिकता दिसून येते, असे बहुधा मानले जाते. हे अनुभवसिद्ध सत्य असतेच असे नाही, तरी समाजातील ती एक चिरस्थायी भावना नक्कीच असते. कारण ज्यांना सामाजिकता जास्तीत जास्त वाढवायची असते ते त्याची सुरुवात नेहमी दर्जाची बाह्य लक्षणे कमी करून किंवा ती कमीत कमी करून त्याची सुरुवात करत असतात. उदाहरणार्थ गांधी व टॉलस्टॉय यांनी आपल्या स्वत:च्या बाबतीत हेच केले. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर त्यांनी पेहराव व वर्तनाच्या बाबतीत ते गरिबांच्या अवस्थेच्या जास्तीत जास्त जवळ गेले. (१९७४:२४३)

यात्रा या काही मुलभूत गुणवैशिष्ट्ये असलल्या सामाजिक प्रक्रिया असतात. त्या सामाजिकता दाखविणारे सीमिय सामाजिक संबंध असतात. आणि त्यात समाजातील नेहमीची उच्च-नीचतेची श्रेणीबद्ध रचना विलिन झाल्याच्या किंवा ती उलटी झाल्याच्या वास्तवावर भर देणारी प्रतिके वापरली जातात. तीर्थयात्रांचे उद्दिष्ट असलेली तीर्थक्षेत्रे कर्मकांडांची मुख्य केंद्रे बनतात. सर्वात महत्वाचे तीर्थक्षेत्र, अनुषंगिक तीर्थक्षेत्रे व त्यांच्या दरम्यानचे मार्ग हे सामाजिक प्रक्रियेचे एक जाळे असते. टर्नर यांच्या मूलभूत सैधान्तिक चिंतनात या तीर्थाटनांची गडद छाप दिसते. त्यांनी यात्रांमधील प्रक्रियांचा अभ्यास प्रक्रियेचा एक घटक म्हणून, विरोधी रचना म्हणून आणि कर्मकांडांतील प्रतिकांमधील अर्थ अशा विविध प्रकारे केला आहे. (१९७४:१६६)

## ४.८ निष्कर्ष

टर्नर यांच्या महत्वाच्या संकल्पनांचा थोडक्यात आढावा घेण्याने प्रगल्भ प्रज्ञेला आणि राजकीय मानवशास्त्राकडे पाहण्याच्या विविध कल्पना विकसित करताना त्यांनी दाखविलेल्या कमालीच्या ऊर्जेला न्याय दिल्यासारखे होणार नाही. (स्वार्ट्झ वगैरे १९६६) एडिथ टर्नर अशी आठवण सांगतात की, १९६० च्या दशकाच्या सुरुवातीस त्यांच्या विचारांना, वाऱ्याच्या उलट्या दिशेने जाणाऱ्या शिडाच्या होडीला मिळावे तसे, अचानक असे काही नवे वळण मिळत असे. (१९८५:८) आपल्याला असलेले विविध विषयांतील स्वारस्य आपल्या संशोधनाच्या मुलभूत अॅजेंडाचा कसे अविभाज्य भाग बनले हे स्वत: टर्नर अशा शब्दांत सांगतात.

मानवशास्त्रज्ञ म्हणून केलेले माझे काम म्हणजे विविध कालखंडांच्या व विविध संस्कृतींच्या मानव समुहांच्या सम्मिलित प्रक्रियांचा अभ्यास होता. मला असे जाणवले की,

या सम्मिलित प्रक्रियांनी एक निरंतर सार्वजनिक क्रिया घडत असते. माझी पाश्चात्य पार्श्वभूमी पाहता मला त्या नाट्यमय वाटल्या नसत्या तरच नवल होते. (१९८४:१९)

कर्मकांड, सामाजिक नाट्य व सांस्कृतिक वस्तूंचे खरे स्वरूप फक्त अस्तित्वाच्या मानवशास्त्रातूनच जाणून घेता येऊ शकते, असा निष्कर्ष टर्नर यांनी काढला होता. त्यांचे असे म्हणणे होते की, समाजाच्या केवळ रचनेकडे न पाहता या रचनांच्या प्रतिकात्मक व भावनीक परिणाम काय होतो हे पाहणे आणि त्यातही या रचनांच्या संक्रमण काळतील मधल्या काळात काय होते हे पाहणे अधिक महत्वाचे आहे. टर्नर यांच्या चिकित्सेनुसार समाजरचनेच्या आणि वर्तनाच्या नीतिनियमांच्या बाहेरच्या क्षेत्रात खरी जागृकता, उत्फूर्त हालचाली व प्रबळ अशा भावनिक प्रतिक्रिया पाहायला मिळतात. या कालखंडात नीतिनियम आणि सामाजिक रचनेच्या साचेबंद रचनेत काहीसा खंड पडलेला दिसतो. याच वेळी उत्कट भावना व त्यांची अभिव्यक्ती पाहायला मिळते. त्यातून समाजाच्या रचनेतील भावस्पर्शी, प्रतिकात्मक व नाट्यमय असे अंतस्थ कप्पेही उघड होऊ शकतात. बऱ्याच वेळा हे अनुभव अपेक्षच्या नेमके उलटे किंवा अपेक्षेहून जास्त उद्बोधक असू शकतात. या संक्रमण काळातील मधल्या टप्प्यांवर लक्ष केंद्रीत करून टर्नर यांनी पारंपरिक मानवशास्त्रीय विचारांना महत्वाचे असे वळण दिले. कारण त्यांच्या चिकित्सेत समाजाच्या आखीव चौकटीत काय घडते यापेक्षा त्या चौकटीच्या बाहेर व दरम्यान काय घडते याला जास्त महत्वाचे मानले गेले.

## ४.९ प्रश्न

१. क्लिफर्ड गीर्ट्झ यांच्या अन्वयार्थक दृष्टिकोनाचे स्वरूप व महत्व विषद करा. एखादी संस्कृती समजून घेण्यासाठी त्यांचा कसा उपयोग होतो?

२. गीर्ट्झ यांनी विकसित केलेल्या 'दाट वर्णना'च्या () संकल्पनेची समर्पक उदाहरणांसह सविस्तर चिकित्सा करा.

३. जेव्हा संक्रमण हा प्रबळ प्रवाह असतो असे सामाजिक जीवनातील विशेष टप्पे समजून घेण्यासाठी टर्नर यांनी 'सीमियता' व 'सामाजिकता' या संकल्पनांचा एक साधन म्हणून कसा उपयोग केला हे विस्ताराने सांगा.

४. सीमियता, सामाजिकता व यात्रा यांच्यातील टर्नर यांनी सांगितलेल्या समर्पकतेची चिकित्सा करा.

## ४.१० संदर्भसूची


- Barnard, A. (2004). History and Theory in Anthropology. Cambridge: Cambridge University Press.

- Geertz, C. (1973) The Interpretation of Cultures. New York: Basic Books.

- (1983). Local Knowledge: Further Essays in Interpretive Anthropology. New York: Basic Books.

- J.C. Alexander & P. Smith (ed).(2011) Interpreting Clifford Geertz: Cultural Investigation in the Social Sciences**.** Palgrave Macmillan.

- Moore Jerry, 2009. Visions of Culture an introduction to Anthropological Theories and Theorists ($3^{rd}$ed)United Kingdom .Rowen and Little Publishers.

- Turner, Victor (1984)Liminality and the Performative Genres. In Rite, Drama, Festival, Spectacle: Rehearsals toward a Theory of Cultural Performance. J. MacAloon, ed. Pp. 19–41. Philadelphia: Institute for the Study of Human Issues.
- Turner, Edith (1985) From the Ndembu to Broadway. In On the Edge of the Bush. E. Turner, ed. Pp. 1–15. Tucson: University of Arizona Press.

- Turner, Victor, and Edith Turner (1978) Image and Pilgrimage in Christian Culture: Anthropological Perspectives. New York: Columbia University Press. White, Leslie 1949 The Science of Culture. New York: Farrar, Straus & Giroux.


❖❖❖❖

# ५

# राष्ट्र, वांशिकता आणि बहु-सांस्कृतीकता यांचे सिद्धांत

फाल्गुनी वाहनवाला

**घटक रचना**

५ .० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ राष्ट्र

  ५.२.१ मूळ

  ५.२.२ राष्ट्रांवरील सिद्धांत

  ५.२.३ अल्पसंख्याकांना राष्ट्र आधारित नागरिकत्वाचे आव्हान

  ५.२.४ राष्ट्रीय विघटन

  ५.२.५ राष्ट्रा समोर उदयोन्मुख आव्हाने- क्रिप्टोकरन्सी.

५.३ वांशिकता

  ५.३.१ वांशिकता समजून घेणे

  ५.३.२ वांशिकता आणि दृष्टीकोन

  ५.३.३ वांशिकतेच्या आजूबाजूचे सिद्धांत

  ५.३.४ राजकारण आणि वांशिकता

  ५.३.५ DNA चाचणी आणि वांशिकता

५.४ बहु-सांस्कृतीकता

  ५.४.१ बहु-सांस्कृतीकता म्हणजे काय

  ५.४.२ गृहीत धरून चालणे

  ५.४.३ प्रक्रिया

  ५.४.४ बहुसांस्कृतिकतेभोवती असलेले वादविवाद

  ५.४.५ बहुसांस्कृतिकते मध्ये झालेला बदल.

५.५ सारांश

५.६ प्रश्न

५.७ संदर्भ

## ५.० उद्दिष्टे :

- राष्ट्राची संकल्पना आणि त्याचे सिद्धांत जाणून घेणे.
- वांशिकता आणि त्याचे विविध पैलू समजून घेणे.
- बहुसांस्कृतिकता आणि त्यात होणारे नवीन बदल जाणून घेणे

## ५.१ प्रस्तावना

ह्या भागात आपण तीन महत्त्वपूर्ण विषयांचा अभ्यास करणार आहोत. राष्ट्र, वांशिकता आणि बहुसांस्कृतिकता. या सर्व संकल्पना आपल्याला आपला समाज, त्याचा उदय आणि त्यात होणारे बदल समजून घेण्यास मदत करतील. ह्याने तुम्हाला एक दृष्टीकोन मिळेल ज्याद्वारे तुम्ही समाजाला चांगल्या प्रकारे समजू शकता.

## ५.२ राष्ट्र

राष्ट्र म्हणजे प्रादेशिक बंधन असलेले सार्वभौम सरकार. (म्हणजे, एक राज्य) ज्या नागरिकांच्या समूहाच्या नावाने राज्य केले जाते त्याला राष्ट्र म्हणून ओळखतात. राज्याच्या अंतर्गत मुख्य राष्ट्रीय गटाचा अधिकार एखाद्या प्रदेशावरील राष्ट्र-सार्वभौमत्वाची कायदेशीरता आणि तेथे राहणारे लोक निर्धारित करतात. राज्याच्या सदस्यांचे जमीन आणि प्रदेशाशी घट्ट नाते असते ज्याला ते आपले घर मानतात. परिणामी, इतर गटांनी राज्याच्या आत आणि बाहेर त्याचे नियम मान्य करावे आणि त्यांचे पालन करावे अशी त्यांची मागणी असते.

### ५.२.१ मूळ

फ्रेंच राज्यक्रांतीनंतरचे पहिले राष्ट्र-राज्य म्हणून फ्रान्सकडे पाहिले जाते. तथापि, काहीजण १९६९ मधील इंग्लिश कॉमनवेल्थला राष्ट्र-राज्य निर्मितीची सुरुवात म्हणून पाहतात. राष्ट्र-राज्याच्या उत्पत्तीवर साम्यवाद किंवा धार्मिक विश्वासांसारख्या विचारसरणींचा, उदाहरणार्थ, चर्च, बौद्ध धर्म, जातिव्यवस्था, राजेशाही, यांचाही प्रभाव असू शकतो. राज्यात जेव्हाही दडपशाही वाढते तेंव्हा क्रांती सुरु होते. राष्ट्र-राज्य म्हणजे लोकांचे राष्ट्र आणि नेमलेला राज्यकर्ता कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या निवडणुकीद्वारे किंवा सहमतीने राष्ताचे प्रतिनिधित्व करतो, या तत्त्वावर आधारित आहे. अर्थात आजही हुकुमशाही असलेली अनेक राष्ट्रे आजही अस्तित्वात आहेत. म्हणून, एखाद्या विशिष्ट राज्याच्या उत्पत्तीसाठी, अश्या लोकांची गरज असते, ज्यांच्यात एकमत असते.

### ५.२.२ राष्ट्रांवरील सिद्धांत

**राज्यत्वाचा घोषणात्मक सिद्धांत** - खालील निकष पूर्ण झाल्यावर हा सिद्धांत एका राज्याला आंतरराष्ट्रीय कायद्यातील व्यक्ती म्हणून परिभाषित करतो, ते निकष असे: **1)** एक परिभाषित प्रदेश; **2)** कायम लोकसंख्या; **3)** सरकार **4)** इतर राज्यांशी संबंध

जोडण्याची क्षमता. यानुसार, इतर राज्यांकडून राज्यात्वाची मान्यता प्राप्त करण्याची गरज नसते.

**राज्यत्वाचा संवैधानिक सिद्धांत-** इतर राज्यांनी एखाद्या राज्याला सार्वभौम म्हणून मान्यता दिली असेल तरच, हा सिद्धांत एखाद्या राज्याला आंतरराष्ट्रीय कायद्यात व्यक्ती म्हणून परिभाषित करतो. मान्यता देण्याचा हा सिद्धांत १९व्या शतकात विकसित झाला. त्या अंतर्गत, दुसऱ्या सार्वभौम राज्याने एखाद्या राज्याला मान्यता दिल्यावरच त्याला सार्वभौमत्वा प्राप्त होते.

**वेस्टफेलियन प्रणाली-** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वावर आधारित एक जागतिक प्रणाली; ज्यामध्ये प्रत्येक राज्याला, त्याच्या प्रदेशावर आणि देशांतर्गत बाबींवर सार्वभौमत्व असेल, बाह्य शक्तींची मदत न स्वीकारण्याचे स्वातंत्र्य असेल, दुसऱ्या देशांच्या देशांतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याच्या तत्त्वावर आधारित असेल आणि ते प्रत्येक राज्य (कितीही मोठे किंवा लहान असले तरी) आंतरराष्ट्रीय कायद्यात समान असेल. १६४८ मध्ये तीस वर्ष चालत असलेले युद्ध समाप्त झाल्यावर, वेस्टफेलियाच्या तहाच्या कागदांवर स्वाक्षऱ्या झाल्या आणि त्यावरून या सिद्धांताचे नाव पडले.

**तुमची प्रगती तपासा:**

१. राष्ट्राशी जोडलेल्या सिद्धांतांवर चर्चा करा

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

### ५.२.३ राष्ट्र-आधारित नागरिकत्वासाठी अल्पसंख्याकांचे आव्हान

नागरिकत्वाच्या पर्यायी तत्त्वांवर आधारित हक्कांचा दावा करित, काही राष्ट्रांमधील वांशिक अल्पसंख्याकांनी राष्ट्र-आधारित नागरिकत्वाच्या पारंपारिक नमुन्याला आव्हान दिले आहे. हे वैयक्तिक मानवी हक्क किंवा अल्पसंख्याक आणि स्थानिक लोकांचे सामूहिक अधिकार ओळखणाऱ्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनांवर अवलंबून असतात (काही विद्वान या घटनेला "उत्तर-राष्ट्रीय नागरिकत्व" म्हणतात)

### ५.२.४ राष्ट्रीय विघटन

राष्ट्रांच्या प्रदेशांमधील वाढती आर्थिक असमानता आणि 20 व्या शतकाच्या उत्तरार्धापासून व्यक्तित्व राजकारणाचा उदय, काही जातीय गटांमधील अलिप्ततावादी आकांक्षांचा विकास, यामुळे काही देशांमध्ये राष्ट्रीय विघटन होण्याची शक्यता वाढली आहे, ज्याला अनेकदा बाल्कनीकरण असे नाव दिले जाते. वासाहातोत्तर विकसनशील जगातली, तरुण राष्ट्र आणि प्रजासत्ताकाची दीर्घ परंपरा असलेल्या प्रस्थापित पाश्चात्य राष्ट्र, (उदा. युनायटेड किंगडम आणि स्पेन) अश्या दोन्हीतही, बाल्कनीकरण दिसून येते. आंतरराष्ट्रीय मीडिया आणि नवीन सोशल मीडिया, यांच्याद्वारे माहिती आणि प्रतिमांचा प्रसार करून या प्रकारचा संघर्ष इतर राष्ट्र-राज्यांमध्ये पसरू शकतो.

**५.२.५ राष्ट्रा समोर उदयोन्मुख आव्हाने-क्रिप्टोकरन्सी**

राष्ट्राचे भवितव्य काय असेल? भविष्यात त्याचे लोकांवरील सामाजिक नियंत्रण कमी होईल का? नागरी समाज, धार्मिक अतिरेकी गट, सांस्कृतिक क्रांती यासारख्या अनेक आव्हानांचा सामना राष्ट्र-राज्याला करावा लागतो. आता आपण वित्त क्षेत्राचे उदाहरण घेऊ. आपण  क्रिप्टोकरन्सीच्या उदाहरणासह यावर चर्चा करू, जो आत्ता इंटरनेटवर बझवर्ड आहे. पारंपारिक पद्धतीत राष्ट्र सरकार नोटा छापत; नाण्यांना फियाट चलन म्हणतात, तेथे एक खरेदीदार आणि विक्रेता असतो. सरकार त्याचे नियमन करते आणि त्याच्या मूल्याची जबाबदारी घेते.

दुसरीकडे, बिटकॉइन आणि क्रिप्टोकरन्सी हे अंकीय पद्धतीने कुटबद्ध (डिजिटली एन्क्रिप्ट) केलेले असतात. हे विकेंद्रित चलन आहे जे कोणत्याही सरकारी किंवा मध्यवर्ती बँकेशी जोडलेले किंवा नियमन केलेले नाही. हे ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित आहे, जे वितरित लेजर फ्रेमवर्कसह कार्य करते. ब्लॉकचेन हे संगणकाच्या नेटवर्कद्वारे व्यवस्थापित केलेले एक वितरित खातेवही आहे जे डेटाबेसची अचूक प्रत राखते आणि गणिताच्या आधारे सहमतीने त्याचे रेकॉर्ड अद्यतनित करते. इथे मानवी मध्यस्ती नाही. हे विनामूल्य, मुक्त स्त्रोत संगणकामध्ये पीअर-टू-पीअर नेटवर्कवरून हाताळले जाते. अजूनपर्यंत तरी क्रिप्टोकरन्सीला फियाट चलनाचा दर्जा दिला गेला नाही, पण असे जर घडले तर मात्र मोठ्या प्रमाणावर सत्ता बदल घडू शकतो. असे जर झाले, सरकारी आर्थिक नियमन कमी होईल. याच्यामुळे मोठी फूट पडण्याची पण शक्यता आहे. साक्षर जनता डिजिटल पेमेंट प्रणालीचा वापर करून त्याचा अधिक लाभ घेऊ शकतात. ज्यांनी यात आधी गुंतवणूक केली त्यांना नंतरच्या तुलनेत अधिक फायदा होऊ शकतो.

सरकार यामुळे आपल्या लोकांच्या वित्त, कृतींवर नियंत्रण ठेवण्याची मक्तेदारी गमावू शकते. कारण लोकशाही रचनेमध्ये सरकार आपल्या लोकांवर किती नियंत्रण ठेवेल हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. नागरिकांना स्वतःचे निर्णय घेण्याचा आणि निवडण्याचा अधिकार आहे. परदेशी कंपन्यांसाठी बाजारपेठ खुली आहे, त्यामुळे अर्थव्यवस्थेवर कोणाचे नियंत्रण करू शकेल?.

**तुमची प्रगती तपासा:**

१. राष्ट्र-राज्य यांच्या पुढच्या आव्हानांबद्दल थोडक्यात लिहा.

## ५.३ वांशिकता

**वांशिकता** अर्थ

वांशिकता म्हणजे असा सामाजिक गट, ज्याची एक सार्वजनिक राष्ट्रीय किंवा सांस्कृतिक परंपरा असते. अनेक ऐतिहासिक समाजाचे प्रमुख वैशिष्ट्य होते वांशिकता हे होते. आधुनिक काळात, वांशिकते मध्ये सर्वप्रथम सामूहिक ओळखीचा संदर्भ येतो, ज्यात अनेक मूलभूत दुविधा पण असतात. समाजशास्त्रात, वांशिकता ही एक संकल्पना आहे जी सामायिक संस्कृती आणि जीवनपद्धतीचा संदर्भ देते. भाषा आणि धर्मच नव्हे तर इतर भौतिक गोष्टी, जसे कपडे आणि पाककृती, तसेच संगीत आणि कला यांसारख्या सांस्कृतिक गोष्टीमध्ये वान्शिकातेचे प्रतिबिंब दिसून येते. वांशिकता अनेकदा, सामाजिक एकता आणि संघर्षाचा प्रमुख स्त्रोत असतो. आज जगात जसे अनेक प्रचंड वांशिक गट आहेत, तसेच केवळ डझनभर लोक असलेले लहान वांशिक गट सुद्धा आहेत.

"वांशिकता" या शब्दाचा बौद्धिक इतिहास तुलनेने लहान आहे: १९७०च्या आधी, मानववंशशास्त्रीय साहित्य आणि किंवा पाठ्यपुस्तकांमध्ये याचा अगदी नगण्य उल्लेख असे. १९७० दशकाच्या मध्या पासून, वसाहतोत्तर बदलणाऱ्या भू-राजनीतीचा प्रतिसाद आणि अनेक औद्योगिक राष्ट्रांमध्ये वांशिक अल्पसंख्याकांच्या सक्रियतेचा उदय, म्हणून या संकल्पनेला मानवशास्त्रीय सिद्धांतामध्ये काही अंशी धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. सामाजिक आणि राजकीय बदल, राष्ट्रीय विशेषरुपतेची निर्मिती, सामाजिक संघर्ष, वंश संबंध, राष्ट्र-निर्माण, एकत्रीकरण इत्यादी वैविध्यपूर्ण घटनांचे स्पष्टीकरण देण्यामुळे वांशिकतेच्या सिद्धांतांचा प्रसार झाला आहे.

**वांशिकतेतील दृष्टीकोन**

वांशिकतेच्या आकलनासाठी तीन स्पर्धात्मक दृष्टिकोन आहेत. ते साधारणपणे आदिम, कारणीभूत आणि रचनावादी म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकतात. ढोबळपणे सांगायचे तर, वांशिक ओळख एखाद्या गटाच्या किंवा संस्कृतीच्या खोल, 'आदिम' संलग्नकांवर आधारित असते, असे आदिम सिद्धांत असे प्रतिपादन करतो. कारणीभूत दृष्टीकोनात वांशिकता एक राजकीय साधन ठरते, ज्याचा वापर करून नेते आणि इतर स्वतःचा फायदा करून घेतात. आणि रचनावादी दृष्टिकोन वांशिक अस्मितेच्या आकस्मिकता आणि प्रवाहीपणावर भर देतो, त्याला विशिष्ट 'सामाजिक' आणि ऐतिहासिक संदर्भांमध्ये बनवलेली गोष्ट मानण्याऐवजी (आदिम युक्तिवादांप्रमाणे) 'दिलेली' गोष्ट मानल्या जाते.

**वांशिकतेच आदिमवादी दृष्टिकोन:** वांशिकतेचा वस्तुनिष्ठ सिद्धांतात, आहेवती वांशिक ओळखीसाठी काही वास्तविक, मूर्त पाया आहे, ज्यात वांशिकतेला प्रामुख्याने दोन प्रकारात विभागले जाऊ शकते; जैविक घटना म्हणून आणि इतिहास आणि संस्कृतीचे परिपक्व उत्पादन म्हणून पहिले जाऊ शकते. मानवी स्वभाव आणि समाजाला समजून

घेणातल्या फरकामुळे, वैचारिक फरक येतो. उत्क्रांतीवादाचा जोरदार प्रभाव असलेल्या त्या सैद्धांतिक चौकटींमध्ये आहे, वंश सामान्यतः जीवशास्त्रावर आधारित आणि अनुवांशिक आणि भौगोलिक घटकांद्वारे निर्धारित केले जातो.

**वांशिकतेचे इतर सिद्धांत**

काही लेखक असे मानतात की गट संलग्नतेची मान्यता अनुवांशिकरित्या प्रसंकेतन करण्यात आलेली आहे, काही कुटुंब गटाच्या सदस्यांची अस्तित्व क्षमता जगण्यासाठी आवश्यक झाली आणि तेव्हापासूनच प्रारंभिक मानवी उत्क्रांतीची सुरुवात झाली. (शॉ आणि वोंग १९८९). वांशिकतेच्या सामाजिक-जीवशास्त्रीय व्याख्यांवर कठोर टीका केली गेली आहे (थॉम्पसन १९८९: २१-४८), परंतु, "मानवी वांशिक गट, वंशाच्या आधारावर विस्तारित नातेवाईक गट किंवा समूह आहेत", हा प्रमुख विचार 'अर्ध-नाते' (क्वासी-किन्शीप) गटांच्या चर्चेत सापेक्षतावाद्यांनी सात्मिकृत केला. (ब्राऊन १९८९: ६-८). स्पष्ट आदिमवादाचे, रशियन आणि सोव्हिएत मानववंश शास्त्रात समर्थन केले आहे. रक्त आणि मातीची एकता, अश्या नव-रोमँटिक संकल्पनेचे मूळ, हर्डरकृत व्होल्क मधे सापडते, एस. एम. शिरोकोगोरोव्हच्या कार्यात वांशिक संशोधनासाठी सकारात्मकतावादी कार्यक्रमात ते तयार केले गेले होते. शिरोकोगोरोव्हने 'एथनोस' (वंश) ची व्याख्या; 'समान भाषा बोलणारे आणि समान मूळ स्वीकारणारे, रूढी आणि जीवनशैलीच्या संचाद्वारे वैशिष्ट्यीकृत परंपरेने जतन आणि पवित्र केलेल्या 'लोकांचा समूह' अशी केली आहे, जे सारखे असूनही इतरांपेक्षा वेगळे आहेत' (१९२३: १२२). हाच दृष्टिकोन पुढे वाय.व्ही. ब्रॉमलीच्या कामात विकसित झाला, ज्यांनी 'एथनोस' (१९८१) ची अगदी समान व्याख्या दिली आहे आणि एल.एन. गुमिलेव (१९८९) यांनी देखील. गुमिलेव ह्यांनी एथनॉसच्या अस्तित्वावर 'जैवसामाजिक जीव' म्हणून विश्वास ठेवला आणि भौगोलिकदृष्ट्या निर्धारित केलेली प्रक्रिया म्हणून एथनोजेनेसिसच्या अभ्यासासाठी एक चौकट विकसित केली: एथनॉसच्या अस्तित्वाची वाढ वैश्विक ऊर्जा आणि भू-प्रदेशाचा एकत्रित परिणाम म्हणून दर्शविली गेली.

**कारणीभूत दृष्टिकोन:** १९६० दशकाच्या उत्तरार्धात, आधुनिकता आणि आधुनिकीकरणाच्या सिद्धांतांमध्ये, वांशिकतेला पूर्व-औद्योगिक सामाजिक व्यवस्थेचे अवशेष मानले गेले आणि हळूहळू ही एक क्षुल्लक बाबा मानली जाऊ लागली. आधुनिक राज्य, राष्ट्रीय एकात्मता आणि सदृशीकरण यांनी मात केलेली ही एक किरकोळ घटना होती. (१९६० – १९७०च्या दशकांच्या मध्यापर्यंत 'मेल्टिंग पॉट' किंवा सात्मिकरणाची विचारधारा, अमेरिकन सांस्कृतिक मानववंशशास्त्रात प्रचलित झाली होती.)

१९७० दशकाच्या मध्यापर्यंत, वांशिकतेची व्याख्या, एका समाजाच्या सांस्कृतिक आकृतीशास्त्राच्या संदर्भात, संरचनात्मकपणे केली गेली होती. (भाषिक, धार्मिक आणि वांशिक वैशिष्ट्ये 'प्राथमिक दिलेली' किंवा वांशिकतेचे 'आधार' म्हणून मानले जातात).

असे म्हंटले गेले की समाजातील विविध गटांमधील वस्तुनिष्ठ आणि कथित फरक, हा प्रत्येक  गटाचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी, आधार म्हणून काम करतात, ज्यामुळे परस्पर-गट संबंध आणि राजकीय एकत्रीकरणासाठी संदर्भ तयार होतो. राजकीय संघर्षांमध्ये आंतर-समूह संलग्नतेसाठी आधार म्हणून सांस्कृतिक स्नेहसंबंधांचा वापर केला जाऊ शकतो; परंतु त्यांना आधुनिक वांशिक २४१ राष्ट्रांनी तात्पुरते आणि किरकोळ अडथळे म्हणूनच पाहिले. तर, वांशिकतेच्या अभ्यासाच्या या सांस्कृतिक दृष्टिकोनामध्ये, त्याची व्याख्या समाजाच्या वस्तुनिष्ठ सांस्कृतिक संरचनेच्या दृष्टीने केली गेली होती (स्मिथ १९६९: १०४-५). प्रत्येक सांस्कृतिक गट वांशिक ओळख किंवा गट संलग्नतेची जाणीव विकसित करत नाही हे सामान्य निरीक्षण 'अव्यक्त किंवा' मूक 'वांशिकतेच्या संकल्पनेसाठी मानले जाऊ शकते. अनेकदा या कार्यप्रणालीने वेगळेच मानसशास्त्रीय वळण घेतले, आणि वांशिकतेला हरवलेला जातीय अभिमान पुनर्प्राप्त करण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणून नमूद करण्यात आले. (होरोविट्झ) असे असंख्य वाद-विवाद चालू राहिले आणि दरवेळेस त्यातून वान्शिकातेचा विचार विकसित होत गेला. तथापि, वांशिक समुदायाची व्याख्या आपण, 'अश्या लोकांचा समूह, ज्याचे सदस्य एक सामान्य नाव आणि संस्कृतीचे घटक सामायिक करतात, त्यांच्याकडे सामान्य मूळ आणि सामान्य ऐतिहासिक स्मृती आहे, जे स्वतःला एका प्रदेशाचे रहिवासी समजतात आणि त्या प्रदेशाशी त्यांच्या भावना जुडल्या जातात', अशी करू शकतो. आणि यावरूनच  वांशिक घटना समजून घेण्यासाठी मानवशास्त्रीय, राजकीय आणि मानसशास्त्रीय अश्या एकत्रित ज्ञानाच्या समाकलनासाठी मार्ग सुकर होतो .

**तुमची प्रगती तपासा:**

**१. वांशिकते**च्या सिद्धांतांवर चर्चा करा

___

___

___

**राजकारण आणि वांशिकता**

अनेकदा, वांशिकता, फायदे आणि सत्ता मिळवण्यासाठी, सांस्कृतिक उच्चभ्रूंनी तयार केलेली आणि हाताळलेली वस्तू म्हणून राजकीय मिथकांसाठी वापरली जाते. वांशिक गटांचे सांस्कृतिक रूप, मूल्ये आणि पद्धती अनेकदा राजकीय सत्ता आणि आर्थिक फायद्याच्या स्पर्धेत, उच्चभ्रूंसाठी संसाधने बनतात. काही वेळा मते मागण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो. कुठल्याही गटाच्या सदस्यांना ओळखण्यासाठी ते प्रतीक आणि संदर्भ बनतात, ज्यामुळे  राजकीय ओळख निर्माण करणे सोपे जाते. अशाप्रकारे, राजकीय आणि आर्थिक वास्तविकतेद्वारे निर्धारित केलेल्या सीमांमध्ये, उच्चभ्रू स्पर्धेच्या गतिशीलतेमध्ये वांशिकता निर्माण केली जाते (ब्रास १९८५).

**तुमची प्रगती तपासा**

१. राजकारण आणि वंशाच्या परस्परसंवादाची चर्चा करा

---

---

---

**वांशिकतेसाठी डीएनए चाचणी**

स्थलांतर, जबरदस्तीनचे स्थलांतर, दत्तक इत्यादीं बाबींमुळे, आपल्या मुलाशी संपर्क तुटलेल्या लोकांसाठी, आजच्या प्रगत तंत्रज्ञानाने, डीएनए चाचण्यांद्वारे स्वतःचे मूळ शोधणे सोपे झाले आहे. 23 and Me, My Heritage आणि Living DNA सारख्या सेवांद्वारे डीएनए चाचणी उपलब्ध आहे आणि त्यामुळे लोकांना त्यांच्या अनुवांशिक माहितीचा वापर करून त्यांची वंशावळ शोधता येते. डीएनएचे परीक्षण केल्याने एखाद्या व्यक्तीचे वंश आणि वांशिक पार्श्वभूमीबद्दल माहिती मिळू शकते. डीएनए चाचणीची तत्त्वे योग्य असली तरी, घरगुती चाचणी किटद्वारे ही सेवा देणाऱ्या खाजगी कंपन्यांवर आणि त्यांच्या कार्यपद्धतींवर टीका केली गेली आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१. तंत्रज्ञानाद्वारे स्वतःची वांशिक ओळख कशी जाणून घ्यायची ते सांगा**?**

---

---

---

## ५.४ बहुसांस्कृतिकता

### ५.४.१ **बहुसांस्कृतिकतेचा अर्थ**

बहुसांस्कृतिकता ही एक अशी परिस्थिती आहे ज्यामध्ये समाजातील विविध सांस्कृतिक किंवा वांशिक गटांना समान हक्क आणि संधी मिळून कोणाकडेही दुर्लक्ष केले जात नाही. समाजशास्त्रानुसार एखादा समाज राष्ट्रीय आणि समुदायिक स्तरावर, सांस्कृतिक विविधतेशी जो व्यवहार करतो, म्हणजेच बहुसांस्कृतिकता.

### **५.४.२ गृहीतक**

अनेक गृहितके आहेत ज्याद्वारे बहुसांस्कृतिकता कशी कार्य करते हे कळते; जसे विविध संस्कृतींचे सदस्य शांततेने एकत्र नांदू शकतात. कोणताही समाज सांस्कृतिक विविधतेचे जतन आदर आणि याच विविधतेला प्रोत्साहित करतच, समृद्ध होऊ शकतो असे बहुसांस्कृतिकता मानते. बहुसांस्कृतिकतेशी संबंधित दोन सिद्धांत आहेत, “सॅलड बाउल” सिद्धांत आणि “मेल्टिंग पॉट” सिद्धांत.

### ५.४.३ प्रक्रिया

परदेश गमन, स्थलांतर, शहरीकरण यांसारख्या अनेक कारणांमुळे एक समाज बहुसांस्कृतिक बनतो. उदाहरणार्थ – कॅनडा जगभरातील लोकांना त्यांच्या देशात राहण्यासाठी आमंत्रित करतो. त्यांना कायमस्वरूपी रहिवासी दर्जा देतो. असे करण्यामागे दोन कारणे आहेत: लोकसंख्या आणि जमिनीचे गुणोत्तर राखण्यासाठी हे केले जाते. त्यांच्याकडे जमीन भरपूर असली, तरी लोकसंख्या कमी आहे. क्लिफर्ड गीर्ट्झने प्रस्तावित केलेल्या बहुसांस्कृतिक संस्कृतीला 'प्रतीक आणि अर्थांची प्रणाली' म्हणून पाहिले, ज्याला त्यांनी कृतीसाठी अभिमुख नमुने म्हणून परिभाषित केले (कुपर १९९९: ७१).

### ५.४.४ बहुसांस्कृतिकता संबंधित चर्चा आणि वादविवाद.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, या चर्चेने, स्थलांतरित समाजातील बहुसांस्कृतिक नागरिकत्वाचे राजकारण आणि केवळ 'संस्कृती' हाताळण्याऐवजी भाषा किंवा धार्मिक अधिकारांची चिंता यावर लक्ष केंद्रित केले आहे. बहुसांस्कृतिकतेचे टीकाकार समाजवादी डावे आणि उदारमतवादी मध्य – उजवे, अशा दोन्ही बाजूंनी येतात. ह्यांत आधुनिकोत्तर मानववंशशास्त्रज्ञ, बहुसांस्कृतिकता स्त्रीवादी आणि मानवाधिकार कार्यकर्ते यांचा समावेश आहे. संस्कृती सर्जनशील आणि बदलटी आहे, अंतर्गत विवादित आणि विषम आहे या कल्पनेवर मानववंश शास्त्रातील वर्तमान सिद्धांत आधारित आहेत. प्रत्येक संस्कृतीतले लोक दुसऱ्या संस्कृतीकडून काही नवीन शिकतात आणि आत्मसात करतात, आणि म्हणूनच संस्कृती अपरिहार्यपणे संकरित आणि पारगम्य असते. याच कारणास्तव, संस्कृतींमधे एकसंध नेतृत्व कधीच नसते आणि जर का राज्याने तसे लादण्याचा प्रयत्न केल्यास तो खोटा पडतो आणि जाचक ठरतो. काळजीपूर्वक पाहिल्यास, प्रवासी लोकांमधे, डाव्या आणि उजव्या पक्षाच्या राजकीय संबंधांसह, अनेक छेदनबिंदू ओळखी तयार होतात. (वेर्बनेर २००२).

ओकिन (१९९९) सारख्या स्त्रीवादी, बहुसांस्कृतिकता धार्मिक नेत्यांच्या हाती जास्त सत्ता देते, असा युक्तिवाद करतात. सहसा, अश्या समाजात स्त्रियांच्या आयुष्यावर आणि त्यांच्या शरीरावर पुरुषच हक्क गाजवतात. स्त्रियांनी कोणते आणि कसे कपडे घालावे, लग्न कोणाशी करावे किंवा घटस्फोट घ्यावा किंवा नाही, किती मुले, कधी होऊ द्यावीत, हे सगळे अधिकार, एक समान नागरिक म्हणून स्त्रियांना नाकारले जातात.

आजच्या मानवी हक्कांच्या मते, व्यक्ती आणि समुदायाला त्यांची संस्कृती आणि परंपरा जोपासणे, वाढवणे आणि संरक्षित करण्याचा अधिकार आहे, परंतु त्याचप्रमाणे भाषण स्वातंत्र्य आणि हिंसाचारापासून मुक्ती आहे, ज्यामुळे काही पारंपारिक पद्धती, जसे सक्तीचा विवाह, असे अधिकार नाकारल्या जातात. अशा प्रकारे, बहुसांस्कृतिकतेचे विरोधाभास आहेत.

बहुसांस्कृतिच्या विरोधात असलेले उदारमतवादी असा युक्तिवाद करतात की एक चांगली लोकशाही नागरी समाज आणि खाजगी क्षेत्रात वांशिक आणि धार्मिक अभिव्यक्तीसाठी पुरेशी संधी देते. सांस्कृतिक हक्कांना प्राधान्य दिल्यास कायद्यासमोर समानतेचे सार्वत्रिक वैयक्तिक हक्क धोक्यात येतात.

अल्पसंख्याकांना आक्षेपार्ह प्रतीकात्मक आणि नागरी किंवा भौतिक बहिष्कार आणि उल्लंघनांपासून संरक्षण आवश्यक आहे, असे तलाल असद (१९९३) ह्यांचे म्हणणे आहे. एक युक्तिवाद असा आहे की पाककृती, संगीत, किंवा सण आणि उत्सव ह्यांनाच बहुसांस्कृतीकता असे दाखवून, त्या मागे आर्थिक आणि राजकीय असमानता लपवली जाते. याकडे लक्ष देण्याऐवजी, सरकार बहुसांस्कृतिक उत्सवांना निधी देते आणि वास्तविक समस्या जसे, वंचीतता आणि भेदभाव, याकडे पाठ फिरवते. म्हणूनच, बहुसांस्कृतिकता आणि अस्मितेचे राजकारण भांडवलदार समाजातील वंचितांच्या दडपशाहीला धूसर करते आणि वंशविरोधी चळवळींना विभाजित करते. उजव्या आणि डाव्या, दोन्ही बाजूचे समीक्षक असे मानतात की बहुसांस्कृतिकता हे वरून खालपर्यंत सरकारी षडयंत्र आहे. स्थानिक मान्यता मिळवण्याच्या संघर्षांच्या पलीकडे, बहुसांस्कृतिकता आज राष्ट्रीय सदृशवादी दबावांविरूद्ध एक जागतिक चळवळ बनली आहे. अल्पसंख्याकांनी स्वायत्तता, मान्यता आणि सरकारात स्थान किंवा स्थानिक राज्याच्या वित्तीय मागणीसाठी केलेल्या विविध संघर्षांचा संदर्भ देते. बहुसंस्कृतीवादाचा विचार हा केवळ त्या संस्कृतीवर प्रकाश टाकणे म्हणून विचार करण्याऐवजी, समान आणि न्याय्य नागरिकत्वाचे राजकारण म्हणून विचार करणे आवश्यक आहे; लोकशाहीत राजकीय समुदायामध्ये 'भिन्न' होण्याच्या अधिकारावर आधारित आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१. बहुसांस्कृतिकता म्हणजे काय? थोडक्यात सांगा.

___

___

___

___

**५.४.५ बहुसांस्कृतिकतेतील बदल**

आधुनिक काळातील भांडवलशाही गट घेऊन जात असलेल्या, एकसंवर्ध संस्कृतीकडे आपण जात आहोत का? हा एक महत्त्वाचा प्रश्न आपल्याला विचारण्याची गरज आहे. असे गट केवळ भारतातच नसून संपूर्ण जगात दिसतात. जर उत्तर होय असेल तर या गोष्टी, कश्या काम करतात ते पाहूया. चला काही उदाहरणां करवे या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करूया.

**ग्राहकवाद-** आपल्या उत्पादनांच्या निवड प्रक्रियेत बाजारातील विविध खेळाडूंनी मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. आपण **Amazon** चे उदाहरण घेऊ. ॲमेझॉन प्राइम मेंबरशिपसह मोफत होम डिलीव्हरी देते. त्यामुळे स्थानिक दुकाने असलेल्या छोट्या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. बरेच लोक **Amazon** वरून खरेदी करण्यास प्राधान्य देतात कारण तेथे एक विस्तृत पर्याय उपलब्ध असतो. उत्पादनांवर ग्राहकांचे परीक्षण असते, ते वाचून इतर ग्राहक खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकतात. जेव्हा केंव्हा ऑफर जाहीर होतात तेंव्हा आपण अधिक खरेदी करतो.

**खाण्याच्या सवयी -** Zomato, Swiggy कडून जेवण मागवणे वाढत आहे, विशेषतः कार्यालयात काम करणाऱ्यांमध्ये ही वाढ प्रकर्षाने जाणवते. प्रत्येकाने किमान एकदा तरी जेवण मागवले असेल किंवा ऑनलाइन वितरित केलेले अन्न खाल्ले असेल. या कंपन्या अन्न आणि तंत्रज्ञान उद्योगात नूतनीकरण आणत आहेत. परिणामी, उदारीकरणानंतर उदयास आलेल्या नवीन खाद्य संस्कृतीमुळे देशात लठ्ठपणा वाढतो. तुम्ही फक्त हुकुम करा आणि अन्न तुमच्या समोर हजार असते.

**वाहतूक –** सामान्य लोकांत श्रीमंतीच्या काही परिभाषा असतात आणि त्यातली एक म्हणजे घरी गाडी असणे. पण आता जर तुम्हाला कार घेणे परवडत नसले तरी तुम्ही झूम, ओला, उबेर सारख्या गाड्यांचा वापर करू शकता.

**अति माहिती –** आधीच्या काळात ज्ञानार्जनाच्या सोयी मर्यादित गटासाठीच उपलब्ध होत्या. त्यांनी ते जपले आणि पुढच्या पिढीला दिले. आता मात्र सर्वजण इंटरनेट आणि मास मीडिया वापरत आहेत. एकाच कल्पनेवर अनेक मते तयार होत आहेत. व्हायरल व्हिडीओ किंवा माहितीचे उदाहरण घेऊ - सुशांत सिंग. एकच माहिती वारंवार प्रसारित केली जाते त्यामुळे माणूस त्याच एका घटनेबद्दल किंवा व्यक्तीबद्दल विचार करत राहतो.

**इंस्टाग्राम आणि यूट्यूब –** अगोदर समाजात ठसा पाडण्यासाठी व्यक्ती कुटुंबात, मित्रामध्ये, कामाच्या ठिकाणी किंवा शाळेतल्या मित्रांमध्ये मिसळत असे. आता मात्र इन्स्टाग्राम, टिकटॉक, यूट्यूब ह्याचे चलन आहे. शहरांमध्ये राहणाऱ्या सगळ्याच मिलेनियाल्स्ना सेल्फी घेणे आणि इन्स्टाग्राममध्ये रील तयार करणे ठाऊक आहे. हे कळपाच्या वर्तनापेक्षा वेगळे नाही, जिथे एका मागून सर्व त्या एकाचे अनुसरण करू लागतात. समाजशास्त्रीयदृष्ट्या, हे सर्व समवयस्क दबाव, कुठेतरी न असण्याचा न्यूनगंड, किंवा फॅड मुळे होत आहे. तथापि, याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर व्यक्तींच्या वर्तनावर होतो आहे, प्रत्येकाला त्वरित उत्तरे हवी असतात; जेव्हा एखाद्याला झटपट परिणाम मिळतो तेव्हा मेंदूमधून जास्त प्रमाणात डोपामाइन सोडले जाते. आणि मग हे चक्र सुरु राहते. ह्यामुळे माणसाच्या एकाग्रतेवर आणि अनेकदा व्यक्तीच्या अत्मासंमानावर देखील विपरीत परिणाम होऊ शकतो.

आपण आता दृश्य संस्कृतीच्या युगात प्रवेश करत आहोत. कंपन्या या संस्कृतीची पूर्तता करणारी उत्पादने, म्हणजे ऑनलाइन कार्ड पेमेंट असो किंवा नाते-संबंध असोत, सगळे काही स्वाइप संस्कृतीट तयार होत आहेत. कंपन्या अशा प्रकारची एकसंध संस्कृती

बनवत आहेत जेणेकरून त्यांना मोठ्या गटाला मोठ्या प्रमाणात वस्तू विकणे सोपे होईल. सांस्कृतिक अभ्यासाच्या भाषेत आपण याला जनसंस्कृती म्हणू. परंतु ह्या कंपन्या, सोशल मीडियावर प्रकाशित, आपली सर्व माहिती वापरतात. आपल्याला उत्पादने विकण्यासाठी, ती माहिती  गुगलवर शोधतात किंवा अमेरिकेतील केंब्रिज ॲनालिटिका प्रकरणाप्रमाणे मते मिळवण्यासाठी वापरतात. मात्र अजूनही उपेक्षित, अल्पसंख्याकांचे प्रश्न आहेत, जे अद्याप सुटलेले नाहीत. शांततापूर्ण जगासाठी विविधता स्वीकारणे हा एकमेव उपाय आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१. बहुसांस्कृतिक समजतील बदलांचा मागोवा घ्या आणि त्यावर चर्चा करा

---

---

---

## ५.५ सारांश

हा धडा राष्ट्राला समजून घेण्यापासून सुरु केला. राष्ट्र म्हणजे प्रादेशिक बंधन असलेले सार्वभौम सरकार. (म्हणजे, एक राज्य) ज्या नागरिकांच्या समूहाच्या नावाने राज्य केले जाते त्याला राष्ट्र म्हणून ओळखतात. दुसऱ्या भागात आपण वांशिकते बद्दल शिकलो; एक समान राष्ट्रीय किंवा सांस्कृतिक परंपरा असलेला गट. आज जगात जसे अनेक प्रचंड वांशिक गट आहेत, तसेच केवळ डझनभर लोक असलेले लहान वांशिक गट सुद्धा आहेत.

राजकारण, संस्कृती, स्थलांतर, युद्ध इत्यादींद्वारे वांशिक गटांना अनेकदा उपेक्षिले गेले आहे. आधुनिक काळात, एखाद्याची वांशिक ओळख आणि मूळ शोधण्यासाठी आज My Heritage आणि Living DNA सारख्या अनेक वेबसाइट्स उपलब्ध आहेत. धड्याच्या शेवटच्या भागात आपण बहुसांस्कृतिकते बद्दल शिकलो. बहुसांस्कृतिकता ही एक अशी परिस्थिती आहे ज्यामध्ये समाजातील विविध सांस्कृतिक किंवा वांशिक गटांना समान हक्क आणि संधी मिळून कोणाकडेही दुर्लक्ष केले जात नाही. आपण बहुसांस्कृतिकता समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि भारतीय समाजातील भांडवलशाही उपक्रमांद्वारे होणाऱ्या संक्रमणाकडे देखील पाहिले.

## ५.६ प्रश्न

१. राष्ट्र, त्याचे मूळ, त्याचे सिद्धांत आणि त्याच्याशी संबंधित उदयोन्मुख आव्हाने स्पष्ट करा.
२. वांशिकता आणि त्याच्या सभोवतालचे दृष्टिकोन आणि सिद्धांत थोडक्यात स्पष्ट करा.
३. बहुसांस्कृतिकता आणि त्याच्या सभोवतालचे वादविवाद स्पष्ट करा

❖❖❖❖

# ६

## क्षेत्रकार्य आणि प्रतीक्षिप्तता, अभिजात वंशस्त्राची चिकित्सा

## FIELDWORK AND REFLEXIVITY, CRITIQUE OF CLASSICAL ETHNOGRAPHIES.

**सचिन सानगरे**

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ क्षेत्रकार्य आणि मत यांच्यातील फरक
६.३ क्षेत्रकार्य प्रक्रिया समजून घेणे
६.४ क्षेत्रकार्यचे फायदे
६.५ क्षेत्रकार्यचे तोटे
६.६ क्षेत्रकार्यक ( क्षेत्र कार्य अभ्यासक) साठी आवश्यक गुण.
६.७ प्रतिक्षेप
६.८ अभिजात मानवशास्त्राची चिकित्सा
६.९ सारांश
६.१० प्रश्न
६.११ संदर्भ

## ६.० उद्दिष्टे: OBJECTIVES :

- क्षेत्रकार्यबद्दल तपशीलवार समजून घेणे.
- संशोधनात प्रतिक्षेपबद्दल जाणून घेणे.
- अभिजात मानव अभ्यास काही विद्वानांच्या कार्यासह समजून घेणे

## ६.१ प्रस्तावना: INTRODUCTION:

हा अध्याय व्यावहारिक दृष्टिकोनातून क्षेत्रकार्य आणि प्रतीक्षिप्तता वर प्रतीक्षिप्ततावर चर्चा करेल, म्हणजे, आपण या क्षेत्रात कसे सामोरे जाल. दोन दृष्टिकोन आहेत ज्यात कोणत्याही गोष्टीचा अभ्यास केला जाऊ शकतो. पहिले पुस्तक दृश्य ( book

view) आणि दुसरे क्षेत्र दृश्य (field view) . तपशीलात येण्यापूर्वी, क्षेत्र म्हणजे काय हे समजून घेण्यास सुरुवात करूया. क्षेत्र असे आहे जिथे एखादी व्यक्ती स्वतः अभ्यास करत असते किंवा एखाद्या विषयाचा तिच्याकडून अभ्यस केला जातो. एम.फिल, पीएचडी सारखे विद्यापीठ उपक्रम जेथे विद्यार्थी स्वतः अभ्यास क्षेत्रात जातात. तथापि, अशासकीय संस्थांनी केलेल्या मोठ्या प्रकल्पांमध्ये प्राध्यापकांचा एक संघ सहभागी असतो. उदाहरणार्थ - जनगणनेच्या सर्वेक्षणादरम्यान, लोक तुमच्या घरी येतात आणि प्रश्न विचारतात. भारताचे मुख्य आयुक्त तुमच्या दारात येत नाहीत, पण प्रशिक्षित क्षेत्रकार्य अभ्यासक तुमच्या घरी येतात. ज्या व्यक्तीला प्रश्न विचारण्यासाठी भेट दिली जाते त्याचे घर हे क्षेत्र असते म्हणजे तुमचे घर क्षेत्र आहे. प्रश्न विचारणारी व्यक्ती क्षेत्रकार्यक ( क्षेत्र कार्य अभ्यासक) आहे.

## ६.२ क्षेत्रकार्य आणि मत यांच्यातील फरक : DIFFERENCE BETWEEN FIELDWORK AND OPINION:

क्षेत्रकार्य म्हणजे काय हे समजून घेऊन आपण या अध्यायाची सुरुवात करूया. एक उदाहरण घेऊ. कल्पना करा की तुम्ही बसमध्ये बसलात आणि अचानक पाऊस सुरू झाला. बस हळू हळू चालू लागते, तुम्ही आता कंटाळलात आणि तुमच्या शेजारी असलेल्या अनोळखी व्यक्तीशी बोलायला सुरुवात कराल. तुम्ही म्हणाल, 'आज मुसळधार पाऊस नाही का? होय, दुसरी व्यक्ती प्रतिसाद देते. ते असेही म्हणतात की या दिवसात हवामान बेभरवशी आहे. आता, या संभाषणाला तुम्ही क्षेत्रकार्य म्हणू शकता. उत्तर नाही हे आहे. हे फक्त एक संभाषण आहे. तथापि, जर तुम्ही एका महिन्यासाठी दररोज एकाच बसने प्रवास करत असाल आणि त्या व्यक्तीशी बोलाल आणि बसमध्ये त्याच्या प्रवासाच्या अनुभवांबद्दल जाणून घ्याल की तो लहानपणी कसा होता. आपण समस्या, अडचणी यासारखे काही प्रश्न देखील जोडता. तुम्ही लिंग, वय, धर्म किंवा कोणत्याही विशिष्ट निकषांनुसार माहिती गोळा करता आणि नंतर त्यावर आधारित निरीक्षणे काढता, त्याला क्षेत्रकार्य म्हटले जाऊ शकते. क्षेत्रकार्य दरम्यान आपल्याला काही मुद्दे देखील लक्षात ठेवावे लागतात की क्षेत्रकार्य हे नृत्य आणि संगीत सारखे एक कला प्रकार आहे. क्षेत्रकार्य स्वतःमध्ये शिकण्यासाठी आणि विकसित होण्यासाठी वेळ लागतो. प्रत्येक क्षेत्र एकमेकांपेक्षा वेगळे आहे. आपण अनुभवत असलेले अनुभव आणि लोक दोन्ही बदलत जातील. तुम्ही कितीही सज्ज असलात तरी, तुम्हाला अभ्यासक्षेत्रात आश्चर्य वाटेल असे काही घटक असतील. यामुळे एक माणूस आणि एक संशोधक म्हणून आपल्यातील संस्कृती, आदर, कौतुक आणि इतर भावनांना धक्का बसू शकतो.

## ६.३ क्षेत्रकार्य प्रक्रिया समजून घेणे : UNDERSTANDING THE FIELDWORK PROCESS :

आपण एक उदाहरण घेऊ - कल्पना करा की तुम्हाला अंटार्क्टिकाबद्दल अभ्यास करावा लागेल. त्याचा अभ्यास करण्याचे दोन मार्ग आहेत. तुम्ही ग्रंथालयात जाऊन

अंटार्क्टिकाचा अभ्यास करत आहात आणि त्यावर एक अहवाल लिहित आहात, याला पुस्तक दृश्य म्हणतात. दुसऱ्या शब्दांत, तुम्ही तुमचे संशोधन परिणाम इतर कोणाच्या माहिती, सामग्री, दस्तऐवज अभ्यासाच्या आधारे लिहित आहात इ. त्याच अंटार्क्टिकावर जर तुम्ही स्वतः विमानाने जात असाल, सर्व कागदपत्रे स्वतः निर्मित केलीत. कदाचित तुम्हाला या मार्गात आव्हानांना सामोरे जावे लागेल, जसे दस्तऐवजीकरण पूर्ण करणे. तुमच्या स्वतःच्या अस्तित्व ( जीविताबद्दल) वगैरे बद्दल भीतीदायक विचार मानत येतील आणि नंतर तुम्ही अंटार्क्टिकाच्या तुमच्या गंतव्यस्थानावर पोहचता आणि मग तुम्ही त्याबद्दल लिहाल. तुमच्यावर आणि त्याबद्दल लिहिणे याला क्षेत्रकार्य असे म्हटले जाईल. येथे तुम्ही स्वतः एक प्रक्रिया पार केली आहे. काही आव्हाने, अडथळे आहेत ज्याचा तुम्ही सामना केला आहे. शिकणे आणि वैयक्तिक अनुभव याचे एकत्रीकरण आहे, जे विशेष आहे आणि जे तुम्ही स्वतः शिकलात. हा अनुभव तुमच्यासाठी अद्वितीय आहे; इतर कोणाकडेही हे नाही. म्हणूनच, जेव्हा आपण त्याबद्दल लिहाल तेव्हा तो क्षेत्रकार्य अहवाल (फील्ड रिपोर्ट) असेल. स्वस्त विमान तिकीट शोधण्याची प्रक्रिया, कोणाची मुलाखत घ्यायची आणि त्याबद्दल कसे नियोजनबद्ध जायचे, हे सर्व तुमचे क्षेत्रकार्य आहे. अशी कल्पना करा की तुम्ही अंटार्क्टिकामध्ये सुमारे ७ महिने घालवलेत आणि तुम्ही त्यांचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली, स्थानिकांशी बोलणे, त्यांचे सण पाहिले, असलेल्या प्रत्येक गोष्टीच्या टिपण (नोट्स) बनवल्या हे सर्व सामग्री संकलन. दुसऱ्या शब्दांत, या उदाहरणाद्वारे, ज्यायोगे तुमची प्रत्यक्ष उठबस करून (स्थानिक लोकांसोबत) एखाद्या विषयाचा (समस्येचा) अभ्यास करण्यासाठी जी पावले उचलत आहात ते सर्व क्षेत्रकार्य आहे. हे उदाहरण आपल्या अध्यायात आणखी कसे बसते ते पाहूया.

## ६.४ क्षेत्रकार्याचे फायदे / लाभ : ADVANTAGES OF FIELDWORK:

क्षेत्रकार्य करण्याचे अनेक फायदे आहेत. तुम्ही विषयाशी जवळीक साधता. विश्वास आणि समजुतीवर आधारित वैयक्तिक संबंध निर्माण होतात - या गोष्टी संख्यात्मक किंवा सकारात्मक परंपरेत सापडत नाहीत. क्षेत्रकार्य आपणाला केवळ वरवरच्या समस्या समजण्यापेक्षा, समस्येच्या मुळापर्यंत जाण्यास मदत करते.

## ६.५ क्षेत्रकार्याचे तोटे / हानी : DISADVANTAGES OF FIELDWORK:

हे प्रचंड वेळखाऊ आहे. संसाधनांचाही अपव्यय होतो, कारण एखाद्याला राहण्यासाठी जागा शोधावी लागते. अभ्यास क्षेत्रात संबंध विकसित करा. आपण फक्त जावे आणि एखाद्याला यादृच्छिक प्रश्न विचारू यावे असे होऊ शकत नाही. विश्वास विकसित करावा लागतो, ज्यास बराच वेळ लागतो. ज्यातून अभ्यासक मोठा झाला आहे ती संस्कृती आणि ज्या लोकांचा अभ्यास केला जात आहे त्यांची संस्कृती वेगळी असेल, तर एक पक्षपात जाणूनबुजून, नकळत उदयास येऊ शकतो. अभ्यासक्षेत्रात नकारात्मक अनुभव

असू शकतात जे संशोधकाला हानी पोहोचवू शकतात किंवा उलट हि होते. उदाहरणार्थ, अनेक श्वेतवर्णीयांनी श्वेत नसलेल्या समाजाचा अभ्यास केला आहे, आणि विशेषतः आदिवासी समाजांचे नकारात्मक चित्रण केले आहे. तेथे शक्तिशाली घटक आहेत जे संशोधक आणि संशोधन यांच्यामध्ये येऊ शकतात. या गोष्टी काही वेळा संशोधनाचे निष्कर्ष (फलित) चुकीचा बनवतात.

**तुमची प्रगती तपासा**

१. क्षेत्रकार्यबद्दल आपली समज स्पष्ट करा?

२. क्षेत्रकार्यच्या तोट्यांची चर्चा करा?

म्हणूनच, नैतिकता हा संशोधनाच्या प्रशिक्षणाचा आणि क्षेत्रीय कार्याचा अविभाज्य भाग असावा.

## ६.६ क्षेत्र अभ्यासकासाठी ( क्षेत्रकार्यक साठी ) आवश्यक गुण - QUALITIES REQUIRED FOR FIELDWORKER ;

**१. सहानुभूती -** इतर व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या पार्श्वभूमीवरून समजून घेणे खूप महत्वाचे आहे. एखाद्याला दुसऱ्या व्यक्तीचे स्थान, दिसणे, शिक्षण, रचना वरून पहावे लागते.

**२. प्रामाणिकपणा -** प्रामाणिकपणामुळे संशोधकांमध्ये विश्वास निर्माण होतो. तथापि, हे आव्हानात्मक आहे, तरीही प्रामाणिकपणाचा सराव केल्याने केवळ तुमच्यासाठीच नव्हे तर तुमच्या नंतर त्या विशिष्ट गटाचा अभ्यास करण्यासाठी येणाऱ्या संशोधकांसाठी देखील संबंध निर्माण होण्यास मदत होते .

**३. ऐकण्याचे कौशल्य -** जर तुम्ही तुमच्या उत्तर दात्याचे ऐकत नसाल तर ते त्यांचे विश्वदृष्टी ( जीवनदृष्टी )तुमच्याशी भागीदारी करणार नाहीत. त्यांच्याशी बोलणे, त्यांचे मत ऐकणे यामुळे समोरच्या व्यक्तीला तुमच्याशी सुसंगत वाटते आणि यामुळे एक संबंध विकसित होतो आणि पुढे एक समुदाय आणि बंध निर्माण होतो. हे तुम्हाला स्व समजून घेण्यास मदत करेल.

**४. विसर्जन ( संशोधन कार्यात झोकून देणे )-** विसर्जन हा क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे. तुम्ही जितके अधिक स्वतःला झोकून द्याल आणि लोकांच्या दृष्टिकोनातून पहाल तितके तुम्ही क्षेत्रातील जगाचे स्पष्ट चित्र मिळवू शकाल. जेवढे मनापासून अभ्यास कार्य कराल तेवढे अधिक सखोल व वास्तववादी अध्ययन करता येईल.

**५. प्रश्न विचारणे -** संभाषणातील लोकांमध्ये स्वारस्य निर्माण करण्यासाठी योग्य प्रश्न विचारणे महत्वाचे आहे. अनावश्यक प्रश्न किंवा संवेदनशील प्रश्न फार काळजीपूर्वक विचारले पाहिजेत जसे की जात, वय, पगार इत्यादी. जर ते तुमच्या विषयाशी थेट संबंधित नसेल तर ते टाळणे चांगले कारण ते मुलाखत अगदी वेगळ्या कोनात नेऊ शकते. जर तुम्ही लोकांना हे प्रश्न विचारले तर तुम्ही त्यांना का विचारत आहात हे स्पष्ट करणे उचित ठरते. यामुळे ते प्रश्नांची पार्श्वभूमी समजून घेतात. संकलित केलेल्या माहितीचा गैरवापर होणार नाही असा विश्वास वाढवतात.

**६. तपशीलवार चौकशी -** जर तुम्ही बातमी पाहिली असेल तर एक रिपोर्टर माईकसोबत मुलाखत घेतो. तो माईक पकडतो आणि आजूबाजूच्या लोकांना विचारतो की या 'आप को क्या लगता है', ....बद्दल तुम्हाला काय वाटते? ती व्यक्ती त्याच्या उत्तरासह प्रतिसाद देते. जेव्हा ती उत्तर देणारी व्यक्ती शब्दांनी अडखळते, त्या वेळी, रिपोर्टर सामान्य व्यक्तीकडून अधिक उत्तरे मिळवण्यासाठी काही शब्द जोडतो. हे तपशीलवार चौकशी आहे. यामुळे समस्येचे तपशील मिळण्यास मदत होते आणि स्पष्ट उत्तरे मिळण्यास मदत होते. हा एक कौशल्य संच आहे जो एखाद्याला शिकणे आवश्यक आहे.

**७. नम्रता -** जेव्हा तुम्ही अभ्यास क्षेत्रात असता तेव्हा नम्रता ही एक संपत्ती असते. जर तुम्ही नवीन शिकण्यास तयार असाल, स्थानिक लोक तुमच्यावर हसले तरी तुम्ही लोकांबद्दल अधिक जाणून घ्याल. नम्रता संशोधक आणि संशोधित लोकसंख्येमधील अंतर कमी करण्यास मदत करेल. तुम्ही ज्यांचा अभ्यास करत आहात त्यांचा जर तुम्ही आदर कराल, तर ते तुमचाही आदर करतील.

**८ . नैतिकता -** संशोधनात नैतिक असणे खूप महत्वाचे आहे. तुम्ही तुमच्या कामातील सहभागींचे आभार मान्य करता, पैसे देऊन सामग्री मिळवत नाही, कोणत्याही प्रकारे बनावट सामग्री करत नाही. हे नैतिक दृष्ट्या आवश्यक आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१. क्षेत्रकार्यकसाठी ( क्षेत्रकार्य संशोधकसाठी ) आवश्यक गुणांची चर्चा करा?

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

## ६.७ प्रतिक्षेप : REFLEXIVITY :

गुणात्मक संशोधनाशी अपरिचित असणाऱ्यांसाठी, ते कसे करावे हे शिकणे त्रास देणारे असू शकते, विशेषत: जटिलतेवर आणि उदयोन्मुख रचनांवर प्रतिमानाचा जोर दिल्यास कठीण होईल. जरी साहित्यात (वाङमयात) मानके असली तरी प्रत्येक अभ्यास अद्वितीय आहे आणि शेवटी पुढे कसे जायचे हे संशोधकाने व्यक्तिगत ठरवले पाहिजे. प्रतीक्षिप्तता मध्ये अन्वेषण ( आशय विश्लेषण ) आणि संपूर्ण संशोधन प्रक्रिया या दोन्ही घटनांचे आकलन समाविष्ट आहे. प्रतिक्षिप्त दैनंदिनी वापरून, पहिल्यांदा लेखक प्रकल्पाला पडद्यामागील दृष्टी देतो, सिद्धांत आणि सराव (वास्तविकता) यांच्यातील अंतर

कमी करतो. ही वैयक्तिक गोष्ट अभ्यासाच्या दरम्यान आणि नंतर दोन्ही, प्रतिबिंबित करण्याच्या गरजेवर जोर देते आणि यामुळे क्षेत्रकार्य व्यवसायात नवीन आलेल्यांना संशोधन प्रक्रिया समजण्यास मदत होऊ शकते.

क्षेत्रकार्य, किंवा संशोधन आयोजित करणे, प्रत्येक संशोधकाला विविध प्रकारे बदलते. फील्ड रिसर्चर्स म्हणून, तुम्ही प्रतीक्षिप्तता म्हणून ओळखले जाणारे अनुभव शिकण्यात गुंतता. संशोधन प्रक्रियेच्या परिणामस्वरूप तुमच्यामध्ये झालेले बदल आणि या बदलांनी संशोधन प्रक्रियेवर कसा प्रभाव टाकला ते येथे तपशीलवार आहे. संशोधक म्हणून आपण कसे शोधले आणि शोधप्राप्तीद्वारे आकारास कसे आणले हे शोधण्याची प्रक्रिया स्पष्ट करते. गरिबी, विकास, लिंग, स्थलांतर आणि जनआरोग्य यासारख्या विविध सामाजिक समस्यांविषयी जाणून घेण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी केलेले प्रयत्न शिकवून जातात. आपल्या प्रतीक्षिप्तता टिपणांमध्ये नोट्स/अंतर्दृष्टींमध्ये, आपण आपल्या ज्ञानरचनावादी दृष्टिकोन आणि वैयक्तिक व पद्धतविषयक समस्यांमध्ये आपण अनुभवलेल्या समस्यांवर चर्चा करतो. जेव्हा संशोधक या बदलांना ओळखतात, तेव्हा संशोधनातील प्रतिक्षेप हा अभ्यासाचा एक घटक बनतो. या चेतनेद्वारे, आपण, आपले सहकारी/सह-संशोधक, आणि संशोधन प्रकल्पाशी संबंधित सर्वजण वैयक्तिक आणि पद्धतीविषयक समस्यांच्या संबंधात्मक आणि प्रतिक्षिप्त स्वरूपाबद्दल जागरूक होतो. प्रतिक्षिप्त संशोधन प्रक्रियेत, आपणास संशोधक म्हणून अर्थनिर्मिती आणि सचेत (जिवंत) अनुभवांच्या निर्मितीसाठी आपल्या योगदानाची जाणीव असणे आवश्यक आहे. आपण अध्यायच्या आधीच्या भागात चर्चा केलेल्या अंटार्क्टिकाचे उदाहरण आठवूया, प्रक्रिया आणि अडचण आणि भयभीत करणारे विचार हा तुमचा प्रतिबिंबित अनुभव आहे. क्लिफर्ड गीर्ट्झ यांचे बाली मधील उदाहरण- जेव्हा ते लोकांना भेट देत होते आणि ते लोक त्याच्याशी बोलायला तयार नव्हते. जेव्हा त्याने याबद्दल लिहिले जेथे बाहेरील व्यक्तीला स्वीकारले जात नाही आणि नंतर स्वीकारले जाते, हा त्याचा प्रतिक्षिप्त अनुभव आहे.
उपक्रम कार्य -

कल्पना करा की तुम्ही कलिना (फील्ड) मध्ये बालमजुरीचा अभ्यास करणार आहात. तुम्हास कोणती पावले उचलावी लागणार आहेत ?

१ . मुले कुठे आहेत ते शोधा - ट्रॅफिक सिग्नल. (विषय)
२ . आपण त्यांच्याशी कसे संपर्क साधणार आहात याची योजना करा.
३ . तुम्ही त्यांना विचारण्यासाठी प्रश्नांची यादी कराल (प्रश्नावली)
४ अभ्यास क्षेत्रात आपल्या निरीक्षणाबद्दल टिपण (नोट्स) बनवाल. (माहिती संकलन)
५ . त्या मुलांची गोष्ट ऐकल्यावर तुमच्या स्वतःच्या भावना, भीती, संघर्ष लिहाल. (प्रतिक्षेप)
६ . आपल्या प्रकल्पात सर्वकाही समाविष्ट कराल. (निष्कर्ष)

वंचिततेचे " पुनर्सादरीकरण " सत्तेच्या परिमाणातून पहावे लागेल. वंचित नागरिक हा केवळ नागरिकत्वाच्या तांत्रिक प्रश्नाबद्दल नाही. त्याऐवजी, एक समाज आणि त्याच्या स्वत: च्या संरचनेबद्दल ऐतिहासिक संस्था आणि संबंधित दावा आहे. ही २०० वर्षे आणि त्याहून अधिक कालावधीची लढाई आहे, दडपशाहीग्रास्थ आणि अधीनस्थांनी (वंचीतानी) चालवलेला संघर्ष आहे. सबल्टरन्ससाठी, ते समान म्हणून ओळखण्यासाठीचा संघर्ष आहे. या प्रयत्नांचा इतिहास समानतेचा इतिहास म्हणून प्रकट झाला. तथापि, २० व्या शतकाच्या उत्तरार्धात, हा संघर्ष आणखी एक मागणी समाविष्ट करण्यासाठी वाढवला गेला - फरक ओळखण्याची मागणी - विविध अनुभवांचे अस्तित्व ज्याने मानवी अनुभवाची विविधता, घनता आणि समृद्धी स्पष्ट केली. हा विरोधाभास आहे ज्याला उत्तर देण्याची गरज आहे, सबल्टर्नर नागरिकांच्या संरचानांवर चर्चा करताना: समानतेसाठी दीर्घकालीन संघर्ष हा नवीन ओळखल्या जाणाऱ्या अधिकारामध्ये कसा जोडला जावा? हेन्री लेफब्रेव्हच्या शहरांचा अधिकार व हक्क (right to the city) याकडे जाण्यासाठी जेथे उपेक्षित गटांना शहराच्या मध्यवर्ती भागासह परिघावर स्थानांतरित केले जाते त्या ठिकाणी वंचित नागरिकत्व उत्तम प्रकारे स्पष्ट केले जाऊ शकते. तर, येथे मागणी अशी आहे की धोरणे बनवताना, भूप्रदेश बदलताना आणि गगनचुंबी इमारती बांधताना स्थानिक नागरिकांना समाविष्ट करावे लागेल. यामुळे राज्य आणि लोकांमध्ये आपुलकीची भावना आणि सौहार्दपूर्ण संबंध निर्माण होतील.

**तुमची प्रगती तपासा**

१. संपर्श्विक वळण आणि शहरीकरण यावर चर्चा करा?

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

## ८.८ सारांश : SUMMARY :

या अध्यायात आपण वंचित (Subaltern) चा अर्थ समजून घेऊन सुरुवात केली. Subaltern दोन लॅटिन शब्दांमधून आला आहे - उप अर्थ Subaltern कमी दर्जाच्या (लष्कराप्रमाणे) किंवा वर्ग (जातिव्यवस्थेप्रमाणे) वर्णन करण्यासाठी वापरला जातो. Subalterns एंट्री-लेव्हलच्या नोकऱ्या व्यापतात किंवा "कॉर्पोरेट शिडी" च्या खालच्या स्तरावर आहेत. इटालियन मार्क्सवादी अँटोनियो ग्राम्सीने सबल्टरनची कल्पना केली कारण तो बराच काळ तुरुंगात होता. त्याचे काम सेन्सॉरशिपच्या अधीन होते. म्हणूनच, त्याने आणखी एका शक्तिशाली वर्गाच्या वर्चस्वाच्या अधीन असलेल्या कोणत्याही वर्गाच्या लोकांसाठी (विशेषत: शेतकरी आणि कामगार) संकेतशब्द (कोडवर्ड) म्हणून सुबाल्टर्न वापरला. उत्तर वासाहतिक अभ्यासक विद्वानाच्या गटाने हा शब्द स्वीकारला आहे, अशा प्रकारे सबल्टर्न स्टडीज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्षेत्रात एक उप विद्याशाखा तयार केली जाते. या गटाची स्थापना दक्षिण पूर्व आशियाई इतिहासकार रणजीत गुहा यांनी केली आणि कालांतराने त्यात होमी भाभा, गायत्री स्पिवाक, पार्थ चॅटर्जी आणि दीपेश चक्रवर्ती सारख्या इतर अनेक विद्वानांचा समावेश आहे. रणजित गुहा यांनी सुरुवातीला पुस्तकांची समीक्षा, लेख, चर्चा आणि पश्चिम चळवळीतील उच्चभ्रू आणि विद्वानांनी निर्माण केलेल्या कार्याला आव्हान देणाऱ्या सामाजिक चळवळीपासून सुरू झालेला दृष्टीकोन कसा विकसित केला हे देखील आपण पाहिले. ही एक प्रकारची चळवळ होती जिथे त्यांचा असा विश्वास होता की इतिहासात राहणाऱ्या व्यक्तीने इतरांपेक्षा स्वतः लिहावे. सबल्टर्न अभ्यासकांनी इतिहासाचा त्यातील शक्तीच्या परिमाणाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आणि त्यातील पूर्वाग्रहांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या इतर भागांमध्येही साजरे आणि स्वीकारले गेले. आपण पुढे या विषयातील तीन वेगवेगळ्या संस्थापक अग्रणीचे तपशीलवार कार्य कर्तृत्व पाहिले. आपण वर्ग, नागरिकत्व आणि अगदी शहरी व्यवस्थेच्या दृष्टीने सुबाल्टर्नच्या अनुप्रयोगाकडेही लक्ष दिले.

## ८.९ प्रश्न : QUESTIONS :

१ . सुबाल्टर्न आणि त्याचा इतिहास याचा अर्थ स्पष्ट करा

२. नागरिकत्व, शहरीकरण यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये सबबाल्टर्नच्या अनुप्रयोगाबद्दल थोडक्यात चर्चा करा.

३ . गुहा आणि गायत्री यांच्या योगदानाची चर्चा करा.

## ८.१० संदर्भ : REFERENCES:


1. https://www.vocabulary.com/dictionary/subaltern
2. https://www.oxfordreference.com/view/10.1093/oi/authority.20110803100539334
3. Chakrabarty, D. (2000). Subaltern studies and postcolonial historiography. *Nepantla: views from South*, *1*(1), 9-32.
4. Ludden, D. (2002). Introduction:"A Brief History of Subalternity". In *Reading Subaltern Studies: Critical History, Contested Meaning, and the Globalization of South Asia* (pp. 1-42). Permanent Black.
5. https://www.yourarticlelibrary.com/sociology/biography-of-ranajit-guha-and-his-contribution-to-indian-sociology/35039
6. http://epgp.inflibnet.ac.in/epgpdata/uploads/epgp_content/S000013EN/P001456/M019901/ET/1496140851Paper10%3BModule35%3BEText.pdf
7. https://www.epw.in/journal/1998/9/special-articles/minority-histories-subaltern-pasts.html
8. Escobar, A. (2001). Culture sits in places: reflections on globalism and subaltern strategies of localization. *Political geography*, *20*(2), 139-174.
9. https://www.routledge.com/The-Subaltern-Speak-Curriculum-Power-and-Educational-Struggles/Apple-Buras/p/book/9780415950824
10. Roy, A. (2011). Slumdog cities: Rethinking subaltern urbanism. *International journal of urban and regional research*, *35*(2), 223-238.
11. Sharp, J. (2011). Subaltern geopolitics: introduction. *Geoforum*, *42*(3), 271-273.
12. Pandey, G. (2006). The subaltern as subaltern citizen. *Economic and Political Weekly*, 4735-4741.


❖❖❖❖

# ९

# उत्तर आधुनिकतेचे टप्पे: उत्तर संरचनावाद, उत्तर वसाहतवाद (POST MODERATION STEPS: POST STRUCTURALISM, POST-COLONIALISM)

फाल्गुनी वाहनवाला

**घटक रचना**

९.१ उत्तर संरचनावाद

९.१.१ प्रस्तावना

९.१.२ उत्तर संरचनावाद

९.१.३ उत्तर संरचनावाद आणि मानवशास्त्र: फॉकॉल्ट आणि त्यांचा प्रभाव

९.१.४ डेरिडा आणि विघटन (Deconstruction)

९.१.५ क्लोड लेवी-स्ट्रोस आणि संरचनावादाची चार तत्वे

९.१.६ उत्तर संरचनावादाची महत्वाची वाटचाल

९.१.७ निष्कर्ष

९.२ उत्तर वसाहतवाद

९.२.१ प्रस्तावना

९.२.२ वसाहतवाद व उत्तर वसाहतवाद म्हणजे काय?

९.२.३ उत्तर वसाहतवादाची उद्दिष्ट्ये

९.२.४ प्रतिपाद्य विषय (Subject Matters)

९.२.५ उत्तर वसाहतवादी साहित्य

९.२.५.१ कनिष्ठता (Subaltern)(उत्तर वसाहतवाद)

९.२.५.२ इतिहास

९.२.५.३ अर्थ

९.२.६ निष्कर्ष

९.१ उत्तर संरचनावाद (Post Structuralism)

## ९.१.१ प्रस्तावना

संरचनावाद ही १९५० व १९६०च्या दशकांत फ्रान्समध्ये उदयाला आलेली बौद्धिक चळवळ होती. त्यात भाषाशास्त्र, मानसशास्त्र, मानवशास्त्र व अन्य विद्याशाखांमधील साधनांचा उपयोग करून संहितांसारख्या सांस्कृतिक निर्मितींमागच्या संरचनांचा अन्वयार्थक अभ्यास केला जाई. यातून काढले जाणारे निष्कर्ष तर्कसंगत व वैज्ञानिक असावेत यावर भर दिला जाई. क़डव्या मार्क्सवादावर व खास करून स्टॅलिनवादावर टिका होत असतानाच्या काळात संरचनावादाचा हा विचार बहरला. स्टॅलिनवादाची बुद्धिनिष्ठ चिकित्सा करण्यात जीन-पॉल सार्त्र यांना अपयश आल्याचे अनेकांना वाटत होते. कट्टर मार्क्सवाद आणि मे १९६८मधील विद्यार्थ्यांच्या निदर्शनांपर्यंतच्या काळात उदयाला आलेल्या उदारमतवादी संस्था या दोन्हींचे तात्विक समालोचन करणे संरचनावादाने शक्य झाले. ल्युकॅक्स, ग्रॅमस्की व सुरुवातीच्या फ्रँकफर्ट विचराधारेने जे सैधान्तिक  चिकित्सेचे काम केले तशीच काहीशी सैधान्तिक वैधता देण्याचे काम संरचनावादाने केले.

निष्कर्षांच्या वैज्ञानिक अनुमानक्षमतेच्या बाबतीत मात्र संरचनावाद अपयशी ठरला. त्या काळात राजकीयदृष्ट्या हा विचार आकर्षक वाटला तरी यातील सिद्धांतांच्या आधारे भविष्यातील घटनांचे पूर्वानुमान करणे किवा अंदाज बाधणे समाजसास्त्रज्ञांना किंवा चिकित्सक सिद्धांतवाद्यांना शक्य झाले नाही. भाषाशास्त्रीय संरचनांनी त्यातील कथनाचा सहसा बोध होत असला तरी त्यामागील कारणमीमांसा करण्यास मर्यादा येतात. मानवी व्यवहार कसे असू शकतील हे त्या संरचना ठरवू शकत नाहीत किंवा त्या व्यवहारांचे नियंत्रणही करू शकत नाहीत. व्यक्तींच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याने भाषेवर मर्यादा येत असल्याने भाषेतून समोर येणाऱ्या आकृतीबंधांना ठराविक प्रकारची निश्चिती नसते. भाषेवरून त्या व्यक्तीला काय म्हणायचे आहे ते समजू शकते, पण प्रत्यक्ष अभिकर्ता (Agent) भाषेचा कसा वापर करेल हे त्यावरून ठरत नाही.

याच उणिवेमुळे उत्तर संरचनावादात अनेकांनी याहून वेगळे मार्ग अनुसरले. पिअरे बॉर्ड्यू यांनी संरचनावाद आणि अस्तित्ववादाची सांगड घालण्याचा केलेला प्रयत्न हा त्यापैकी एक सर्वात यशस्वी किंवा निदान सर्वात मनोवेधक असा मार्ग होता. यासाठी वापरलेल्या आपल्या सैधान्तिक दृष्टिकोनास बॉर्ड्यू यांनी ' प्रयोग सिद्धांत' (Practice Theory) असे नाव दिले. त्यात त्यांनी यावर भर दिला की, अभिकर्ते त्यांच्या अवतीभवतीच्या संरचना आत्मसात करू  शकतात. लेवी स्ट्रोस यांनी स्पष्ट केलेले व्दि-पर्यायी भेदाभेद आत्मसात करून त्यांच्या ठराविक स्थितीचा एक हिस्सा बनू शकतात. तसे झाले तर अभिकर्ता ज्या विश्वात वावरतो त्याचे त्यास आकलनही होऊ शकते. १९७२ मध्ये 'Outline of a Theory of Practice' या निबंधात बॉर्ड्यू यांनी लिहिले की, 'सामाजिक विश्व हे सैधान्तिक ज्ञानाच्या तीन मार्गांचे लक्ष्य असू शकते. त्यापैकी प्रत्येकात बहुधा अव्यक्त अशा मानवशास्त्रीय व्याख्यांचा एक संच असतो' (१९७७:३)

१. यापैकी त्यांना अपेक्षित असलेला सैधान्तिक ज्ञानाचा पहिला मार्ग जीन-पॉल सार्त्र यांच्याशी संबंधित आहे. 'यातून सामाजिक विश्वाच्या अनुभवाचे सत्य सुस्पष्ट होते.'

२. दुसऱ्या सैधान्तिक ज्ञानाच्या मार्गाला बॉर्ड्यू यांनी 'उद्दिष्टगामी' (objectivist) म्हटले व ते क्लोड लेवी-स्ट्रोस यांच्याशी निगडित असल्याचे प्रतिपादन केले. सामाजिक विश्वाच्या मूलगामी ज्ञानाची संरचना ज्यातून तयार होते त्या भाषिक संबंधांवर यात विशेष भर दिला जातो.

३. सैधान्तिक ज्ञानाचा तिसरा मार्ग आपला स्वत:चा असल्याचे बॉर्ड्यू सांगतात. तो म्हणजे 'प्रयोग सिद्धांत'. हा ज्ञानाच्या अस्तित्ववादी व संरचनावादी मार्गांहून भिन्न असा मार्ग आहे.

हा ज्ञानमार्ग असा आहे ज्यात अभिकर्ते संरचनांमध्येच एकजीव झाल्याचे मानले जाते, त्याने आसपासचे ज्ञान आत्मसात केल्याचे गृहित धरले जाते व त्याचा उपयोग करून तो या संरचनांमधून धोरणीपणाने मार्गक्रण करतो. यात अभिकर्त्याला सामाजित विधिनियमांची माहिती असते व तो त्यांचे पालनही करतो. कधी कधी तो ते नियम आपल्या धोरणानुसार अप्रत्यक्षपणे वाकवितही असतो. यात लेवी स्ट्रोस यांच्या अव्यक्त संरचनांना 'प्रयोग सिद्धांता'च्या व्यावहारिकतेची जोड दिलेली असल्याने आपल्याला घडणाऱ्या घटनांचे अन्वयार्थ अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतात व आपण त्यांचे अनुमानही करू शकतो.

बॉर्ड्यू यांच्या मते मानवी व्यवहारांची नेमकी व्याख्या करता येईल असा सिद्धांत नसणे या समकालिन विचारसरणीतील सर्वात मूलगामी समस्येतून संरचनावाद व अस्तित्ववाद यांच्यातील तणवाची स्थिती अगदी स्पष्ट होते.

## ९.१.२ उत्तर संरचनावाद (POST STRUCTURALISM)

आपल्या अन्वयार्थी व्यवस्थांमधील कच्च्या दुव्यांवर लक्ष केंद्रीत करून चिकित्सक युक्तिवादाची उत्तर संरचनावाद ही एक शैली आहे. आपल्या लिखाणात किंवा दैनंदिन जीवनात संदिग्धतेच्या क्षणी नैतिक पर्यायांची निवड करत त्या संदिग्धतेवर मात करून आपल्या भोवतालचे सामाजिक वातावरण समजून घेण्यासाठी व त्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी किंवा ते हवे तसे घडविण्यासाठी आपण अनिर्णायकी अवस्थेतून ठाम विश्वासाने पाऊल टाकतो त्या कृती समजून घेण्याची ही शैली आहे.

अन्वयार्थी संरचनेत ज्याबाबतीत सामायिक अशी सामाजिक सहमती नसते अशा ठिकाणी आपण जेव्हा आपला अर्थ थोपवितो त्या क्षणावर उत्तर संरचनावादात लक्ष केंद्रीत केले जाते. आपण आपल्या ज्ञानातील रिकाम्या जागा कशा भरू शकतो आणि आपला ज्यावर विश्वास आहे ते खरे मानू लागतो हे स्पष्ट करण्याचा त्यात प्रयत्न केला जातो. सामाजिक संरचनेतील हे कच्चे दुवे नेमके शोधून काढून उत्तर संरचनावाद, नैतिक किंवा राजकीय तत्वांनुसार नव्हे तर नीतीमूल्यांच्या स्वत:च्या ठाम समजुतीनुसार निर्णय घेऊन नैतिक पर्याय निवडण्याचे महत्व विषद करतो. 'इतरांच्या मार्गदर्शनाखेरीज स्वत:च्या

समजुतीचा वापर करण्याच्या अक्षमतेस एमॅन्युएल काण्ट यांनी त्यांच्या 'What is Enlightenment?' या प्रसिद्ध निबंधात 'स्वअर्जित अपरिपक्वता' असे म्हटले होते. (काण्ट, १९७०: ५४). यादृष्टीने विचार करता उत्तर संरचनावाद हा अशा 'स्वअर्जित अपरिपक्वते'तून मुक्त होण्याच्या आधीच टप्पा ठरतो. त्या निबंधात काण्ट यांनी आत्मबोधाची मुख्य वैशिष्ट्ये सविस्तरपणे स्पष्ट केल्याने आधुनिक तात्विक चिंतनात त्या निबंधाने महत्वाची भूमिका बजावली आहे.

**तुमची प्रगती तपासा**

**१. उत्तर संरचनावाद** चा अर्थ स्पष्ट करा?

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## ९.१.३ उत्तर संरचनावाद आणि मानवशास्त्र: फॉकॉल्ट व त्यांचा प्रभाव

मानावशास्त्रीय अभ्यासासाठी लिखित साहित्यासोबतच मौखिक वचनांचाही आधार घेणाऱ्या लेवी स्ट्रोस यांच्या नंतरच्या पिढीतील फ्रेंच विचारवंतांच्या विचारसरणीला सर्वसाधारणपणे उत्तर संरचनावाद असे म्हटले जाते. त्यांच्यापैकी मायकेल फॉकॉल्ट यांचे काम मानवशास्त्रावर सर्वाधिक प्रभाव टाकणारे मानले जाते. फॉकॉल्ट यांचे चिंतन प्रामुख्याने ज्ञान आणि सत्ता यांच्यातील संबंधांविषयी आहे. फॉकॉल्ट यांच्या मतानुसार ज्ञान म्हणजे केवळ तथ्ये आणि कल्पनांची गोळाबेरीज नसते. ठराविक विचार जन्माला येऊन तो समर्पक म्हणून सर्वमान्य होण्यासाठी जी सार्वत्रिक अनुकूल परिस्थिती लागते तिच्यामुळे त्या विचाराला महत्व येते.

फॉकॉल्ट मार्क्सवादी भाषा वापरत नसले तरी त्यांना अभिप्रेत असलेल्या वैचारिक मार्गांचे मार्क्सवादामधील उत्पादन पद्धतींशी साधर्म्य दिसते. याच पद्धतीने ते कोणत्याही व्यवस्थेमधील शक्यतांच्या चौकटीची शक्ती व्यक्तीवर नव्हे तर त्या एकूण व्यवस्थेवर ठरत असते, असे ते मानतात. ज्ञान आणि सत्तेच्या व्यवस्थांचा समकालिन समाजांमध्ये कसा मिलाफ केला जातो हे दाखविण्यासाठी 'Discipline and Punish' या निबंधात ते आधुनिक कारागृह व्यवस्थेचे प्रामुख्याने उदाहरण देतात. ते म्हणतात की, तुरुंग व्यवस्था, सैन्यदले, शाळा अशा प्रकारच्या सर्व आधुनिक संस्थांचे शिस्त हे मुख्य सूत्र असते. सत्तेच्या माध्यमातून ही शिस्त लोकांवर शारीरिकदृष्ट्या राबविली जाते. या शिस्तपलनावर निरंतर देखरेखही केली जाते. लोकांकडे यादृष्टीने पाहणे हे मानसशास्त्र, समाजशस्त्र, मानवशास्त्र याखेरीज इतरही आधुनिक विद्याशाखांचे बौद्धिक काम असते.

एडवर्ड सईद यांनीही 'Orientalism'(१९७८) मध्ये याच धर्तीवर युक्तिवाद करताना लिहिले की, अमेरिकेचे प्राच्यज्ञान व खास करून मध्य पूर्व आशियातील देशांविषयीचे ज्ञान हे त्या भागांवर दीर्घकाळ राहिलेल्या पाश्चात्यांच्या वर्चस्वावर आधारलेले

आहे. अशा प्रकारच्या चिकित्सक चिंतनाने मानवशास्त्रास  गैर युरोपीय अशा इतरांविषयीच्या आपल्या सादरीकरणाचे काय परिणाम होऊ शकतात यासंबंधीचे आत्मभान आले आहे. हे सादरीकरण लिखाण व अन्य माध्यमांतून करण्याच्या आपल्या अधिकाराचा मानवशास्त्रज्ञ जो दावा करतात त्याविषयी  जेम्स क्लिफर्ड व जॉर्ज मार्कस चिंता व्यक्त करतात. तलाल असद असे सूचवितात की, धर्मासारख्या संकल्पनेच्या व्याख्यांनाही अऐतिहासिक  स्वरूप देण्याच्या (म्हणजे सांस्कृतिक संकल्पना व विचारपद्धती कालातीत, नैसर्गिक व सार्वत्रिक असल्याचे भासविणे) प्रयत्नांमुळे एकीकडे प्रबोधन काळानंतरच्या युरोपीय विचारपद्धतींनाही नैसर्गिकतेचे स्वरूप देण्याचे काम केले तर दुसरीकडे युरोपच्याच इतिहासातील अन्य पद्धतींना अडचणीत आणण्याचेही काम केले. या वैचारिक प्रवाहातील पॉल रॅबिनोव हे आधुनिक फ्रान्सचे कुशल व्याख्याकार व संस्कतीवर्णनकार या दोन्ही नात्यांनी फॉकॉल्ट यांचे सर्वात कट्टर अनुयायी म्हणता येतील.

**तुमची प्रगती तपासा**

**१. उत्तर संरचनावाद** चा अर्थ स्पष्ट करा?

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

## ९.१.४ डेरिडा आणि विघटन (DECONSTRUCTION)

तार्किकदृष्ट्या लिखाण हे मौखिक अभिव्यक्तीहून अधिक श्रेष्ठ आहे, आसा दावा करणारा जॅक्स डेरिडा यांचा 'Of Grammatology ' (१९६७) हा निबंध मानवशास्त्रीय साहित्यावर मोठा प्रभाव टाकणारे लिखाण ठरू शकेल, असे वरकरणी वाटत नाही. डेरिडा असा मुद्दा मांडतात: सर्वात पहिले म्हणजे, बोलण्यात ज्या मोकळ्या जागा, नि:शब्दता व खाडोखेड दडलेली असते ती लिखाणातून स्पष्ट होते. दुसरे असे की, काळ आणि स्थळ यात एक उघड अंतर किंवा फरक असतो. तो लिखाणामध्ये प्रतिपादन व त्यावरून होणारा बोध या रूपाने दिसून येतो. या उलट बोलणे अव्यवधानाचा आभास निर्माण करते. लेखनामागचा हेतू व त्यातून काही निश्चित अर्थ व्यक्त होण्याच्या शक्यतेच्या समर्पकतेवरच डेरिडा मुख्यत: प्रश्न उपस्थित करतात. ते म्हणतात की, मजकूर लेखी असो वा मौखिक, त्याचा अन्वयार्थ  लावताना तो काय सांगतो एवढेच नव्हे तर तो काय सांगत नाही याचा आणि त्या आधीच्या व नंतरच्या मजकुराचा विचार केला जायला हवा. या दृष्टिकोनाला डेरिडा 'विघटन' (Deconstruction) असे म्हणतात. याने निश्चित अर्थ दिला जाण्याची सहेतूक किंवा अहेतूक शक्यताही दूर होऊन कोणत्याही मजकुरातील अंतर्गत विरोधाभास उघड होऊ शकतो. निश्चित अर्थाच्या गृहितकाला आव्हान देण्यासाठी डेरिडा यांनी वापरलेला 'विघटन' हा शब्द नंतरच्या अनेक मानवशास्त्रज्ञांनी एवढया ढिलाईने वापरला की तो शब्दही त्याचा मूळ अर्थ हरवून बसला. याहून नेमकेपणाने सांगायचे तर मजकूराच्या अन्वयार्थाविषयीच्या सहेतूकपणावर डेरिडा यांनी व्यक्त केलेल्या अविश्वासातूनच 'इतरां'विषयी मानवशास्त्रीय सादरीकरणावरील आधुनिकतेनंतरच्या टिकेला चालना

मिळाली. डेरिडा यांचे शब्दांवरील प्रभुत्व व गोल फुरून पुन्हा मुख्य विषयाकडे येण्याची शैली यावरून स्फूर्ती घेऊन नव्या प्रकारचे मानवशास्त्रीय लिखाण केले गेले. मायकेल तौसिग यांचे लिखाण हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१. जॅक्स डेरिडा यांचा चा 'Of Grammatology ' (१९६७) हा निबंध दृष्टिकोनाला स्पष्ट करा?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## ९.१.५ क्लोड लेवी स्ट्रोस आणि संरचनावादाची चार तत्वे

उत्तर संरचनावाद आधीच्या संरचनावादावरच उभा राहिला असला तरी सर्वात महत्वाचे म्हणजे तो त्याची काही मध्यवर्ती तत्वेच झुगारून देतो. म्हणूनच उत्तरसंरचनावाद समजून घ्यायचा असेल तर क्लोड लेवी स्ट्रोस व त्यांच्या संरचनावादी कामापासून सुरु करणे अत्यंत महत्वाचे ठरते.

सन १९६०च्या दशकात पॅरिसमधील विचारवंतींच्या वर्तुळात संरचनावाद हे जणू फॅड होते. पण त्याच्या लोकप्रियतेमुळे त्यावेळी 'संरचनावादी' म्हणून ओळखल्या गेलेल्या आघडीच्या विचारवंतांच्या सैधान्तिक दृष्टिकोनांतील महत्वाच्या फरकांना विकृत स्वरूप प्राप्त झाले. त्यावेळी संरचनावादाशी जाहिरपणे निगडित असलेल्या रोलॅण्ड बार्थेस,मायकेल फॉकॉल्ट, जॅक्स लुकान आणि क्लोड लेवी स्ट्रोस या चार प्रमुख विचारवंतींपैकी मानवशास्त्रज्ञ असलेले लेवी स्ट्रोस हेच खऱ्या अर्थी संरचनावादी होते.

क्लोड लेवी-स्ट्रोस यांनी आपल्या संरचनावादाची उभारणी फर्निनांड डी सॉस्युरे यांच्या संरचनावादी भाषाशास्त्रावरून केली. सॉस्युरे यांची त्यांच्या विद्यार्थ्यांनी 'Cours de linguistiquegénérale' या ग्रंथात संकलित स्वरूपात प्रसिद्ध केलेली व्याख्याने आता खूपच लोकप्रिय झाली आहेत. 'Structural Analysis' या शीर्षकाने लिहिलेल्या मुद्देसूद आणि उपयुक्त निबंधात संरचनावादी भाषाशास्त्राची मुख्य तत्वे सारांश रूपाने सांगितली ती अशी:

- संरचनात्मक भाषाशास्त्राने सचेतन भाषिक घटनांकडून त्यांच्या अचेतन रचनांच्या अभ्यासाकडे लक्ष वळविले.
- यात शब्दांना स्वतंत्र अस्तित्व असल्याचे न मानता शब्दांच्या आपसातील नाते हा चिकित्सेचा आदार मानला जातो.
- यात 'व्यवस्था' ही संकल्पना सर्वप्रथम वापरली गेली.

- ज्याने शब्दांना निखालस स्वरूप प्राप्त होऊ शकेल अशी जोडणी वा तार्किक वजावट करण्याचे सर्वसाधारण नियम शोधणे हा याचा उद्देश असतो. (लेवी स्ट्रोस १९६७ ए):३१; लेवी स्ट्रोस व एरिबॉन १९८८:१५८)

संरचनावादाच्या या चार मुलभूत तत्वांपैकी पहिल्या तीन तत्वांच्या आधारे उत्तर संरचनावादाची उभारणी केली गेली मात्र सर्वसाधारण नियम तयार केले जाऊ शकतात अशी ककल्पना मांडणारे चौथे तत्व नाकारले गेले. फरकाच्या संबंधातून अर्थ काढता येतो, हे फरक बहुधा अचेतन असतात व त्यांचीही एक निश्चित व्यवस्था असते या समजावर उत्तर संरचनावाद उभा केला गेला आहे. परंतु अर्थांच्या रचनांमधील तुटकपणा आणि संदिग्धतेवर यात भर दिला जातो. लेवी स्ट्रोस यांनी असे म्हटले होते की, ‘ उघडपणे विस्कळित वाटणाऱ्या माहितीला एका निश्चित पद्धतीने मांडण्यासाठी आणि ज्यातून स्वैरपणाचा भ्रम दूर होऊ शकेल अशी पातळी गाठण्यासाठी मानसिक आकृतीबंधांचा लेखाजोखा घेण्याचे उद्दिष्ट संस्कृतीवर्णनात्मक अनुभवापासून मी नेहमीच ठेवत आलो. (लेवी स्ट्रोस १९७० (१९६४):१०) संरचनावाद नेमके हेच नाकारते. म्हणजे अर्थांच्या संरचना सार्वत्रिक नसतात आणि त्यावरून माणूस किंवा समाजाविषयीची सत्ताशास्त्रीय वस्तुस्थिती स्पष्ट होत नाही हे संरचनावादातील चौथे तत्व उत्तर संरचनावाद मान्य करत नाही. उत्तर संरचनावादी अर्थांच्या संरनेतील मोकळ्या जागा व संदिग्धता यावर लक्ष केंद्रीत करून तेथे अर्थ शोधतात.

अन्वयार्थातील मोकळ्या जागा व संदिग्धता झाकण्यासाठी आपण जो अर्थ जबरदस्तीने काढतो त्यावर आपण एवढ्या ठामपणे विश्वास कसा काय ठेवतो? या प्रश्नाची उकल करणे हा उत्तर संरचनावादातील एक महत्वाचा टप्पा आहे. कोणत्याही विवक्षित काळात व ठराविक ऐतिहासिक परिस्थितीत ज्ञान नेमके कसे शक्य होते, या प्रश्नाचा ध्यास उत्तर संरचनावादी त्यांच्या कामात प्रामुख्याने घेतात. फॉकॉल्ट यांच्या शब्दांत सांगायचे तर, ‘प्रश्न असा आहे की, स्वत: ज्ञानाचा कर्ता असलेला माणूस संभाव्य ज्ञानाचा उद्देश कसा काय बनतो? त्यासाठी तो कोणती तर्कसंगती लावतो? कोणत्या ऐतिहासिक परिस्थितीत असे घडते व सर्वात शेवटी त्यासाठी माणसाला कोणती किंमत मोजावी लागते? माझा प्रश्न असा आहे की, कर्त्याला स्वत:विषयीचे सत्य सांगण्यासाठी किती किंमत मोजावी लागते? (फॉकॉल्ट १९८३:४४२)

फॉकॉल्ट यांनी उपस्थित केलेले प्रश्न संरचनावादी चौकटीमधीलच असले तरी त्यांचा रोख खूप वेगळा आहे. फॉकॉल्ट यांना ज्ञानाचा इतिहास व तार्किकता तसेच कर्त्याच्या इतिहासात अधिक स्वारस्य आहे. अस्तित्ववाद, संरचनावाद किंवा प्रयोग सिद्धांत यापैकी फॉकॉल्ट यांचा कोणताही विचार बरोबर, उपयुक्त व बुद्धिला पटणारा म्हणून कसा बरं स्वीकारता येईल? कर्ते म्हणून आपण इतरांविषयी कसे निर्णय घेतो, विचार करतो,भेदाभेद करतो व आकांक्षा ठेवतो हे ‘कथन’ खरे करण्याच्या प्रक्रियेनुरूप कसे ठरत असते? कोणत्याही अभ्यासाचे आपण स्वत:ला उद्दिष्ट कसे काय बनवू शकतो? अर्थात, कथने कधीच ‘खरी’ होत नाहीत, असे सुचवायचे नाही. याआधी ती नक्कीच खरी झालीही आहेत. आपल्यापैकी बहुतेक जण ती खरीच मानतो. पण फॉकॉल्ट यांच्या मते तो मुख्य

मुद्दाच नाही. त्यांच्या मते खरा प्रश्न असा आहे की, ठराविक वेळी ती खरी म्हणून कशी मानली जाऊ लागली?

काही भाग स्वीकाराचे व काही नाकारायचे यामुळे उत्तर संरचनावाद व फॉकॉल्ट यांनी त्यात केलेल्या कामाचे मूळ संरचनावादाशी नाते काहीसे तणावाचे दिसते. फॉकॉल्ट तर स्वत:, मी संरचनावादी नाही, असेच ठामपणे मानायचे. (फॉकॉल्ट, १९७०:९ )

अन्य स्वरूपाच्या चिकित्सा सिद्धांताहून उत्तर संरचनावादाचे वेगळेपण असे की, तो ज्ञानाच्या उभारणीशी संबंधीत शक्तीचे समाजात वाटप कसे होते यावर लक्ष केंद्रीय करतो. आपण जे सत्य मानतो त्याच्यावर आपला विश्वास नेमका कसा बसतो? उदाहरणार्थ, शिक्षेतही एक सुधारणावादी पैलू असतो असे आपण कसे मानू लागलो? एखादी व्यक्ती गुन्हेगार आहे, असे मानणे आणि त्या गुन्हेगारात सुधारणा होऊ शकते किंवा त्याचे पुनर्वसन केले जाऊ शकते, असेही मानणे हे कोणत्या प्रथांमुळे किंवा संस्थांमुळे आपण खरे मानतो? श्रद्धा तयार होण्यात आपल्याच शिस्तीविषयीच्या व्यवस्थांचा किती वाटा आहे? आणि या सर्वाची मोजावी लागणारी किंमत किती? अशा प्रकारचे विचार 'शक्ती/ज्ञान' समालोचना (``power/knowledge" critique) म्हणून ओळखले जाऊ लागले. आधी म्हटल्याप्रमाणे उत्तर संरचनावादी विचाराचे मूळ जॅक्स डेरिडा यांच्या कामात सापडते, असे ज्युडिथ बटलर यांनी त्यांच्या 'Gender Trouble' पुस्तकात लिहिले आहे. (बटलर १९९०: १५८ एन. ६) आपण त्यांचे हे म्हणणे बरोबर आहे असे मानले तर इतर ठिकाणी का आणि डेरिडा यांच्या कामात का नाही?, असे आपण विचारू शकतो. आपण डेरिडा यांना विघटनवादी (Deconstructionist) का मानायचे आणि विघटनवादाला उत्तर संरचनावादाहून वेगळे का म्हणायचे? माझ्या मते याचे मुख्य कारण असे की,आपण ज्यावर विश्वास ठेवतो ते आपण खरे का मानतो याचे समाजशास्त्रीय, ऐतिहासिक व वंशशास्त्रीय असे स्पष्टिकरण देण्याचा क्षण विघटनामध्ये कधीच येत नसतो. गुन्हेगाराच्या केवळ कृत्याकडे नव्हे तर त्याच्या त्यावेळच्या मानसिकचेही विचार करणे कसे योग्य आहे हे 'Discipline and Punish' मध्ये अत्यंत पद्धतशीरपणे समजवून सांगताना फॉकॉल्ट नेमके तेच करतात. विघटनाच्या प्रक्रियेतून स्पष्टिकरण मिळत नाही किंवा विघटन केले तर त्याची किती किंमत मोजावी लागेल, याचीही चिकित्सा केली जात नाही. नोैतिकतेने निवड केल्याचे कोणाला कसे परिणाम भोगावे लागतात, हेही त्यातून स्पष्ट होत नाही. विघटनवाद फक्त पर्यायाकडे संकेत करतो व तेथेच थांबतो. खरे सांगायचे तर संदिग्धता दूर करण्याच्या क्रांतिकारी क्षणावर विघटनवाद कधीच मात करत नाही. म्हणूनच विघटनवाद उत्तर संरचनावादाहून लक्षणीयपणे वेगळा ठरतो.

डेरिडा यांच्या 'Force de loin' सारख्या लिखाणात हे उत्तम प्रकारे पाहायला मिळते. न्यूयॉर्क शहरात ओक्टोबरर १९८९ मध्ये 'Deconstruction and the Possibility of Justice' विषयावर झालेल्या परिषदेत जॅक्स डेरिडा यांनी दिलेले मुख्य व्याख्यान यातील पहिल्या भागात आहे. ते व्याख्याने मंत्रमुग्ध करणारे आहे. त्यात डेरिडा कायदा व न्याय यांच्यातील संरचनात्मक नाते उलगडून दाखवतात, पण नैतिक पर्याय ठरविण्याचा टप्पा गाठल्यावर त्यांची गाडी त्याच्यापुढे जात नाही. पास्कल यांच्या 'pensée' ची मदत घेत 'Deconstruction and the Possibility of Justice' मध्ये

डेरिडा उदारमतवादी विधिमान्यतेच्या आधुनिक समालोचनाचा आधार शोधून काढतात. त्यांनी विचारार्थ घेतलेल्या प्रश्नाचा मुख्य आशय न्याय, कायदा व शासकीय सत्ता यांच्यातील नात्यासंबंधीचा होता. तो नक्कीच प्रक्षोभक आहे:‘ न्याय आणि सत्तेची ताकद एकत्र आणणे आणि त्यासाठी जे न्याय्य असेल ते सशक्त होईल व जे सशक्त असेल ते न्याय्यही असेल याची खात्री करणे महत्वाचे आहे. (डेरिडा १९९४:२८)

यातून डेरिडा यांना कायद्याच्या सत्तेचा गूढ असा पाया गवसला व त्यामुळे विधिमान्यतेच्या उदारमतवादी तत्वज्ञानाच्या आधुनिक समालोचनाचीही शक्यता निर्माण झाली. डेरिडा म्हणतात की, कायदा तयार करण्यास व तो प्रस्थापित करण्यास लागणारी ताकद हाच कायद्याचा खरा पाया असतो. डेरिडा यांच्या मते यासाठी श्रद्धेची झेप (leap of faith) लागते व तिच खरी त्यामागील बंडखोर ताकद (un coup de force) असते. यातून विघटनवादी शक्यता स्पष्ट होतात. त्यातूनच मुळात विघटनाची शक्यताही तयार होते.(३५) विरोधाभास असा की हेच ‘न्यायाचे विघटन’ (La deconstruction est la justice) असेही डेरिडा ठोकून सांगतात. (३५) यातून त्यांना असे सांगायचे आहे की, श्रद्धेची बळकटी मिळण्यानेच कायद्याला स्व-अधिकृतता (Auto-authorization) प्राप्त होते. तोच क्षण संदिग्धता व ताकद यांचा फुगा फटण्याचा असतो. त्याने उदारमतवादी विधिमान्यतेची समालोचना शक्य होते. यातूनच विघटनाची पद्धतही स्पष्ट होते. एका अर्थी हे विचार मांडून डेरिडा यांनी त्या परिषदेचा ‘Deconstruction and the Possibility of Justice’ हा विषयच जणू आपल्या खास शैलीने पार उलटून टाकला होता. यात न्याय आहे कारण तो स्व-अधिकृत आहे. शिवाय त्यात समालोचनाची शक्यता आहे म्हणूनच विघटनाचीही शक्यता आहे. पण येथे एक महत्वाची गोष्ट लक्षात घ्या की, कायद्याला श्रद्धेची बळकटी देण्याची झेप कशी घेतली जाऊ शकते याचे एरवी संरचनावाद्यानी दिले असते असे समाजशास्त्रीय, ऐतिहासिक व वंशशास्त्रीय असे स्पष्टिकरण देण्याचे ते कटाक्षाने टाळतात. डेरिडा फक्त संकेत करून थांबतात. म्हणून उत्तर संरचनावाद विघटनाहून वेगळा ठरतो व ती आधुनिकतेच्या आधीची पायरी आहे. नैतिक निवड करण्यास आवश्यक असलेल्या चिकित्सक कारणमीमांसेत अर्थामधील संदिग्धतेवर लक्ष केंद्रीत करण्यास सुरुवात करण्याची ही पायरी आहे. आपण असेही म्हणू शकतो की, डेरिडा यांनी संरचनेची पद्धत उत्तर संरचनावादीच्या नंतरची आहे व तो आधुनिकतेचा शेवटचा टप्पा आहे. यात आपण आपल्या श्रद्धांना बळकटी देण्याची झेप कशी घेतो याची सविस्तर चर्चा करण्याची इच्छा नसते. विघटन फक्त नैतिक निवडीवरच लक्ष केंद्रीत करते. वैचारिक विकासात विघटनानंतरचा पुढचा टप्पा कोणता? बहुधा चिकित्सक कारणमीमांसेच्या मर्यादांची सर्वार्थाने कबुली देणे व मुळात श्रद्धेची गरुडझेप घेण्याचे टाळणे, ही एक शक्यता दिसते. किंवा त्याऐवजी पुन्हा स्वैराचारवादी वळणही मिळू शकते.

**तुमची प्रगती तपासा**

१. क्लोड लेवी-स्ट्रोस यांचा संरचनावादाला स्पष्ट करा?

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## ९.१.७ निष्कर्ष

मानवशास्त्रज्ञ स्वत:ला समाजशास्त्रज्ञांपैकीच समजतात व मानवशास्त्रास विज्ञान न मानणाऱ्यांचा ते विरोध करतात. त्यापैकी सगळ्यांची नाही तरी काहींची तरी तशी प्रवृत्ती होण्यात संरचनावाद आणि उत्तर रचनावादाने भर टाकली. वैज्ञानिकतेच्या काटेकोर निकषांत न बसणाऱ्या अशा प्रतिकांचे अन्वयार्थ लावण्यावर भर देण्यामुळे संरचनावादाने व सादरीकरणाच्या आपल्या स्वत:च्याच पद्धतींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यामुळे उत्तर संरचनावादाने हे काम केले आहे. मानवतावादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करणारा वर्ग असे निदर्शनास आणतो की, संरचनावाद व उत्तर संरचनावाद मानवी व्यवहारांचा प्रभाव व त्यांचे महत्व दुर्लक्षित करत असल्याने या दोन्ही विद्याशाखा मानवी गुणवैशिष्ट्यांना कमी लेखणाऱ्या आहेत. मानवी सहेतूकतेच्या डेरिडा यांनी केलेल्या समालोचनात हे अगदी उघडपणे दिसत असले तरी लेवी स्ट्रोस व फॉकॉल्ट यांच्या चिंतनातूनही तेच अप्रत्यक्षपणे डोकावते. निदान हे सिद्धांत मानवी व्यवहारांचा अभ्यास करणे अडचणीचे तरी नक्कीच करून टाकतात. किंवा सर्वात टोकाची भूमिका घ्यायची झाल्यास असे म्हणता येईल हे सिद्धांत याला जागाच मिळू देत नाहीत.

## ९.२ उत्तर वसाहतवाद

### ९.२.१ प्रस्तावना

वसाहतवादी कालखंडानंतर उदयास आलेल्या सिद्धांतांना व केल्या गेलेल्या अभ्यासांना उत्तर वसाहतवादी असे म्हटले जाते. हा खास करून आधुनिकतेनंतरचा वैचारिक प्रवाह आहे. वसाहतवाद व साम्राज्यवादातून वारसा म्हणून मिळालेल्या संस्कृतीवरील प्रतिक्रिया व त्या संस्कृतीच्या चिकितेचा यात समावेश होतो. राजकीय, आर्थिक, सामाजिक/ सास्कृतिक व मानसिक दमन केलेल्या समाजांचे जे चित्रण युरोपमधील दीर्घकालीन साम्राज्यवादी दृष्टिकोनातून केले गेले होते त्याची दुसरी बाजू या विचारधारेतून मांडली जाते. वसाहतवादाने पिळवणूक केलेल्या जनसमुहांच्या भाषेवर व संस्कृतीवर वसाहतवादाचे कोणते दुष्परिणाम झाले याचा अभ्यास करणे हे तिचे उद्दिष्ट असते.

## ९.२.२ वसाहतवाद व उत्तर वसाहतवाद म्हणजे काय?

कोणत्याही देशाने स्वत:च्या भौगोलिक सीमांच्या पलिकडे जाऊन सत्ता राबविणे यास वसाहतवाद म्हटले जाते. यात एका जनसमुहाला दुसऱ्या जनसमुहाच्या राजकीय वर्चस्वाखाली राहावे लागते.

युरोपीय देश आणि त्यांनी ज्या देशांना आपल्या देशाच्या वसाहती बनवून त्यांच्यावर राज्य केले त्यांच्यातील नात्याच्या अभ्यासास मानवशास्त्रात उत्तर वसाहतवाद असे म्हटले जाते. मानवशास्त्रातील उत्तर वसाहतवादात इतिहास, मानवशास्त्र, तत्वज्ञान, भाषाशास्त्र, चित्रपट, राज्यशास्त्र, स्थापत्यशास्त्र, मानवी भूगोल, समाजशास्त्र, मार्क्सवाद, स्त्रीवादी चळवळ, धार्मिक आणि ईश्वरीय अभ्यास व साहित्य यासारख्या विविध शाखांमधील सिद्धांतांचा समावेश होतो. यात पूर्वी किंवा सध्याही वसाहती असलेल्या देशांमधील साहित्य लेखन व वाचन किंवा ज्यांनी वसाहती केल्या त्या देशांमधील वसाहतवादाची प्रक्रिया किंवा वसाहतींमदील लोकांविषयीच्या साहित्याचा अभ्यास केला जातो.

## ९.२.३ उत्तर वसाहतवादाची उद्दिष्ट्ये

वसाहती केल्या गेलेल्या देशांमधील संस्कृतींवर वसाहतवाद संपल्यानंतरही अजूनही वसाहतवादाचा जो प्रभाव शिल्लक आहे त्याचा आढावा घेणे व तो कमी करण्यासाठी प्रयत्न करणे हे उत्तर वसाहतवादाचे अंतिम उद्दिष्ट मानले जाते. पूर्वी वसाहत बनविण्यात आलेल्या देशांना त्या कटू आठवणींतून बाहेर काढणे एवढेच याचे उद्दिष्ट नाही. तर तो कालखंड पूर्णपणे स्मृतीपटलाच्या मागे टाकून आपसी सन्मानाच्या दिशेने प्रयत्न करणे हाही या अभ्यासामागील हेतू असतो. वसाहतवादाचे समर्थन करण्यासाठी पूर्वी जी गृहितके आधारभूत ठरली ती आजही काही प्रमाणात सक्रिय शक्ती म्हणून टिकून आहेत, याचे या उत्तर वसाहतवादी विचारवंतांना भान आहे.

अनेकांच्या मतांसाठी जागा मोकळी करणे हेही उत्तर वसाहतवादी चिंतकांचे उद्दिष्ट आहे. पूर्वी प्रभावी तत्वज्ञानाच्या शिरजोरीमुळे ज्यांचे आवाज दबले गेले त्यांचे आवाज जगापुढे आणणे याला ते स्वत:चे काम मानतात. आधी अभ्यासकांनी व चिंतकांनी पूर्वीचा दुष्प्रभाव दूर करून जागा स्वच्छ करण्याचे काम करायला हवे हे या विचारप्रवाहात बव्हंशी सर्वमान्य आहे. ज्याला युरोपीय लोक 'ओरिएंट' म्हणायचे त्या खास करून आशियाई जनसमुहांचे अभ्यास करताना वसाहतवादी काळात त्या लोकांची मते दुर्लक्षित करून अभ्यास करणाऱ्याया विचारवंतांनी आपल्या बौद्धिक श्रेष्ठत्वाचा टेंभा मिरवत त्यात स्वत:ची मते कसी घुसडली याचे स्पष्ट चित्रण एडवर्ड सईद यांनी 'Orientalism' या त्यांच्या ग्रंथात मार्मिकपणे केले आहे. इतरांना तुच्छ लेखण्याच्या या भावनेते मूळ युरोपीय साम्राज्यवादात होते.

पौर्वात्य समाजांबद्दल किंवा त्यांच्या वैचारिक व सांस्कृतिक चळवळींबद्दल पाश्चात्य विद्वानांना जेवढे ज्ञान होते त्याकडे त्यांनी आपण गडद करून दाखविण्यासाठी वास्तवात

आणायच्या पुसट सावल्या किंवा पौर्वात्यांच्या अभ्यासकांच्या एकूण व्यापक उपक्रमातील एक क्षुल्लक व हिणकस हिस्सा एवढ्याच दृष्टीने पाहिले. (सईद, १९७८:२०८)

काही उत्तर वसाहतवादी सैधान्तिक विचारवंत असा युक्तिवाद करतात की, वर्चस्वी समाजांचे ज्ञानभांडार व उपेक्षितांचे ज्ञानभांडार या दोन्हींचा व्दि-पर्यायी विरोधाभास म्हणून एकत्रित अभ्यास केल्यास त्यांचे एकजिनसी अस्तित्व टिकून राहते. होमी के. भाभा यांना असे वाटते की, उत्तर वसाहतवादी जगाने समाजातील विविध वर्गांच्या एकत्रीकरणाची ठिकाणे व जेथे सत्य व असलीपणाला बाजूला सारून त्यांची जागा संदिग्धता घेते अशा ठिकाणांचेही निश्चित मूल्यांकन करायला हवे. ते म्हणतात की, या संमिश्रतेच्या जागाच वसाहतवादापुढे सर्वात मोठे आव्हान उभे करतात. (भाभा, १९९४:११३) स्पिवॅक यांनी दाखवून दिलेल्या तत्ववादाच्या उपयुक्ततेकडे भाभा दुर्लक्ष करतात, असे समालोचनही काहीजण करतात. अभ्यासकांच्या वर्तुळात असो किंवा निषेध-निदर्शनांसारख्या धडक कृतीमध्ये असो, संघटितपणे उठविलेल्या आवाजाने अधिक सशक्त आव्हान उभे करता येते.

शेवटी काही झाले तरी उत्तर वसाहतवाद ही एक आशावादी विचारप्रणाली आहे. वसाहतवादात जे जे काही वाईट होते त्या सर्वाच्या पलिकडे गेलेल्या जगाची ही विचापाणाली आशा बाळगते हे तिच्या नावातील 'उत्तर' या विशेषणातूनच व्यक्त होते. 'मला यात बंधूभावाने एकत्र बांधलेल्या जागतिक समाजाची आशा दिसते', असे एम्बेंबे यांना वाटते. सर्वांनी माणूस म्हणून गुण्यागोविंदाने राहण्याची हाक देऊन ही विचारप्रणाली वसाहदवादमुक्त भविष्याची अभिलाषा ठेवते.

**तुमची प्रगती तपासा**

**१. उत्तर वसाहतवाद म्हणजे काय? उद्दिष्ट्ये** स्पष्ट करा?

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## ९.२.४ वस्तुविषय (Subject-Matter)

"वसाहतवादाची अखेरची मृत्यूघंटा झाली आहे आणि आफ्रिका, आशिया व लॅटिन अमेरिकेतील लक्षावधी रहिवासी एका नव्या आयुष्याला आलिंगन देण्यासाठी आतूर झाले असून ते स्वयंनिर्णयाच्या अनिर्बंध अधिकाराची मागणी करत आहेत'. (च्ये गुएवरा यांनी संयुक्त राष्ट्रसंघात केलेले भाषण, ११ डिसेंबर, १९६४)

उत्तर वसाहतवादी मतप्रणालीच्या चिकित्सक स्वरूपामुळे विचार करण्याच्या पाश्चात्य पद्धती खिळखिळ्या होऊन उपेक्षित वर्गांना आपला आवाज उठविण्यास व वर्चस्वी विचारमंथनाला पर्याय उभा करण्यास वाव मिळेणे अपेक्षितच आहे. बऱ्याच वेळा उत्तर वसाहतवाद म्हणजे वसाहतवादानंतरचा कालखंड असा शब्दश: अर्थ घेतला जातो. पण असे केल्याने अडचणी येऊ शकतात कारण, 'वसाहतवादाला पूर्वी बळी पडलेले विश्व

'विरोधाभासांनी, अर्धवट राहिलेल्या सामाजिक प्रक्रियांनी, संभ्रमांनी, संमिश्रतेने व सीमियतेने' भरलेले आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर उत्तर वसहतवाद या शब्दाचे बहुढंगी स्वरूप मान्य करणे महत्वाचे आहे, कारण त्याचा संदर्भ फक्त वसाहतवादानंतरच्या कालखंडाशी नाही. दुसऱ्या अर्थी विचार केला तर सत्ता आणि ज्ञाननिर्मिती यांच्यातील किंवा सत्ता आणि ज्ञानावरील नियंत्रण यांच्यातील नव्या संबंधांच्या दृष्टीने विचार केला तर उत्तर वसाहतवाद हा वसाहतवादाचाच वेगळ्‌्या स्वरूपाचा पुढील अध्याय आहे, अशीही त्याची व्याख्या केली जाऊ शकते.

यामुळे उत्तर वसाहतवादाकडे वसाहतवाद पूर्णपणे इतिहासजमा झाल्याचे लक्षण म्हणून पाहणे कितपत योग्य होईल, यावरही चर्चा होते. चिकित्सक दृष्टिकोन असलेला एक साहित्यिक सिद्धांत म्हणून उत्तर वसाहतवादाचा संबंध पूर्वी इतर देशांच्या व खास करून ब्रिटन, फ्रान्स व स्पेनच्या वसहती असलेल्या देशांमधील साहित्याशी आहे. याच संदर्भाने ज्या देशांमध्ये अजूनही वसाहतवादी व्यवस्था अस्तित्वात आहे ते देशही यात येतात. ज्या जनसमुहांवर सत्ता गाजविली त्यांना वस्तुविषय (Subject Matter) म्हणून डोळ्यापुढे ठेवून वसाहतवादी देशांमधील लोकांनी लिहिलेले साहित्यही उत्तर वसाहतवादी अभ्यासात विचारात घेतले जाते. डच साहित्यात वसाहतवादी व उत्तर वसाहतवादी साहित्याच्या एका भागास 'इंडिज' (डच ईस्ट इंडिज कंपनीवरून) असे म्हटले जाते. त्यामधील एका पोटप्रकारात खास करून वसाहतवादानंतची अस्मिता जागृती व विविध देशांमध्ये विखुरलेल्या इंडो-युरोपीय लोकांच्या संस्कृतीवर विशेष लक्ष केंद्रीत केले जाते. हा युरेशियन समाज मुळचा इंडोनेशियातील होता. तजाली रॉबिन्सन हे त्या प्रकारच्या साहित्यातील प्रमुख लेखक होते. खास करून इंग्रजी साम्राज्यातील वसाहतींमधील लोक ब्रिटिश विद्यापीठांमध्ये शिकल्याने तेथे मिळालेल्या ज्ञानाने त्यांनी या प्रकारची टीकात्मक साहित्यनिर्मिती केली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात सोविएत संघाचे विघटन झाल्यानंतर त्यामधील पूर्वीची प्रजासत्ताके हीदेखिल अशा प्रकारच्या साहित्याचे वस्तुविषय ठरली.

बहुधा पाश्चात्यांच्या लिहिण्या-बोलण्यात या पूर्वी वसाहती असलेल्या प्रदेशांचा 'तृतीय विश्व' असा एकत्रितपणे उल्लेख केला जातो. वसाहतवादाचा विविध ठिकाणांवर, जनसमुहांवर व संस्कृतींवर पडलेल्या असमान प्रभावाचे विश्लेषण करून उत्तर वसाहतवादी साहित्यात या पूर्वीच्या वसाहतींच्या प्रदेशांचे बहुढंगी स्वरूप प्रदर्शित केले जाते. पूर्वीचे संबंध, प्रथा-परंपरा व प्रातिनिधिक गोष्टींची पुनर्निर्मिती करण्यासाठी किंवा त्या वेगळ्या स्वरूपात मांडण्यासाठी नानाविध मार्गांचा अवलंब केला जातो. त्यात साम्राज्याचे 'हृदय आणि टोके' यांच्यातील संबंधांचा अभ्यास केला जातो. पाश्चात्य गोष्टींना पूर्वी विरोध होता व तो आताही आहे, याची जाणीव उत्तर साम्राज्यवादात ठेवली जाते. खास करून हा विरोध वंचित घटकांसह अनेक समाजवर्गांमध्ये सक्रियतेने दिसून येतो. पश्चिमेकडील वर्चस्वी विचारसरणी खिळखिळी करण्याची चौकट उत्तर वसाहतवाद पुरवितो, 'अंगभूत गृहितकां'ना आव्हान देतो वसाहतवादाच्या ऐहिक व अनुषंगिक वारशांचे समालोचन करतो. वसाहतवादाच्या या गृहितकांना व वारशांना आव्हान देण्यासाठी उत्तर वसाहतवादी अभ्यासाची नळ मातीशी जोजलेली असावी लागते. यासाठी मूर्त अस्मिता, विविध अनुषंगिक संबंध व प्रक्रियांचा अभ्यास करावा लागतो. उत्तर वसाहतवादी तत्वचिंतक

एडवर्ड सईद यांनी १९७८ मध्ये लिहिलेले 'Orientalism' हे पुस्तक या क्षेतातील अत्यंत मूलगामी असे काम मानले जाते.

याखेरीज उत्तर वसाहतवादात वसाहत बनविल्या गेलेल्या समाजांच्या सांस्कृतिक अस्मितेचा आणि खास करून वसाहतवादी राजवटीनंतर स्वत:ची अशी राष्ट्रीय अस्मिता उभा करण्यात त्यांची होणारी कुचंबणा याचा अभ्यास केला जातो. लेखकांडून त्या अस्मितांचा उलगडा करून त्यांचा गौरव कसा केला गेला ( बहुधा यासाठी अशा अस्मिता वसाहतवाद्यांकडून पुन्हा मिळवून आणि त्यांच्याशी भक्कम संबंध कायम ठेवून असे केले जाते), वसाहतींमधील लोकांची ज्ञाननिर्मिती व त्याचा वापर वसाहतवाद्याचे हित जपण्यासाठी कसा केला गेला आणि वसाहत  बनविले गेलेले लोक, समाज व त्यांच्या संस्कृती हीन दर्जाची असल्याच्या प्रतिमा सातत्याने निर्माण करून वसाहतवादाचे समर्थन कसे केले गेले, या सर्व गोष्टी उत्तर वसाहतवादात विचारात घेतल्या जातात. अस्मिता, इतिहास व भावी संभाव्यतांमधील हा अंतर्गत कलह बहुधा महानगरांमध्ये आणि साम्राज्यवादी व्यवस्था टिकून राहिलेल्या विद्यापीठांसारख्या ठिकाणी प्रकर्षाने पाहायला मिळतो. त्यामुळे अनेक प्रमुख समकालिन उत्तर वसाहतवादी लेखकांचे वास्तव्य लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क व माद्रिद या शहरांमध्ये असणे हे आश्चर्याचे नाही.

द्वि-पर्यायी विरोधाभासाची संरचना उभी केल्याने आपली इतरांकडे पाहण्याची दृष्टी बदलून गेली. वसहतवादात पौर्वात्य जनसमुदाय पाश्चात्यांहून निराळे असल्याचे गृहितक होते. 'दुय्यम' दर्जाच्या लोकांवर सत्ता गाजविण्याचा ईश्वरदत्त अधिकार सांगणे व बिगर गौरवर्णीय हे गौरवर्णी समाजावरील ओझे आहे, अशा वसाहतवादी विचारांना याच गृहितकाने जन्म दिला. या उलट उत्तर वसाहतवादात संमिश्रतेच्या व आंतर-सांस्कृतिक सामायिकतेच्या बाबींचा शोध घेतला जातो. हल्लीच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियांमध्ये हा पैलू विशेष महत्वाचा आहे.

'Post-Colonial Drama: theory, practice, politics' मध्ये हेलेन गिल्बर्ट व जोन टॉम्पकिन्स लिहितात, 'व्युत्पत्तीशास्त्रानुसार काटेकोर अर्थ लावल्याने उत्तर वसाहतवाद ही एक कालवाचक संकल्पना आहे असा गैरसज निर्माण होतो. वसाहतवाद संपल्यानंतरचा कालखंड किंवा परकीय सत्तेतून स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा काळ असा त्यामुळे अर्थ लावला जातो. परंतु उत्तर वसाहतवाद ही या प्रयोजनाने केलेली साधीसुधी कालगणना नाही. उलट वसाहतवादी विचारसरणी, सत्तेच्या संरचना व सामाजिक उतरंड या बाबींकडे वस्तुनिष्ठतेने पाहून त्यांना विरोध करणे म्हणजे उत्तर वसाहतवाद आहे. त्यामुळे उत्तर वसाहतवादी विचारप्रणालीमध्ये वसाहवादानंतरच्या काळाची केवळ क्रमवार मांडणी करणे आणि साम्राज्यवादाच्या कटू अनुभवांवर दिशाहीन चर्चा करणे याहून आणखीही बरेच काही असणे आवश्यक आहे.''

वसाहतवादी गुलामगिरी सोसलेले लोक जेव्हा स्वत:च्या गरजेसाठी स्वत:चा इतिहास व वासरा याविषयी वसाहतवाद्यांच्या भाषांमध्ये (उदा: इंग्रजी, फ्रेंच,डच इ.) लिखाण करतात तेव्हा खरे तर ते वसाहतवादी वारसाच जोपासत असतात. पूर्वीच्या

वसाहतींमधील लोकांना वसाहतवादी मानसिकतेतून बाहेर काढणे उत्तर वसाहतवादी विचारप्रणालीने शक्य होते व त्यातूनच उत्तर वसाहतवादी साहित्याची निर्मिती होते.

उत्तर वसाहतवादी सिद्धांताची एकच अशी निर्णायक व्याख्या करण्यावरून बरीच टीका झालेली आहे. अस्मितेच्या राजकारणात गुंतलेली संकल्पना म्हणूनही अनेक लेखकांनी त्याची हेटाळणी केली आहे. ज्ञानमीमांसा, नीतीशास्त्र व राजकारण या दृष्टीने विचार केला तर वसाहतवाद संपल्यानंतर स्वत:ची स्वतंत्र राष्ट्रीय अस्मिता निर्माण करण्यात लिंग, वंश, वांशिकवाद व वांशिकतेच्या कशा अडचणी येतात व वसाहतवाद्यांनी स्वत:च्या हितासाठी स्थानिक गुलाम लोकांचे ज्ञान कसे वापरून घेतले, याचा विचार उत्तर वसाहतवादी विचारप्रणालीत केला जातो. शक्तिहीन आणि शक्तिमान यांच्यातील खास नात्यामुळे जगाविषयीचे ज्ञान कसे निर्माण केले जाते, त्याचा वारंवार कसा प्रसार केला जातो व सरतेशेवटी साम्राज्यवादी हितासाठी ते कसे दावणीला बांधले जाते, याचे विवेचनही यात केले जाते. त्याचप्रमाणे वसाहतींमधील लोकांच्या सृजनात्मक विचारांमधील वसाहतवाद्यांविषयीच्या विरोधामुळे युरोपीय साम्राज्यवाद्यांच्या वसाहतींसंबंधीच्या योजनांमध्ये कशी गुंतागुंत निर्माण झाली व त्यातून मार्ग काढण्यासाठी वसाहतवाद्यांनी आपल्या वर्चस्वास वैधता देण्यासाठी कोणत्या युक्त्या लढविल्या यासंबंधीच्या चिंतनाचाही उत्तर वसाहतवादी मीमांसेत विचार केला जातो.

पूर्वी वसाहती असलेल्या देशांमधील लोकांचे युरोपियनांचे 'पोकळ नकलाकार' (Hollo Mimics) किंवा सत्तेचे निष्क्रिय लाभार्थी (passive recipients of power) असे चित्रण केले जाण्यास उत्तर वसाहतवादी लेखक आक्षेप घेतात. फौक्लाऊड यांनी मांडलेल्या विचाराची मदत घेत उत्तर वसाहतवादी विचारवंत असा युक्तिवाद करतात की, बळाचा वापर करण्याच्या प्रत्येक कृतीला वसाहतवादाचा विरोध प्रदर्शित झालेला आहे. या विचारवंतांच्या साहित्याला '' असेही संबोधले जाते.

**तुमची प्रगती तपासा**

**१. उत्तर वसाहतवाद**संबंधीच्या **वस्तुविषय** चिकित्सक करा?

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

### ९.२.५ उत्तर वसाहतवादी साहित्य

वसाहतवाद विरोधी प्रतिक्रियांतून निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या साहित्यिक लिखाणाचा उत्तर वसाहतवादी साहित्यात समावेश होतो.

### ९.२.५.१ सबलटन (उत्तर वसाहतवाद)

सामाजिक, राजकीय आणि भौगोलिकदृष्ट्या वर्चस्वी सत्ता व्यवस्थेच्या बाहेरअसलेल्या लोकांना उत्तर वसाहतवादात व तदनुषंगिक लिखाणात कनिष्ठ वर्गातील लोक किंवा 'सबलटन' (Subaltern) मानले जाते.

### ९.२.५.२ इतिहास (History)

मार्क्सवादी सैधान्तिक अँतोनिओ ग्रॅमस्की यांनी वापरलेला 'सबलन' (Subaltern) हा शब्द 'सबलटन स्टडिज ग्रुप'च्या (Subaltern Studies Group) माध्यमातून उत्तर वसाहतवादी अभ्यासक वापरू लागले. दक्षिण आशियाच्या इतिहासातील उच्चभ्रू नसलेल्या समावर्गातील व्यक्तींच्या योगदानाचा मागोवा घेण्यात स्वारस्य असलेल्या इतिहास संशोधकांनी एकत्र येऊन 'Subaltern Studies Group'ची स्थापना केली आहे. पूर्वी वसाहतवादी अंमलाखाली राहिलेल्या जनसमुहांसाठी 'सबलटन' हा शब्द सन १९७० च्या दशकात वापरला जाऊ लागला. यामुळे या पूर्वीच्या वसाहतनिवासींच्या इतिहासाकडे वसाहतवाद्यांच्या नव्हे तर त्यांच्या स्वत:च्या दृष्टिकोनातून पाहण्याची नवी दिशा मिळाली. वसाहतवादाच्या इतिहासाकडे कष्टकऱ्यांच्या नजरेतून पाहण्यास मार्क्सवादी इतिहासकारांनी आधीच सुरुवात केली होती. परंतु त्यावरही जगाकडे पाहण्याच्या युरोपकेंद्रीत दृष्टीची छाप असल्याने मार्क्सवाद्यांचा तो दृष्टिकोन काही वेळा असमाधानकारक वाटू लागला होता.

दक्षिण आशियातील इतिहास लेखनपद्धतीमधील हस्तक्षेप म्हणून सन १९८० च्या दशकाच्या सुरुवातील 'सबलटन अभ्यासा'ला सुरुवात झाली. आशिया खंडाच्या इतिहास लेखनाचे नवे मॉडेल म्हणून सुरुवात झालेल्या या 'सबलटन' चळवळीला लवकरच 'उत्तर वसाहतवादाची जोरदार समालोचना' असे स्वरूप प्राप्त झाले. आता इतिहास, मानवशास्त्र, समाजशास्त्र, मानवी भूगोल व साहित्यामध्ये 'सबलटन'ची ही संकल्पना नियमतपणे वापरली जाऊ लागली आहे.

### ९.२.५.३ अर्थ

'सबलटन' ही संज्ञा उत्तर वसाहतवादी तत्वप्रणालीमध्ये वापरली जाते. सध्या तात्विक आणि मीमांसात्मक लिखाणात ही संज्ञा नेमक्या कोणत्या अर्थाने वापरली जाते याविषयी वाद आहेत. सामाजिक दर्जामुळे ज्यांना कोणतेही अधिकार नाहीत अशा पददलित व खालच्या समाजवर्गांसाठी काही विचारवंत या संज्ञेचा वापर सरधोपटपणे करतात. गायत्री चक्रवर्ती स्पिवॅक यांच्यासारखे इतर काही विचारवंत मात्र या संज्ञेकडे अधिक सुष्पष्ट अर्थाने पाहतात. गायत्री असा युक्तिवाद करतात की, " समाजजीवनाच्या लाभांपासून दुरावलेल्या अशा वंचित वर्गापुरती 'सबलटन' ही संज्ञा मर्यादित नाही. उत्तर वसाहतवादी दृष्टिकोनातून विचार केल्यास सांस्कृतिक साम्राज्यवादामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर लोटल्या गेलेल्या सर्वांनाच 'सवलटन' या संज्ञेत घ्यावे लागेल. ही संज्ञा त्यांचे वेगळेपण दाखविणारी आहे. 'सबलटन' म्हटल्याने हे लोक फक्त शोषित आहेत, असे कोण बरं म्हणू शकेल? श्रमिकवर्ग शोषित आहे, पण तो 'सबलटन' नाही. 'सबलटन' म्हणवून घेण्याचा अनेक वर्ग दावा करतात. पण ते सर्वात कमी मनोवेधक व सर्वात जास्त धोकादायक आहेत. मला असे म्हणायचे आहे की, विद्यापीठांच्या कॅम्पसमध्ये पक्षपाती वागणूक मिळालेले अल्पसंख्य आहेत म्हणून त्यांच्यासाठी 'सबलटन' ही संज्ञा वापरण्याची गरज नाही. पक्षपाताचे तंत्र काय आहे हेही पाहावे लागेल. तेही वर्चस्वी विचारधारेतीलच आहेत. त्यांनाही आपला वाटा हवा आहे, पण तो घेऊ दिला जात नाही. त्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी त्यांनी वर्चस्वी विचारधारेतीलच मार्ग वापरावेत. त्यांनी स्वत:ला 'सबलटन' म्हणवून घेण्याची गरज नाही."

लष्करात कनिष्ठ हुद्द्यासाठी असलेली ही संज्ञा लष्कराखेरीज अन्य संदर्भात सर्वप्रथम मार्क्सवादी विचारवंत अॅन्तोनिओ ग्रॅमस्की यांनी वापरली. काहींना असे वाटते की, आपले लिखाण तुरुंगातील सेन्सॉरशिपमधून सहीसलामत बाहेर पडावे यासाठी ग्रॅमस्की यांनी 'प्रोलेटॅरिएट' (proletariat) या शब्दासाठी 'सबलटन' (Subaltern) हा शब्द सांकेतिक अर्थाने वापरला असावा. मात्र इतरांना वाटते की, हा शब्द वापरण्यामागील ग्रॅमस्की यांचा हेतू नेमका स्पष्ट होत नसला तरी तो व्यापक अर्थी होता. होमी भाभा हे उत्तर वसाहतवादी विचारधारेतील एक प्रमुख चिंतक आहेत. भाभा यांनी त्यांच्या अनेक निबंधांमध्ये सामाजिक शक्तींच्या नातेसंबंधांच्या महत्वावर भर देऊन 'सबलटन'ची व्याख्या, 'बहुसंख्यक वर्गाला ज्यांची स्वत:ची वेगळी ओळख होण्यासाठी ज्यांचे अस्तित्व नितांत गरजेचे होते, असे शोषित वर्ग' अशी केली आहे. त्यांच्या मते वर्चस्वी सत्तावर्तुळांमध्ये असणाऱ्यांची अधिकाराची गुर्मी उतरविण्याची क्षमताही या 'सबलटन' वर्गांमध्ये होती.

**तुमची प्रगती तपासा**

१. कनिष्ठ वर्गा **<u>उत्तर वसाहतवाद </u>इतिहास** स्पष्ट करा?

---

---

---

**९.२.६ निष्कर्ष**

पाश्चात्यांचे ज्ञानमार्ग एवढे शक्तिशाली का ठरले व त्यांचे वर्चस्व आजही का टिकून आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न उत्तर वसाहतवादी विचारधारेत केला जातो. एडवर्ड सईद यांचे प्राच्यवादावरील काम हेही एका अर्थी 'सबलटन' या संकल्पनेशीच निगडित आहे. कारण वसाहतवादाच्या माध्यमातून इतरांवर वर्चस्व गाजविण्या ाच्या समर्थनाचा पाया प्राच्यवादाने (Orientalism) कसा घातला हे ते स्पष्ट करतात. सईद असा युक्तिवाद करतात की, युरोपीय लोकांनी त्यांना त्यावेळी माहित असलेल्या जगाच्या पलिकडील पौर्वात्य प्रदेशांचा प्रत्यक्ष शोध घेण्यापूर्वी त्या ठिकाणी क्रूर आणि राक्षसी लोक राहतात,असे एक काल्पनिक चित्र स्वत:च्या मनात तयार केले होते. सुरुवातीच्या शोध मोहिमांवरून परत आलेल्यांनी त्या पूर्वेकडील प्रदेशात खरंच राक्षस व विचित्र गोष्टी पाहिल्याच्या कंड्या पिकविल्याने आधीच्या पुराणकथांना बळकटी मिळाली. पूर्वेकडील प्रदेशांच्या वेगळेपणाची आणि विचित्रपणाची ही कल्पना माध्यमांतील प्रसिद्धी व 'आपण'आणि 'ते' असे परस्परविरोधी चित्र निरंतरपणे निर्माण करून कायम ठेवली गेली. पूर्वेकडील प्रदेशांच्या या काल्पनिक वेगळेपणाच्या आधारे युरोपीय लोकांनी आपल्या श्रेष्ठत्वाची ओळख निर्माण केली. पूर्वेकडील लोक मागासलेले व विवेकशून्य आहेत व त्यांना युरोपीय अर्थाने आधुनिक करण्याची गरज आहे, असा प्रचार सुरु केला गेला. यातूनच वसाहतवादाचा पाया रचला गेला. प्राच्यवादाची ही संपूर्ण विचारसरणी युरोपकेंद्रित असून त्यात पौर्वात्य लोकांचे आवाज उमटण्यास जराही जागा नाही."

आज अनुसरली जाणारी विकासाची प्रमुख विचारसरणी वसाहतवादी ज्ञानावर आधारित असून अविकसित देशांना आधुनिकतेची कास धरायची असेल तर विकसित पाश्चात्य देशांच्या मार्गाने जायला हवे, हे त्यातील मुख्य सूत्र आहे. यात मुक्त व्यापार, खुल्या बाजारपेठा आणि भांडवलदारी व्यवस्था हाच विकासाचा मार्ग सांगितला जातो. यात विकसित देशांनी अनुसरलेली धोरणे सर्व देशांनी सार्वत्रिकपणे राबविण्यावर भर दिला जातो.

ज्यांचे आवाज दडपले गेले आहेत असे समाजवर्ग म्हणजे 'सबलटन' अशी व्याख्या केली जात असली तरी विकासाच्या या मुख्य विचारप्रवाहाविरुद्ध कृतीशील निषेध व्यक्त करून ते विकासाची स्वत:ची पर्यायी चित्रे उभी करू शकतात. पाश्चात्य श्रेष्ठत्वाच्या आणि बलाढ्यतेच्या दाव्यांना आव्हान देऊन ते उखडून फेकण्यासाठी या 'सबलटन' वर्गांकडून सामाजिक चळवळी उभ्या केल्या जात आहेत. विरोधासाठी आणि त्यातून पर्यायी भवितव्याला जागा तयार करण्यासाठी हे 'सबलटन' वर्ग स्थानिक शहाणपण व आदोलनाच्या मार्गांचा उपयोग करत आहेत.

## ९.३ संदर्भ


- Asad, Talal. Genealogies of Religion: Discipline and Reasons of Power in Christianity and Islam. Baltimore: Johns Hopkins University Press, 1993.
- Clifford, James. The Predicament of Culture: Twentieth-Century Ethnography, Literature, and Art. Cambridge, Mass.: Harvard University Press, 1988.
- Clifford, James, and George E. Marcus, eds. Writing Culture: The Poetics and Politics of Ethnography. Berkeley: University of California Press, 1986.
- Derrida, Jacques. Of Grammatology. Translated by Gayatri Chakravorty Spivak. Baltimore: Johns Hopkins University Press, 1976.
- Douglas, Mary. Purity and Danger: An Analysis of Concepts of Pollution and Taboo. New York: Praeger, 1966.
- Dreyfus, Hubert L., and Paul Rabinow. Michel Foucault, beyond Structuralism and Hermeneutics. Chicago: University of Chicago Press, 1982.
- Dumont, Louis. Homo Hierarchicus: An Essay on the Caste System. Translated by Mark Sainsbury. Chicago: University of Chicago Press, 1970.

- Foucault, Michel. The Archaeology of Knowledge. Translated by A. M. Sheridan Smith. London: Tavistock, 1972.
- Discipline and Punish: The Birth of the Prison. Translated from the French by Alan Sheridan. New York: Pantheon, 1977.
- Power/Knowledge: Selected Interviews and Other Writings, 1972–1977. Translated and edited by Colin Gordon. New York: Pantheon, 1980.
- Héritier, Françoise. Two Sisters and Their Mother: The Anthropology of Incest. Translated by Jeanine Herman. New York: Zone Books, 1999.
- Heusch, Luc de. The Drunken King, or, The Origin of the State. Translated and annotated by Roy Willis. Bloomington: Indiana University Press, 1982.
- Hugh-Jones, Stephen. The Palm and the Pleiades: Initiation and Cosmology in Northwest Amazonia. Cambridge, U.K., and New York: Cambridge University Press, 1979.
- Leach, Edmund. Claude Lévi-Strauss. Revised edition. New York: Viking, 1974.
- Culture and Communication: The Logic by Which Symbols Are Connected. Cambridge, U.K., and New York: Cambridge University Press, 1976.
- Rethinking Anthropology. London: Athlone Press; New York: Humanities Press, 1961.
- Lévi-Strauss, Claude. The Elementary Structures of Kinship. Translated by James Harle Bell, John Richard von Sturmer, and Rodney Needham. Boston: Beacon, 1969.
- From Honey to Ashes. Translated by John and Doreen Weightman. London: J. Cape, 1973.
- The Naked Man. Translated by John and Doreen Weightman. London: J. Cape, 1981.
- The Origin of Table Manners. Translated by John and Doreen Weightman. London: J. Cape, 1978.
- The Raw and the Cooked. Translated by John and Doreen Weightman. New York: Harper and Row, 1969.
- The Savage Mind. Chicago: University of Chicago Press, 1966.

- Manganaro, Marc, ed. Modernist Anthropology: From Fieldwork to Text. Princeton, N.J.: Princeton University Press, 1990.
- Ortner, Sherry. Sherpas through their Rituals. Cambridge, U.K., and New York: Cambridge University Press, 1978.
- Rabinow, Paul. French Modern: Norms and Forms of the Social Environment. Cambridge, Mass.: MIT Press, 1989.
- Said, Edward. Orientalism. New York: Pantheon, 1978.
- Taussig, Michael T. Defacement: Public Secrecy and the Labor of the Negative. Stanford, Calif.: Stanford University Press, 1999.
- Mimesis and Alterity: A Particular History of the Senses. New York: Routledge, 1993.
- Robert Launay
- New Dictionary of the History of Ideas
- BerrinChatziChousein- Turkey Architecture News - Aug 11, 2013 - 13:31
- https://worldarchitecture.org/architecture-news/pgmgz/postcolonialism.html#:~:text=Postcolonialism%20is%20defined%20in%20anthropology,they%20colonized%20and%20once%20ruled.
- https://chicagounbound.uchicago.edu/cgi/viewcontent.cgi?article=1029&context=public_law_and_legal_theory
- https://www.slideshare.net/britishstudiesintehran/postmodernism-poststructuralism-and-postcolonialism-in-ir
- encyclopedia.com


❖❖❖❖

# १०

# उत्तर आधुनिक स्थिती
# जागतिकीकरण, संकर, प्रवाह, सीमा
# POST-MODERN LOCATIONS GLOBALIZATION, HYBRIDITY, FLOWS, BOUNDARIES

फाल्गुनी वाहनवाला

**घटक रचना**

१०.० उद्दिष्टे
१०.१ प्रस्तावना
१०.२ जगतिकीकरणाचा इतिहास
१०.३ जागतिकीकरणाची समज
१०.४ जागतिकीकरणाचा शहरांवर परिणाम
१०.५ तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण
१०.६ जागतिकीकरण आणि भाषा
१०.७ जागतिकीकरण आणि संस्कृति उद्योग
१०.८ मानववंशशास्त्र आणि जागतिकीकरण यांमधील संबंध
१०.९ जगतिकीकरणाचा आदिवासी लोकसंख्येवर झालेला परिणाम
१०.१० मानववंशशास्त्रीय संशोधनात जागतिकीकरणाचा प्रभाव
१०.११ संकरीकरण
१०.१२ प्रवाह आणि सीमा
१०.१३ सारांश
१०.१४ प्रश्न
१०.१५ संदर्भ

## १०.० उद्दिष्टे

१. जागतिकीकरणाचा अर्थ आणि मानववंशशास्त्राशी त्याची प्रासंगिकता समजून घेणे.
२. जागतिकीकरणाशी जोडलेल्या संकल्पना जसे संकर, प्रवाह आणि सीमा समजून घेणे.
३. आदिवासींवर जागतिकीकरणाचा प्रभाव समजून घेण्यासाठी, मानववंश शास्त्रातील संशोधन करणे.

## १०.१ प्रस्तावना

या धड्यात आपण मानववंशशास्त्राच्या दृष्टिकोनातून जगतिकीकरणकडे पाहणार आहोत. त्याच बरोबर जगतिकीकरणांशी जोडलेल्या तीन संकल्पनांचे देखील अवलोकन करणार आहोत. चाकाचा आविष्कार, औद्योगीकरण आणि जागतिकीकरण, या तीन प्रमुख क्रांतिकारी घटनांमुळे जगात अनेक बदल घडून आले. जागतिकीकरणामुळे देशांमध्ये दोन रचनात्मक बदल घडून आले; एकरूपता आणि विविधीता.

अनेक युगांपासून मानव फिरत आहे, प्रवास करत आहे. व्यापार, यात्रा, लग्न, स्थळांतरितांचे आक्रमण, राजे महाराजे, आपल्या मुलांना वेगवेगळी कौशल्ये शिकण्यासाठी, परदेशी पाठवत असत, रेशीम, मासल्यांची देवाण-घेवाण; अक्षय अनेक कारणांसाठी मानव प्रवास करत राहिला. शोध आणि विज्ञान युगामुळे, अर्थव्यवस्था आणि लोकांमधली अस्वस्थता, दोन्ही वाढले. म्हणूनच, खरे पाहता, जागतिकीकरण, ही समाजात घडलेली काही नवीन घटना नाही. तथापि; शैक्षणिक दृष्ट्या समजून घेण्यासाठी मानवाची आणि त्याचबरोबर समाजाची देखील उत्क्रांती आणि प्रगती समजून घेणे गरजेचे आहे.

## १०.२ जगतिकीकरणाचा इतिहास

एकोणिसाव्या शतकापर्यंत जागतिक एकीकरण, अनेक देश, काही दुसऱ्या देशांच्या वसाहती असल्यामुळे, वेगाने सुरू झाले नव्हते. पण नंतर आगबोटी, आगगाडी, तारसेवा आणि इतर तांत्रिक गोष्टींतली प्रगती आणि विवध देशांतील आर्थिक सहकार्यामुळे, संपूर्ण जग, जागतिकीकरणाच्या पहिल्या लाटेवर स्वार झाले. पहिले महायुद्ध आणि त्यानंतरच्या संरक्षणवाद आणि आर्थिक महामंदीमुळे, जगतिकीकरणाचा जोर कमी झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर, १९४० च्या दशकात, अमेरिकेने आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणुकीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रस्थापित मूलभूत नियमांनुसार प्रयत्न केले आणि जागतिकीकरणाची दुसरी लाट सुरू झाली. वेळोवेळी आलेली आर्थिक मंदी आणि वाढती राजकीय अस्थिरता असूनही जागतिकीकरण दिवसेंदिवस मजबूत होत आहे.

3D प्रिंटिंग, 5G इंटरनेट स्पीड सारख्या तांतज्ञानटल्या विकासामुळे सध्या आपण एका अत्यंत प्रगत समाजात वावरत आहोत. याचबरोबर, पुन्हा वापरता येणारी रॉकेट्स, विमानाने प्रवास कणारी मोठी लोकसंख्या, डिजिटल चलन, पेटीएम UPI सारखी सुविधा, ही सगळी प्रगत समाजाची लक्षणे आहेत. मात्र जागतिक तापमानवाढ, हा अति प्रगत देशांना पण सतावणारा धोका आहे. तांत्रिक दृष्ट्या अत्यंत प्रगत समाजात असून सुद्धा आजही धार्मिक संघर्ष वाढत आहेत. चीनसारख्या काही देशांनीही उत्पादन व्यवसाय आणि निर्यात वाढवून मोठी भूमिका बजावली आहे. दुसऱ्या शब्दांत, चीनने बनवलेली उत्पादने जगातील जवळजवळ सर्व भागांमध्ये पोहोचली आहेत. याचा प्रत्येक देशावर आणि त्यांच्या व्यापारावर परिणाम झाला आहे.

भारतासारख्या अर्थव्यवस्थेतला मध्यम या वस्तूंचा अधिकाधिक वापर करतो. aवाढत्या अर्थव्यवस्थांमध्ये लक्झरी वस्तूंचाही मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. या वाढत्या अर्थव्यवस्थांना विकसित अर्थव्यवस्थांकडून बाजार म्हणूनही पाहिले जाते.

ई-कॉमर्समुळे मानवाच्या सवयी बदलत आहेत. व्यवसायात समोरासमोर होणारा संवाद आणि खरेदी-विक्री कमी झाली आहे. असंख्य उत्पादने बाजारात उपलब्ध असल्यामुळे, लोक विविध प्रकारच्या उत्पादनांची खरेदीचा प्रयोग करत आहेत. नवीन तंत्रज्ञानामुळे व्यवसाय चालवण्याचा खर्च कमी होतो आहे. हल्ली घरून काम करण्याच्या संधीमुळे, कार्यालये, त्यांतील विविध गोष्टी, जसे वीज, संगणक, इत्यादि पायाभूत सुविधांचा खर्च कमी झाला आहे.

## १०.३ जागतिकीकरणाची समज

**IMF** (इंटरनॅशनल मॉनेटरी फंड) च्या मान्यतेनुसार, जागतिकीकरण ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे आणि ती मानवी उत्क्रांती आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा परिणाम आहे. कच्चा माल, विविध सेवा आणि भांडवले, आजकाल देशांच्या सीमा ओलांडून देवाण-घेवाण करतात, ज्यातून जगभरातील अर्थव्यवस्थांच्या वाढत्या एकात्मतेचा संदर्भ मिळतो. ह्या देवाण-घेवणीत लोक (कामगार) आणि ज्ञान (तंत्रज्ञान) यांचा पण समावेश आहे. जागतिकीकरणाचे व्यापक सांस्कृतिक, राजकीय आणि पर्यावरणीय परिमाण देखील आहेत. जागतिकीकरणाचे चार प्रमुख भाग आहेत; व्यापारात वृद्धी, भांडवली प्रवाह, स्थलांतर किंवा लोकांची हालचाल आणि ज्ञानाची देवाणघेवाण. आधुनिक जागतिकीकरणाच्या विकासासाठी अनेक कारणे आहेत, त्यापैकी एक म्हणजे औद्योगिकीकरणाच्या प्रगत टप्प्याची वाढ आणि सेवा क्षेत्राची वाढ. याचा समाजातील जवळपास सर्वच क्षेत्रांवर परिणाम झाला आहे. जागतिकीकरणाचा लिंग समानता, कौटुंबिक संरचना, सामाजिक सुरक्षा जाळे, प्रशासन, शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य सेवा प्रणाली, सण, भाषा, संगीत, साहित्य, सिनेमा, दूरदर्शन, औषधे, तस्करी यासारख्या अनेक क्षेत्रांवर परिणाम झाला असल्याची नोंद उपाध्याय (2014) करतात.

खालील प्रमाणे जागतिकीकरणाचे विविध प्रकार आहेत:
अ. **आर्थिक जागतिकीकरण:** बाजार, अर्थव्यवस्था आणि मुक्त व्यापार यांचे उदारीकरण

ब. **तांत्रिक जागतिकीकरण:** संगणक, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारखे तंत्रज्ञान तयार केले जाते आणि वापरण्यात येते.
क. **सांस्कृतिक जागतिकीकरण**: हयात खण्यापिण्याच्या सवाई, किंवा जीवनशैली एकसारखे होतात किंवा त्यांची आदलबादळ / देवाण घेवाण होते. उदाहरणार्थ: कुठल्याही मॉल मध्ये काही ब्रॅंडची दुकाने असतातच. जेथे खाण्याच्या सवयी आणि जीवनशैली एकसंध बनविली जाते किंवा देवाणघेवाण केली जाते. उदाहरणार्थ, जर तुम्ही मॉलमध्ये

पाहिले तर प्रत्येक मॉलमध्ये काही ब्रँड सारखेच असतातच. दुसरे उदाहरण **TIK TOK** चे आहे; जे दुसऱ्या देशात उदयास आले; पण त्याचा वापर मात्र जगभरात अधिक झाला.

ड. **राजकीय जागतिकीकरण:** भू -राजकीय निर्णय किंवा एखाद्या देशाने घेतलेल्या कुठल्याही निर्णयांचा दुसऱ्या देशावर परिणाम होऊ शकतो. उदाहरणार्थ, तेल उत्पादक देशांनी त्यांच्या तेलाच्या धोरणांमध्ये बदल केल्यास, पूर्ण जगातल्या देशांवर त्याचा परिणाम होईल.

जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थांच्या विकासावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो. उदाहरणार्थ, अलीकडच्या काळात भारताला सर्वाधिक परकीय थेट गुंतवणूक प्राप्त झाली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने अहवाल दिला आहे की भारतातील **FDI** जो 1990-91 मध्ये 97 दशलक्ष डॉलर होता तो 2020-21 मध्ये 81,722 दशलक्ष डॉलर झाला आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१. जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १०. ४ जागतिकीकरणाचा शहरांवर परिणाम

शहरे, कार्यक्षेत्रे, शहरांमधील जमिनीचा भाव जागतिकीकरणामुळे कसा वाढला हे माथूर (२००५) सांगतात. देशात, आणि विशेषत: शहरांमध्ये, मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या **FDI** गुंतवणुकीचा हा परिणाम आहे. ज्ञानोद्योग, सेवा उद्योग आणि बीपीओ यासारख्या अनेक नवीन कंपन्यांनी भारतात प्रवेश केला, ज्यामुळे सहा शहरांचा आर्थिक विकास जास्त झाला. इतर आशियाई देशांच्या तुलनेत भारतात **FDI**ची सुरुवातीला गुंतवणूक कमी होती असेही ते म्हणतात.

उदारीकरणामुळे शिक्षण क्षेत्रातही अनेक बदल झाले. बॅचलर इन मास मीडिया आणि बिझनेस मॅनेजमेंट सारखे अनेक नवीन अभ्यासक्रम, बाजारात होणाऱ्या बदलावा करिता तयार केले गेले (भाटिया, पॅनेर, 2019). ह्या अश्या नवीन बाजारात, कौशल्यपूर्वक काम करणाऱ्या व्यक्ति, तयार करणाऱ्या अनेक व्यापार शाळा (बिझिनेस स्कूल्स) देखील विकसित केल्या गेल्या. या शाळांत कुशल व्यक्तींची निर्मिती होत गेली, ज्यामुळे उद्योगांमधील कौशल्य आणि रोजगारक्षमते दरम्यानचे अंतर कमी झाले.

जागतिकीकरणामुळे आणखीन एक समस्या उदयास आली: लोकांच्या एक देशातून दुसऱ्या देशात होणाऱ्या प्रवासमुळे रोग आणि विषाणूंचे देखील जागतिकीकरण झाले. उदाहरणार्थ – सध्या सुरू असलेली करोंना रोगाची साथ. ह्या साथी मुळे पूर्ण जगात अनेक बदल घडले, पर्यटन उद्योग बंद पडण्यासारखे अनेक बदल झाले. लाखो लोक

अनवाणी आपल्या गावाकडे निघाले. ऑनलाईन शिक्षण सुरु झाले. याचा मुलांवरही परिणाम झाला. मुख्यतः ज्यामुलांकडे मोबाईल फोनच नाही, त्यांना त्रास झाला. अचानक लहान मुलांनी एक नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे, ही एक कठीण समस्या होऊन बसली. अनेक मुलांकडे तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेचा अभाव, ही देखील एक मोठी समस्या आहे. उदाहरणार्थ, "काश्मीर" या लघुपटामध्ये, काश्मीरच्या दुर्गम भागातील मुले इंटेरनेटच्या अभावी, ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी कसे संघर्ष करीत आहेत, ह्याचे चित्रण केले आहे. काश्मीरच्या खोऱ्यात, नेटवर्क मिळवण्यासाठी, काहींना दरीवर ४ -४ किलोमेटेरचे अंतर चालत जावे लागते. आणखीन काही खेडी, ही जंगलाच्या मध्यभागी किंवा अभयारण्यात वसलेली आहेत. वन्य प्राण्यांची भीती, संघर्ष क्षेत्रात रहाणे याबरोबरच, त्या मुलांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करत, सतर्क पण राहावे लागते. आपल्या देशातील खेड्यापर्यंत अजूनही तंत्रदणायन वापरण्याची सुलभता, आणि प्रगती पोहोचलेली नाही, हेच ह्यावरून कळते.

## १०.५ तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण

तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)ची प्रगती आणि वाढ वेगाने होत आहे. दुसऱ्या शब्दांत, आपण एक डेटा-आधारित जगात वावरत आहोत. बँक, ग्रंथालयांपासून ते शिक्षणापर्यंत, टेलिमेडिसिन सारख्या आरोग्य सेवा सुविधा आणि ॲप्सशी संबंधित वैद्यकीय सेवेपर्यंत, सर्वकाही डिजिटल केले जात आहे. यामुळे नवीन आरोग्य समस्या निर्माण झाल्या आहेत. मोबाईल, विशेषत: सोशल मीडिया, सारख्या तंत्रज्ञानाच्या उपकरणांचा अति वापर. अति-वापरामुळे मुलांमध्ये रात्री उशिरा झोपण्यासारख्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यांच्या मेंदूत मोठ्या प्रमाणावर डोपामाइन रसायन सुटते आणि त्यामुळे झटपट समाधान मिळवण्या कडे अधिक प्रवृत्ती तयार झाली आहे.

सायबर फसवणूक हा देखील एक मोठा मुद्दा आहे. इंटरनेटची जास्त माहिती नसलेल्या लोकांना फसवून त्यांना लुटले जाते. हे सर्व, फोन कॉल, स्पॅम किंवा ईमेल द्वारे होत आहे. सायबर फसवणूकीचे बळी, प्रगत आणि विकसित, दोन्ही कडे पडत आहेत. गेल्या १८ महिन्यांत, मोठ्या संख्येने महाराष्ट्र आणि कर्नाटकात, सुमारे ३.१७ लाख सायबर गुन्हे आणि ५,७७१ FIR एका केंद्रीकृत पोर्टलद्वारे ऑनलाईन नोंदवले गेले असल्याची माहिती नुकतीच लोकसभेला देण्यात आली.

ड्रोन गुन्हेही वाढत आहेत. हवेत उडणारी ही उपकरणे; केवळ लष्करी क्षेत्रांसाठीच नव्हे, तर सामान्य लोकांसाठी देखील मोठी समस्या आहेत. चोरांसाठी घरांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या किंवा कारागृहात ड्रग्जची तस्करी, अश्याकरता ड्रोन वापरल्या जाण्याची शक्यता आहे. भारतात अजूनही उपलब्ध नसलेले होलोग्राम, एखाद्या माणसाची जागा घेऊन, गुन्हे करू शकतात. थोडक्यात, तंत्रज्ञानाच्या प्रगतीत जसे फायदे आहेत तसे, तोटे देखील आहेत.आणि त्यासाठी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांमध्ये, या विषयी योग्य जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

## १०.६ जागतिकीकरण आणि भाषा

जागतिकीकरणामुळे इंग्रजी भाषेचे वर्चस्व वाढले आहे. यामुळे स्थानिक आणि प्रादेशिक भाषांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक भाषांच्या शाळा बंद करण्यात आल्या आहेत ज्याच्यामुळे शिक्षण मिळण्यात एक स्पर्धा तयार झाली आणि भेदभाव निर्माण झाला आहे. आपल्याकडे, एकाच देशात, एकीकडे जिथे, आंतरराष्ट्रीय शाळा, मॅट्रिक्युलेशन शाळा आणि CBSE बोर्डाच्या शाळा आणि विद्यार्थी आहेत; तिथेच नगरपालिका आणि आदिवासी शाळेतले पण विद्यार्थी आहेत. अश्या प्रकारे, विद्यार्थ्यांचा समाजात प्रवेश होण्यापूर्वीच, मूलभूत स्तरावरच विभागणी होते. केवळ महाराष्ट्रातच ४१ BMC शाळा बंद करण्यात आल्या आहेत असे प्रागा फाउंडेशन नावाच्या एका स्वयंसेवी संस्थेने म्हटले आहे. ह्यामुळे २००९-१० च्या तुलनेत, २०१८-१९ मध्ये नवीन विद्यार्थ्यांच्या नोंदणीत ५८.६% आणखीन एका वृत्तपत्राने, किमान ३७ मराठी माध्यमाच्या शाळा BMC ने बंद केल्याचे वृत्त दिले आहे. गरीब आणि दुसऱ्या शाळांत शिक्षण न परवडणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे आणखीन त्रास सहन करावा लागत आहे.

## १०.७ जागतिकीकरण आणि संस्कृति उद्योग

भारतात कधीही उपलब्ध नसलेली अनेक नवीन उत्पादने आज बाजारात दिसतात. यामुळे मोठ्या प्रमाणात लोकसंख्येच्या खाण्याच्या सवयी बदलल्या आहेत. एवोकॅडो, ड्रॅगन फळे, ओट्स, हे पदार्थ आपल्याला आधी माहितही नव्हते. पण आता मात्र हे पदार्थ भारतात आयात किंवा उत्पादित केले जातात आणि अनेक लोक ते चवीने खातात.

१९९४ पूर्वी, भारतातल्या उशिरा आलेल्या औद्योगीकरणामुळे, मोठी लोकसंख्या आणि नवीन व मोठी बाजारपेठ असूनही प्रसाधन उद्योग, खूपच कमी होता. १९९४ सालच्या मिस वर्ल्ड आणि मिस युनिव्हर्स सारख्या सौंदर्य स्पर्धा मुळे, एक प्रचंड अश्या प्रसाधन उद्योगाचा पाया रोवला.

## १०.८ मानववंशशास्त्र आणि जागतिकीकरण यांमधील संबंध

संस्कृतीचा अभ्यास करणारे मानववंश शास्त्रज्ञांसाठी, जागतिकीकरणाची संकल्पना अभ्यासाठी विशेष महत्वाची आहे. उत्क्रांतीवादी मानववंशशास्त्रज्ञांनी विविध समाज समजावून घेण्यासाठी काही सिद्धांत विकसित केले. समाज कसा क्रूरतेपासून सभ्यतेच्या टप्प्यावर आला, किंवा संस्कृती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कशी पसरते हे दाखवण्याचा प्रयत्न या सिद्धांतामुळे झाला. मानववंशशास्त्रज्ञांनी वाढीचे सिद्धांत तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. म्हणूनच, ही पार्श्वभूमी पाहता, जागतिकीकरण,

संकर, प्रवाह आणि सीमा समजून घेणे आजच्या काळात समाजशास्त्र/मानववंशशास्त्राचे विद्यार्थी म्हणून तुमच्यासाठी खूप महत्वाचे आणि गरजेचे आहे.

| **मानववंशशास्त्रीय काळ** | | | | |
|---|---|---|---|---|
| **कालखंड** | **काळ** | **लक्ष वेधून घेणारे** | **प्रभावी नमुने** | **प्रमुख शास्त्रज्ञ** |
| रचनात्मक | १८ वे शतकाचा मध्य | जंगली रानटी सभ्यता | सांस्कृतिक उत्क्रांती | टायलर, फ्रेजर, मॉर्गन |
| क्लासिक | १९०० – १९४५ | आदिम: जमाती आणि त्यांचे सरदार | ऐतिहासिक विशिष्टता, संरचनात्मक कार्यात्मकता | बोवास, मालीनोवोस्की, रॅडक्लीफ – ब्राऊन |
| आधुनिक | १९४५ – १९८० | शेतकरी शहरी झोपडपट्ट्या आणि अविकसित समाज | आधुनिकीकरणाचा सिद्धांत, आणि नंतर अवलंबित्व आणि जागतिक प्रणाली सिद्धांत | वुल्फ, वर्सली, हॅरिस |
| संक्रमणकालीन | १९८० – १९९० | खुद्द मानववंशशास्त्र | अर्थपूर्ण आणि निर्णायक मानववंशशास्त्र; आधुनिकतावाद उत्तर रचनावाद | गीर्ट्स, क्लिफर्ड आणि मार्कस, जेम्सन फोकोल्ट |
| जागतिक | १९९० -- | आंतरराष्ट्रीय, प्रवासी राष्ट्रे, जातीयता | शब्दसंग्रह आणि उत्तर आधुनिकतेची निवडलेली गृहितके | अप्पादुराई, हॅनरेज, फ्राइडमन, कियरनी |

काळानुसार मानवशास्त्रीय क्षेत्र कसे विकसित होत आहे हे वरील तक्ता पाहून कळते. या व्यतिरिक्त, विशिष्ट परंपरेवर वर्चस्व गाजवणारे सिद्धांतवादी/ शास्त्रज्ञ पण दिसतात. पहिला स्तंभ मानववंशशास्त्रीय कालखंड देखील दर्शवितो.

**तुमची प्रगती तपासा:**

१. जागतिकीकरण आणि मानववंशशास्त्र ह्यांच्या परस्पर संबंधांची चर्चा करा**?**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १०.९ जगतिकीकरणाचा आदिवासी लोकसंख्येवर झालेला परिणाम

भारत ब्रिटिशांची वसाहत असतांना, आदिवासी जनतेवर फार जुलूम झाला. काही आदिवासी जमातींना तर गुन्हेगार ठरवले गेले. त्याचा परिणाम असा की त्या जमाती आजही त्या कलंकांना तोंड देत आहेत. रस्ते आणि रेल्वे बांधणी मुळे, पुढे, बाहेरील लोकांना आदिवासींच्या क्षेत्रात प्रवेश दिला, ज्यामुळे अतिक्रमण झाले. आंतरराष्ट्रीय संस्थांनी अर्थसहाय्य केलेल्या धरणांमुळे आदिवासींचे विस्थापन झाले, ते स्वतःच्याच जमिनीवर परके झाले. त्यांच्यासाठी कार्यरत अनेक सामाजिक चळवळी निर्माण झाल्या. जागतिकीकरणामुळे पर्यटन आणि पर्यटक वाढले. विदेशी पर्यटकांच्या गरजा भागविण्यासाठी आणि आदिवासी संस्कृतीचे प्रदर्शन म्हणून चित्रित करण्यासाठी, अनेकदा आदिवासी कलाकृती आणि चिन्हे बदलली जात आहेत.

जागतिकीकरणामुळे आदिवासींच्या स्थानिक भाषेवर देखील परिणाम होतो आहे. विदेशी पर्यटनामुळे आदिवासींच्या सांस्कृतिक पद्धती मध्ये, त्यांच्या राहण्याच्या जंगलात, बाहेरच्या लोकांनी अतिक्रमण केल्याने, फेरबदल होत आहेत.

## १०.१० मानववंशशास्त्रीय संशोधनात जागतिकीकरणाचा प्रभाव

जागतिकीकरणाने मानववंशशास्त्राचे शिक्षण आणि सराव मोठ्या प्रमाणात बदलले. जागतिकीकरणा मुळे अनेक विविध समस्या उदयाला आल्या आहेत. अति स्थलांतर आणि लोकसंख्येचा प्रवाह, जगतिकीकरणामुळे सुलभ झाला आहे, पण त्यामुळे मानववंशशास्त्रज्ञांसाठी पारंपारिक अभ्यासाचा विषय जो मूळ समाज होता तो आता आधुनिक समाज किंवा स्थलांतरित समाज होत आहे.

इतर देशांतील डेटा गोळा करण्यासाठी संशोधनामध्येही इंटरनेटचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो आहे. शब्द, कौशल्ये, शैली, कलाकृती, अगदी संपूर्ण भाषा किंवा धर्माच्या रूपात, समाजांमध्ये संस्कृतीची अदलाबदल होत आहे, संप्रेषण देखील जागतिक बनत चालले आहे. उदाहरणार्थ – अमेरिकेतले हिप हॉप जवळजवळ सर्व देशांमध्ये पसरला आहे. जपानी सुषी हल्ली खूप लोकप्रिय खाद्य पदार्थ झाला आहे, तसेच भारतीय पनीर मसाला, चिकन टिक्का, बिर्याणी जगभर खाल्ले जातात. जागतिकीकरण हे लहान स्तरावरच थांबलेले नसून, त्याचा परिणाम फार मोठ्या स्तरावर होतो आहे. म्हणूनच, उदयोन्मुख समाजांचा अभ्यास करण्याच्या संशोधन पद्धतींमध्ये, संशोधन समस्येचे वास्तव जाणून घेण्यासाठी, सतत बदल करणे आवश्यक आहे. आता संकरितता समजून घेऊ या.

**तुमची प्रगती तपासा**

१. जागतिकीकरणाचा **परिणाम** स्पष्ट करा.

## १०.११ संकरीकरण

संकर, सोप्या शब्दात मिश्रण; म्हणजे दोन वेगळे घटक जेंव्हा एकत्र केले जातात, त्याला संकरीकरण म्हणतात. सुरुवातीला हा शब्द प्राणी आणि वनस्पतींसाठी वापरला जात असे. मात्र  नंतरच्या काळात, स्थलांतर आणि जगतिकीकरणामुळे झालेले दोन संस्कृतींचे मिश्रण, यालाही काही विद्वान सिद्धांतवाद्यांनी संकरीकरण हा शब्द वापरला आहे. भारतीय विद्यमान संस्कृतीच्या संदर्भात पहिले, तर संकरीकरण, जातीय संबंध आणि जातिव्यवस्था यांच्यावर अनेक प्रश्न उद्भवू शकतात. संकर तीन ऐतिहासिक संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे: (अ) एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून वांशिक आणि सांस्कृतिक शब्दसंग्रहांचे मिश्रण व नवीन शब्दसंग्रहाचा उदय; (ब) संकरीकरणाचा ऐतिहासिक पाया कोणता (क) आधुनिक संकरित व्यतीमत्व जिथे भिडते, मुख्यत्वे भाषा आणि संवाद यांच्या मार्गाने.

काही मानववंशशास्त्रज्ञ "संकरीकरणा" ला विविध व्यक्तित्व परस्परसंबंध आणि ओळखीच्या विघटनाकडे जाणाऱ्या गटांमधील कठोर सांस्कृतिक सीमांचे विघटन म्हणून पाहतात. या क्षेत्रातील मानववंशशास्त्र, भिन्न ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अनुभवांच्या आधारे, राजकीय आणि इतर हेतूंसाठी, मानवी व्यक्तीतवे पुनः पुनः कशी निरमिळी गेली, हे दाखवून देते.

मात्र इतर अभ्यासांतून, एका गटाचे स्व-प्रतिनिधित्व आणि व्यक्तीत्वाचे प्रतिपादन — व्यक्तित्व विरोधाभासाने चालतात आणि त्यांना अखंडपणे एकत्रित सर्वसमावेशक सांस्कृतिक संस्था म्हणून समजले जाऊ शकत नाही. उदाहरणार्थ, नेटफ्लिक्स वरील स्वीट टूथ या मालिकेत संकरित मुल दाखवले आहे, ज्यात जन्मजात त्या प्राण्यांचे गुणधर्म असतात.

क्रायडी (2006) असे सांगतात की संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणून संकरीकरण जागतिकीकरणाशी सुसंगत आहे, कारण ते जागतिकीकरणाच्या नियमाला मदत करते, जे स्टुअर्ट हॉलच्या, विविध स्थानिक राजधान्यांद्वारे मांडलेल्या प्रतिपादनाची पुष्टी करते. प्रत्येक संस्कृतीत इतर संस्कृतींचे अंश अस्तित्वात असतात, म्हणूनच परदेशी मीडिया आणि विक्रेत्याना, त्यांच्या वस्तू आणि स्थानिक समुदायामध्ये प्रभावी दुवे निर्माण करण्यासाठी, पार सांस्कृतिक भाग दिले जातात. आपण काही उदहरणा द्वारे समजावून घेऊयात. ही घटना समजून घेण्यासाठी रिॲलिटी टेलिव्हिजन हे एक उत्तम उदाहरण आहे. अमेरिकन आयडॉल, ब्रिटन गॉट टॅलेंट आणि भारतातले इंडियन आयडॉल, हे सर्व एकाच आहे. स्थानिक संस्कृतीला जनसंस्कृतीच्या  माध्यमातून पुढे आणले जात आहे. दुसरे उदाहरण आहे मॅगी नूडल्सचे. भारतीय बाजारपेठेत मॅगीने प्रवेश केला नूडल्स म्हणून, नंतर गव्हाला मैदयापेक्षा अधिक पौष्टिक मानले जात असल्याने, इथे भारतीय मसाल्याचे आटा नूडल्स सारख्या संकरित मॉडेलसह भारतात त्यांनी आपले पाय रोवले. लहान मुलांसाठी दुधाच्या उत्पादनांचे उदाहरण घेऊ. काही बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जाहिरात आणि ब्रँड व्हॅल्यू तयार करून बाजारात मक्तेदारी केली आहे. परिणामी, कोणतीही स्थानिक स्पर्धा नाही

कारण, हा ब्रँड उत्तम आणि अधिक पौष्टिक आहे असे आपल्या मनात बिंबवले जाते. आणि हाच कायदा, आपल्या इतर रोजच्या वापरतल्या अनेक पौष्टिक पेये, शीत पेये, यांवर पण लागू होतो. आपल्या रोजच्या सवयींचे निरीक्षण करून जागतिकीकरणाद्वारे सुधारित केले जात आहे, असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

**तुमची प्रगती तपासा:**

१. संकरीकरण म्हणजे काय हे स्पष्ट करा

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १०.१२ प्रवाह आणि सीमा

व्यापार, वित्त, संस्कृती, कल्पना आणि संप्रेषण व्यापार आणि नवउदारमतवादी भांडवलशाहीच्या वाढत्या प्रवाहामुळे आणि या प्रवाहाशी जुळवून घेणाऱ्या किंवा त्याचा प्रतिकार करणाऱ्यांमुळे समकालीन जागतिकीकरणाचा परिणाम होतो. जागतिकीकरणामुळे कुशल लोक इतर देशांमध्ये स्थलांतरित होतात, ज्याचा परिणाम यजमान देश आणि त्यांचा स्वतःचा देश, अश्या दोघांवरही होतो, असे दिसून येते. इतर देशांतल्या नोकरीच्या विविध संधींमुळे सीमा बदलल्या आहेत. जागतिकीकरण हे राज्याचे हेतू, सीमा आणि सार्वभौम प्राधिकरणाच्या पुनर्रचनेचे उत्पादन आहे हयकडे कोहेन लक्ष वेधून घेतात. याचा परिणाम, अगदी अमेरिकेसारख्या विकसित देशांमध्येही, राज्य सार्वभौमत्वावर आणि स्थलांतर धोरणाच्या पद्धतींवरही झाला आहे. जागतिकीकरणामुळे अर्थिक अभिवृध्दि, वस्तू आणि सेवांची देवाणघेवाण, केवळ यापूरती मर्यादित न राहता, एका देशातून दुसऱ्या देशात विषाणूंचा प्रसारही होत आहे. उदाहरणार्थ, सार्स रोग एक देशात जन्माला आला आणि अनेक देशांत पसरला, तसंच सध्या सुरू असलेली कोविड -१९च्या रोगाची साथ.

माहितीचा प्रवाह शिगेला पोचलेल्या जगत आणि बाजारपेठेत, आपण सध्या रहात आहोत. उदाहरणार्थ, स्वतःच्या वाढदिवसानिमित्त जर कोणी इंटेरनेटवर नवीन कपडे शोधत असेल, तर थोड्याच वेळात त्यांना कुठल्याही इंटरनेटच्या पानावर कपड्यांच्या जाहिराती दिसू लागतात. आज आपण एका डेटा-आधारित जगात आहोत, जिथे माहितीची देवाणघेवाण करणे सोपे आहे. विविध कंपन्या आपला डेटा साठवतात आणि त्यांनी तयार केलेली उत्पादने आपल्याला दाखवतात, जेणेकरून आपण ती उत्पादने विकत घेऊ शकू. हे इंटेरनेटवर सर्फिंग करतांना अनेकदा घडते. आणि म्हणून, जर आपण आपल्या सुरक्षेबाबत सावध राहिलो, तर किमान वैयक्तिक स्तरावर मोठे घोटाळे रोखता येतील.

विविध देशांमध्ये प्रामुख्याने तीन प्रकारचे प्रवाह पाहिले जाऊ शकतात. पहिला व्यापाराचा प्रवाह. दुसरा मानवी भांडवल आणि तिसरा गुंतवणुकीचा प्रवाह. या तीन पैकी, मानवी भांडवल ही एक मोठी मालमत्ता आहे जी, ज्याच्याकडे आहे, त्याच्यासाठी बऱ्याच

समस्या निर्माण करू शकते. ९०च्या दशकाच्या सुरुवातीला आणि आजही, भारतातून अनेक कुशल डॉक्टर, परिचारिका, अभियंते, शास्त्रज्ञ, यांनी इतर देशांत स्थलांतर केले. परिणामी, भरता सारखे देश  महत्त्वाची संसाधने गामावतात ज्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल घडू शकतात.

जागतिकीकरणामुळे भांडवलाचा मुक्त प्रवाह होत आहे. त्याचबरोबर बेकायदेशीर आर्थिक प्रवाहासारख्या इतर समस्या देखील आहेत. चला याचा तपशीलवार विचार करूया.

अवैध आर्थिक प्रवाह अर्थात illicit financial flows (IFFs) हयात विवध प्रकारच्या अवैध आर्थिक प्रवाह, जसे पैश्यांचा गैरव्यवहार, कर किंवा बाजारपेठेचा घेतलेला फायदा यांचा समावेश आहे.

उत्पन्नाची अवैध सावकारी मध्ये खालील गोष्टी समाविष्ट आहेत

- संघटित गुन्हेगारी बाजार (जसे की अंमली पदार्थ)
- भ्रष्टाचार (जसे की फसवणूक करून जमा केलेला निधी)
- कर गैरवर्तन (जसे की कर चुकवण्यासाठी चुकीची माहिती देणे )
- बाजाराचा गैरवापर (जसे की आंतरिक व्यापार)

अवैध आर्थिक प्रवाह हा शब्द जरी १९९०च्या दशकात उदयास आला, तरी २००० च्या दशक्यताच लोकप्रिय झाला

IFFs अनेक प्रकारे असमानतेचे पुनरुत्पादन करतात. प्रथमतः IFFs  कमी कार्यक्षम आर्थिक परिणाम, गरीबी कमी करण्याचे दर आणि अधिक भाडे मागणारे वर्तन. यांच्याशी निगडीत आहे. दुसरे म्हणजे, IFFs राज्याची विकास आणि विशेषतः राज्य-उभारणीसाठी आवश्यक महसूल कमवण्याची क्षमता कमी करतात.

तिसरे, IFFs सहसा राज्याचा पाडाव करण्याशी आणि संस्थात्मक गुणवत्ता बिघडण्याशी संबंधित असतात. चौथे, IFFs चा सर्वात जास्त "मागे राहिलेल्या" नागरिकांवर वाईट प्रभाव पडतो, कारण गरीब देशांमध्ये भ्रष्टाचार आणि संघर्ष दोन्ही सुलभ होऊन जातात.

आपण सध्या जागतिकीकरणाच्या प्रगत अवस्थेत आहोत, ज्याचा आपल्या जीवनातील जवळजवळ सर्व क्षेत्रांवर परिणाम झाला आहे. ई -कॉमर्स, परदेशी भांडवल, अन्न, शिक्षण इत्यादी या संगळ्यांवर परिणाम झालेला आहे. इथे एक महत्त्वाचा प्रश्न विचारला पाहिजे; जागतिकीकरणाने एक नवीन सीमाविरहित जग निर्माण केले आहे का? आणि जगतिकीकरणामुळे विषमतेचे एक नवीन रूप निर्माण झाले आहे का?

**तुमची प्रगती तपासा:**

१. जागतिकीकरणा च्या प्रगत माहिती प्रवाह स्पष्ट करा

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १०.१३ सारांश

या धड्यात आपण जागतिकीकरणाला समजून घेण्यापासून सुरुयायत केली; जसे व्यापार, संस्कृती आणि उत्पादनांची देवाणघेवाण इत्यादि. त्यानंतर, आपण एका विभागाची गरज शिकलो, जसे आधी मानववंशशास्त्रज्ञ सोप्या समाजांचा अभ्यास करत होते परंतु चित्र बदलले आहे. तसेच आदिवासी समाजांवर मोठ्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा काय परिणाम होतो हे पहिले. संकरीकरणाचा अर्थ शोधला आणि चर्चा केली. संकरीकरण भाषा, रीतिरिवाज, कपड्यांच्या सवयी इत्यादी कोणत्याही क्षेत्रात लागू केले जाऊ शकते. आपण तंत्रज्ञानाचा प्रवाह, कुशल लोक, जे जागतिकीकरणामुळे सीमा ओलांडत आहे त्याबद्दल देखील शिकलो.

## १०.१४ प्रश्न

- जागतिकीकरणाचा इतिहास आणि शहरांवर झालेला परिणाम यावर थोडक्यात चर्चा करा
- संकरीकरणाची संकल्पना आणि अवैध भांडवलाचा प्रवाह स्पष्ट करा
- मानववंश शास्त्रावर जागतिकीकरणाच्या प्रभावाची चर्चा करा.
- जागतिकीकरणाचा भाषा आणि तंत्रज्ञानावर होणारा परिणाम स्पष्ट करा

❖❖❖❖

# ११

# सांस्कृतिक अध्ययन (CULTURAL STUDY)

**शिवाजी तुकांडे**

**घटक रचना**

११.० उद्दिष्टे
११.१ प्रस्तावना
११.२ संस्कृती समजून घेणे
११.३ संस्कृतीची वैशिष्ट्ये
११.४ सांस्कृतिक अध्ययनाचे मूळ
११.५ संस्कृती अध्ययनाचा अर्थ समजून घेणे
११.६ सांस्कृतिक अध्ययनाची वैशिष्ट्ये
११.७ सांस्कृतिक अध्ययनाच्या पद्धती
११.८ सांस्कृतिक अध्ययनातील मुख्य संकल्पना.
    ११.८.१ लोकप्रिय संस्कृती
    ११.८.२ संस्कृती उद्योग
    ११.८.३ लोकसंस्कृती आणि मौखिक इतिहास
    ११.८.४ संस्कृती आणि प्रतीकात्मक सराव
    ११.८.५ प्रतिनिधित्व
११.९ वर्चस्व आणि सांस्कृतिक अध्ययन
११.१० स्त्रीवाद आणि सांस्कृतिक अध्ययन
११.११ भारतातील सांस्कृतिक अध्ययन.
११.१२ सारांश
११.१३ प्रश्न
११.१४ संदर्भ

## ११.० उद्दिष्टे

- सांस्कृतिक अध्यनाचा अर्थ आणि उदय यांची ओळख करून घेणे
- सांस्कृतिक अध्ययनाचा उदय होण्यामागील ऐतिहासिक संदर्भ समजून घेणे.
- सांस्कृतिक अध्ययनाशी संबंधित मुख्य संकल्पना जाणून घेणे.

## ११.१ प्रस्तावना

मानवशास्त्राचा विद्यार्थी म्हणून, आपण अनेक कारणांमुळे संस्कृती अध्ययनांचा अभ्यास करत आहात. आपली सांस्कृतिक मानवशास्त्र ही उपशाखा समजून घेण्याच्या दिशेने एक नवीन दृष्टीकोन देण्यास मदत होईल. असे अनेक विषय आहेत ज्यांना सांस्कृतिक अध्ययन स्पर्श करतात, उदा. लोकप्रिय संस्कृती, उच्च संस्कृती, कनिष्ठ संस्कृती, संस्कृती उद्योग जे समजून घेऊ शकता आणि आपल्या संशोधनात वापरू शकता. हे विषय आणि संकल्पना तुमच्या आकलनास मदत करतील, तुम्हाला तुमच्या स्वतःच्या जीवनातील अनुभवांवर प्रतिबिंबित करण्यास मदत करतील आणि सर्वसाधारणपणे आपला समाज अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करतील.

प्रस्तुत प्रकरण हे 70 + वर्षांच्या ज्ञानशाखेचा परिचय देत आहे. इंग्रजी साहित्य, मास मीडियाच्या विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक अध्ययन हा विषय म्हणून शिकवला जातो. भारतातील अनेक विद्यापीठांमध्ये हा स्वतंत्र अभ्यासक्रम/प्रवाह म्हणून शिकवला जातो, तेजपूर विद्यापीठ आसाम मध्ये एम.ए आणि संस्कृती अभ्यासामध्ये, पीएच.डी, आहे.टाटा इंस्टीट्यूट ऑफ सोशल सायन्समध्ये एम.ए साठी मीडिया आणि सांस्कृतिक अभ्यास हा विषय स्वीकारला आहे. इंग्रजी आणि परदेशी भाषा विद्यापीठ, हैदराबाद आणि जगातील अनेक देशांमध्ये हा विषय शिकवला जातो. मानवशास्त्रीय, सांस्कृतिक अभ्यासावर पुरेसे साहित्य नाही. तर, येथे आपण केवळ सांस्कृतिक अभ्यासावर अधिक चर्चा करणार आहोत. या अध्यायाचा फायदा असा आहे की आपल्याला सांस्कृतिक अभ्यासाद्वारे आंतरविद्याशाखीय विषयांची ओळख करून दिली जात आहे

## ११.२ संस्कृती समजून घेताना

संस्कृती अध्ययने समजून घेण्याआधी, आपण संस्कृती म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. Culture हा शब्द लॅटिन मधील मूळ colere या शब्दापासून पुढे येतो.त्याचा अर्थ राहणे, शेती करणे किंवा सन्मान करणे असा होतो, सामान्यत: मानवी क्रियाकलापांचे नमुने आणि अशा क्रियाकलापांना महत्त्व देणारी प्रतिकात्मक रचना यांचा संदर्भ ही संकल्पना देते. मानवशास्त्रज्ञ सामान्यतः "संस्कृती"ही संज्ञा सामान्य मानवी क्षमतेचे वर्गीकरण, संकेतिकरण आणि त्यांच्या अनुभवांचे प्रतीकात्मक संप्रेषण करण्यासाठी वापरतात

**एडवर्ड बी टायलर**ने संस्कृतीची व्याख्या केली" संस्कृती ही एक अशी संकीर्ण समग्रता आहे की ज्यात ज्ञान,श्रद्धा,कला,नीती,कायदा,रूढी या व अश्याच इतर पात्रतांचा व सवयीचा समावेश होतो आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सदस्य या नात्याने संपादित केलेल्या असतात. दुसऱ्या शब्दांत, संस्कृती शेतीसारख्या वाढीशी संबंधित आहे, ज्याद्वारे पिकांची लागवड केली जाते.

## ११.३ संस्कृतीची वैशिष्ट्ये

1. **संस्कृती शिकली जाते आणि संपादित केली जाते -** संस्कृती प्राप्त होते कारण विशिष्ट वर्तणूक एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेली जाते. व्यक्तींना त्यांच्या पालकांकडून काही गुणांचा वारसा मिळतो. सामाजिक-सांस्कृतिक नमुने कुटुंबातील सदस्य, तात्काळ वर्तुळ, समाज ज्यामध्ये एखादी व्यक्ती वाढते त्यातून शिकली जाते. अशा प्रकारे, हे दर्शविले जाऊ शकते की मानवाची संस्कृती ते ज्या भौतिक आणि सामाजिक वातावरणात कार्य करतात त्याद्वारे प्रभावित होते.

2. **संस्कृती लोकांच्या गटाद्वारे सामायिक केली जाते –** एखादा विचार किंवा कृतीला संस्कृती म्हटले जाऊ शकते जर ते लोकांच्या गटाने सामायिक केले असेल आणि त्यावर विश्वास ठेवला असेल आणि त्यानुसार कृती केली असेल तर.

3. **संस्कृती संचयी आहे -** एका पिढीने शिकलेले ज्ञान वेळोवेळी दुसऱ्या पिढीला दिले जाते. पुढची पिढी त्यांचे काही निरीक्षण, सर्जनशीलता आणि पुढे जोडते; त्यात सुधारणा केली जाते. म्हणून आपण याला संचयी म्हणू शकतो. उदाहरणार्थ - जर तुम्हाला वडिलोपार्जित मालमत्ता मिळाली असेल. तुम्ही पुढे घर रंगवू शकता, सजवू शकता, काही बदल करू शकता आणि ते तुमच्या भावंडांना किंवा कुटुंबातील सदस्यांना देऊ शकता. पुढे, ते काही बदल करतील जसे की रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम, एअर कंडिशनर, काहीतरी नवीन बदल आणि ते पुढे नेले जाते.

4. **संस्कृती परिवर्तन -** जसे आपण पाहू शकतो, बदल आणि भर संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. म्हणून, संस्कृती कधीही स्थिर नसते; काही छोटे बदल आहेत. साधारणपणे, विशिष्ट समाजासाठी उपयुक्त नसलेले पैलू टिकत नाहीत;असे असले तरी, समाजाच्या निरंतरतेसाठी आवश्यक असलेले काही विधी आणि प्रथा चालू आहेत. उदाहरणार्थ- पूर्वीच्या काळात लग्न हे काही दिवसांसाठी होत असे, गावांमध्ये वार्षिक सण एकत्र दिवसांसाठी होत असत आता ते बदलून 3-4 तासांचे प्रसंग म्हणून करण्यात आले आहे. प्रक्रिया बदलली आहे. मात्र, ते सुरूच आहे.

5. **संस्कृती गतिशील आहे -** संस्कृती काळानुसार विकसित होत राहते, आणि ती प्रवाही सुद्धा असते.

6. **संस्कृती आपल्याला मानव बनवते -** प्राण्यांमध्ये त्यांच्यामध्ये एक अंतःप्रेरणा असते. जर तुम्ही कोंबडी जन्माला येताच त्याचे निरीक्षण केले असेल, तर ते खाण्यासाठी किडे, कीटक शोधत राहते. मानवांमध्ये, शिक्षण हे दीर्घ काळासाठी असते उदा, कॉलेज, शाळा,

7. **संस्कृती वैचारिक आहे -** हे मानदंड म्हणून उभे आहे ज्याद्वारे व्यक्तींने पालन करणे अपेक्षित आहे.

**स्टुअर्ट हॉल**साठी, संस्कृतीमध्ये सुशिक्षित - शास्त्रीय संगीत किंवा ललित कला यासारख्या गोष्टींचा समावेश नसतो. हे आहे, फक्त, "अनुभव जगला, अनुभवाचा अर्थ लावला, अनुभव परिभाषित केला." आणि हे आपल्याला जगाबद्दल गोष्टी सांगू शकते, असा त्यांचा विश्वास होता, की केवळ राजकारणाचा किंवा अर्थशास्त्राचा अधिक पारंपारिक अभ्यास करू शकत नाही. हॉलसाठी संस्कृती ही 'वाटाघाटी साठी देखील एक जागा आहे.

भाषा अधिग्रहणावरील प्रगत संशोधन केंद्र एक पाऊल पुढे जाते, संस्कृतीला आचरण आणि परस्परसंवादाच्या सामायिक नमुन्यांची, संज्ञानात्मक रचना आणि सामाजिकीकरणाने शिकलेली समज म्हणून परिभाषित करते. अशा प्रकारे, गटासाठी अद्वितीय सामाजिक नमुन्यांद्वारे वाढवलेल्या गट अस्मितांची वाढ म्हणून हे पाहिले जाऊ शकते. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, आता आपण सांस्कृतिक अभ्यासाचा तपशीलवार विचार करूया.

## ११.४ सांस्कृतिक अध्यनांचा उदय

सांस्कृतिक अभ्यास हे एक आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे जे संस्कृतीला आकार देणाऱ्या सामाजिक संस्थांच्या भूमिकेशी संबंधित आहे. सांस्कृतिक अध्यायने ब्रिटनमध्ये 1950 च्या उत्तरार्धात उदयास आली आणि त्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर, विशेषत: युनायटेड स्टेट्स आणि ऑस्ट्रेलियामध्ये पसरली . रिचर्ड हॉगार्ट, स्टुअर्ट हॉल आणि रेमंड विलियम्स सारख्या विद्वानांनी बर्मिंगहॅम विद्यापीठात Center for Contemporary Cultural Studies या केंद्राची स्थापना केली. त्यावेळेस पासून खऱ्या अर्थाने सांस्कृतिक अध्यनांची ओळख झाली. सांस्कृतिक अभ्यास नंतर अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये एक सुस्थापित क्षेत्र बनले. तेव्हापासून समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहासलेखन, साहित्यिक टीका, तत्त्वज्ञान आणि कला समीक्षेवर त्याचा प्रभाव आहे., वंश,प्रजातीकता, वर्ग, लिंगभाव आणि सांस्कृतिक ज्ञानाचे उत्पादन ही त्याची प्रमुख क्षेत्रे आहेत. दुसऱ्या शब्दांत, ते आंतर-विद्याशाखीय विषयाच्या दृष्टीकोनातून संस्कृती अभ्यासाबद्दल बोलते.

या ज्ञानशाखेची निर्मिती संस्थापिकांसाठी सोपी नव्हती. स्टुअर्ट हॉल यांनी बर्मिंगहॅम विद्यापीठात समाजशास्त्र विभागासारख्या इतर विभागांना सहकार्य करण्यासाठी आणि आंतर-विद्याशाखीय मार्गाने कार्य करण्यासाठी पत्रे लिहिली. मात्र, त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. आंतर-विद्याशाखीय जे आज सामान्य म्हणून स्वीकारले गेले आहे ते नंतर कठीण होते. सांस्कृतिक अभ्यासाचा इतिहास साहित्यिक टीकेसह पाहता येतो. रेमंड विल्यम्स आणि रिचर्ड हॉगार्ट यांनी साहित्यावर लेव्हीसाइट भर विकसित केला. दुसऱ्या शब्दांत, सामाजिक मूल्यमापन, परंतु नंतर त्यांनी त्यांचे लक्ष साहित्यापासून दैनंदिन जीवनात वळविले.

## ११.५ संस्कृती अभ्यासाचा अर्थ समजून घेणे

संस्कृती अभ्यास, दुसऱ्या शब्दांत, संस्कृतीच्या रचनेमागील राजकारणाबद्दल बोलते. संस्कृती निर्माण करण्याची शक्ती कोणाची आहे, ती कशी निर्माण केली जाते आणि ग्राहक असे प्रश्न विचारतात. पारंपारिकपणे, श्रीमंतांची संस्कृती उच्च म्हणून पाहिली गेली आणि अभ्यासली आणि चर्चा केली गेली. सांस्कृतिक अभ्यासामुळे दबलेल्या जनतेची संस्कृती आणि त्याची जटिलता लक्षात येते आणि उच्च आणि अभिजात संस्कृतींच्या संकल्पनांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

संस्कृती अभ्यासाचे संस्थापक इटालियन मार्क्सवादी विद्वान ग्राम्सीने प्रेरित केले होते, जे उपेक्षित गटांवर भांडवलदार गटांच्या सांस्कृतिक वर्चस्वाबद्दल बोलले. भांडवलदारांच्या वर्चस्ववादी कल्पना खालच्या आणि उपेक्षित वर्गाला विकल्या जात आहेत. ही प्रक्रिया इतकी संथ आहे की एखाद्याच्या लक्षात येत नाही. त्याचप्रमाणे, अनेक हानिकारक उत्पादने, जी भांडवलदारांनी तयार केलेली उत्पादने आहेत, त्यांना परवडत नसलेल्या लोकांसाठी सवयीची बनवली जात आहे. ही भावना आहे जी लोकांना विकली जात आहे.

बेकर यांनी नमूद केले की संस्कृती अभ्यासाचा विषय गृहित धरले जाणारे वर्तन, धुरीनत्व  (शक्ती), संस्कृती रचना याबद्दल बोलतो. काही गोष्टी कशा स्वीकारल्या जातात आणि त्या का चालवल्या जातात आणि काही गोष्टी कशा बाजूला असतात. जे शक्तिशाली गट मीडियावर नियंत्रण ठेवतात आणि निर्णयांवर प्रभाव टाकतात आणि उपेक्षित गटांवर परिणाम करतात. सांस्कृतिक अभ्यासामध्ये देखील काही दृष्टिकोन आहेत, जसे की प्रघटनाशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र, संरचनावाद आणि चिकित्सा सिद्धांत.

संस्कृतीमध्ये विविध क्रियाकलाप, विश्वास, संस्था आणि सामाजिक रचनांद्वारे अर्थ कसा निर्माण होतो, वितरीत केला जातो आणि तयार केला जातो हे समजून घेण्याचा सांस्कृतिक अभ्यासाचा हेतू आहे. सभ्यता किंवा समाजातील काही वस्तू कशा अर्थ आणि मूल्य मिळवतात हे ते दर्शवते. अशा प्रकारे सांस्कृतिक अभ्यास समाजाच्या विविध कला, विश्वास, संस्था आणि वर्तन यांचा अभ्यास करण्यासाठी समर्पित आहेत. **हबीब** यांच्या म्हणण्यानुसार, सांस्कृतिक अभ्यासाचे लेबल असलेले बरेच काही "मार्क्सवाद, संरचनावाद, नवीन इतिहासवाद, स्त्रीवाद आणि उत्तर –वसाहतवाद यासारख्या इतर असंख्य शीर्षकांमध्ये सहजपणे वर्गीकृत केले जाऊ शकते." सांस्कृतिक अभ्यासाचा संबंध केवळ संस्कृतीच्या अभ्यासाशीच नाही तर प्रतीकात्मक स्वरूपाद्वारे आणि अर्थपूर्ण कृत्यांद्वारे अर्थ तयार करणे तसेच या पद्धतींचा व्यक्तिनिष्ठतेवर होणारा परिणाम देखील आहे.

## ११.६ सांस्कृतिक अभ्यासाची वैशिष्ट्ये

१. सांस्कृतिक अभ्यास सांस्कृतिक पद्धती आणि सत्तेशी त्यांचा संबंध समजून घेण्याचा प्रयत्न करतात. येथे ध्येय शक्ती संबंध उघड करणे आणि हे संबंध सांस्कृतिक पद्धतींना कसे प्रभावित करतात आणि आकार देतात हे दर्शवणे आहे.

२. सांस्कृतिक अभ्यासाचा उद्देश संस्कृतीला समग्रतेने समजून घेणे आणि ज्या सामाजिक आणि राजकीय संदर्भात ती कार्य करते त्याचे विश्लेषण करणे.

३. सांस्कृतिक अभ्यासातील संस्कृती नेहमी दोन कार्ये करते: अभ्यासाचा उद्देश आणि राजकीय टीका आणि कृतीचे स्थान.

४. सांस्कृतिक अभ्यास ज्ञानाच्या क्षेत्रात जटिलता आणण्याचा प्रयत्न करतात.

५. हे आधुनिक समाज आणि त्याच्या रचनेचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करते.

## ११.७ सांस्कृतिक अभ्यासाच्या उपयोजनाच्या पद्धती -

१. संकेत, चिन्हे, मजकूर यांचे निरीक्षण करा
२. ते निसंकेत करण्याचा प्रयत्न करा.
३. ते कसे दर्शविले जाते ते पहा.

**तुमची प्रगती तपासा**
1. सांस्कृतिक अभ्यासाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा?
2. सांस्कृतिक अभ्यासाच्या उत्पत्तीबद्दल थोडक्यात लिहा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ११.८ सांस्कृतिक अभ्यासामध्ये अनेक मुख्य संकल्पना

**११.८.१ लोकप्रिय संस्कृती -** स्टुअर्ट हॉलच्या म्हणण्यानुसार, "लोकप्रिय संस्कृती ही अशा जागापैकी एक आहे जिथे शक्तिशाली लोकांच्या संस्कृतीसाठी आणि त्यांच्या विरोधात संघर्ष केला जातो: त्या संघर्षात जिंकणे किंवा गमावणे हाही भाग असतो. स्टुअर्ट हॉल युक्तिवाद करतात की . "हे संमती आणि प्रतिकार क्षेत्र आहे." उदाहरणार्थ - युरोपात विद्यार्थी चळवळीने जीन्स परिधान करणे हे ब्लेझर्स आणि टाय आणि सुबकपणे पॉलिश केलेले शूज परिधान करण्याच्या प्रबळ प्रथेविरुद्ध प्रतिकार होते.

**११.८.२ संस्कृती उद्योग –** "संस्कृती उद्योग" हा शब्द **थिओडोर ॲडोर्नो आणि मॅक्स हॉर्कहायमर** यांनी दिला होता. त्यांचा असा विश्वास होता की प्रसार माध्यमांचा लोकांवर नकारात्मक परिणाम होतो. त्यांच्या मते, जाहिराती आणि चित्रपटांद्वारे नागरिक त्यांचे वास्तव विसरतात आणि त्यामुळे सहजपणे हाताळले जातात. निर्णायक कल्पना, जाहिरात उत्पादने आणि सारसूत्र किंवा समस्यांकडे दुर्लक्ष करून संप्रेषण करून शक्ती वापरण्यात प्रसार माध्यमांची प्राथमिक भूमिका होती . उदाहरणार्थ - एरेटेड ड्रिंक्स मानवी शरीरासाठी निरोगी नाहीत. तथापि, हे अशा प्रकारे विकले गेले आहे की ते पिणे आपल्याला मस्त वाटते. अशाच प्रकारे आहार उत्पादने देखील उपलब्ध आहेत.

**११.८.३ लोकसंस्कृती आणि मौखिक इतिहास -** लोकसंस्कृती साधारणपणे शेतकरी समाजाशी निगडीत असते. ही लोकसंख्येच्या मुळांशी जोडलेली संस्कृती आहे, उदाहरणार्थ - नीतिसूत्रे, कोडे, कविता, मौखिक इतिहास, लोकगीते. ही गाणी गावातील सण (पत्रा) दरम्यान वाचली जातात. त्यात नायकांच्या कथा, महाकाव्य, पौराणिक पात्रांचा समावेश आहे. कित्येक वेळा ही मौखिक गाणी पाठ केली जातात आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला दिली जातात. ते क्वचितच नोंदवले जाते; म्हणून ही गीते पाठ्यपुस्तके आणि संदर्भ पुस्तकांच्या मुख्य प्रवाहातील ऐतिहासिक साहित्यात उपेक्षित आहेत. जागतिकीकरण वेगवान प्रसार माध्यमांच्या हस्तक्षेप आणि टेलिव्हिजनद्वारे या गाण्यांना पुन्हा सिमांतीक करते.

**११.८.४ संस्कृती आणि महत्वाचे उपक्रम -** हॉलने म्हटल्याप्रमाणे, 'संस्कृतीनुसार, येथे माझा अर्थ कोणत्याही विशिष्ट समाजाच्या पद्धती, प्रतिनिधित्व, भाषा आणि चालीरीतींचा वास्तविक भूभाग आहे.

**११.८.५ प्रतिनिधित्व-**सांस्कृतिक अभ्यास प्रतिनिधीत्वाच्या प्रश्नांवर केंद्रित असतात, जसे की जग सामाजिकरित्या कसे संरचित केले जाते आणि अर्थपूर्ण मार्गाने आपल्याकडे आणि त्याचे प्रतिनिधित्व केले जाते.

**तुमची प्रगती तपासा**

1. संस्कृती उद्योग स्पष्ट करा?
2. लोकसंस्कृती आणि मौखिक इतिहास स्पष्ट करा?

## ११.९ स्त्रीवाद आणि सांस्कृतिक अभ्यास

1970 आणि 1980 च्या दशकात बर्मिंगहॅम मधील समकालीन सांस्कृतिक अभ्यास केंद्रात, स्त्रीवादी सांस्कृतिक अभ्यास विकसित झाला. हे बहु-विद्याशाखीय, बहु-सांस्कृतिक क्षेत्र बनण्याचे उद्दीष्ट आहे. या क्षेत्राने जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, कॅनडा,

ऑस्ट्रेलिया सारख्या विविध देशांच्या विद्वानांचे लक्ष वेधले. वेगवेगळ्या राजकीय दृष्टिकोनातूनही या कृती होत्या. रंगाच्या स्त्रिया, मार्क्सवादी-स्त्रीवादी, निर्वासित महिला, उत्तरवसाहतीक , लेस्बियन अभ्यास, उत्तरसंरचनावाद, मनोविश्लेषण, समाजशास्त्र, वैद्यकीय विज्ञान इत्यादी.स्त्रीवाद आणि सांस्कृतीक अध्ययनांच्या अभ्यासासाठी विभिन्न पद्धतीशास्त्राचा अवलंब सुद्धा करण्यात आला.

## ११.१० धुरीनत्व आणि सांस्कृतिक अभ्यास

सांस्कृतिक अभ्यास अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, आपल्याला धुरीनत्वाच्या संकल्पनेबद्दल देखील शिकण्याची आवश्यकता आहे. कल्चरल स्टडीज फाउंडेशन स्कूलने ही संकल्पना वापरली आणि या संकल्पनेच्या निर्मात्यावरही त्याचा प्रभाव पडला. **अँटोनियो ग्राम्सी** ही अशी व्यक्ती आहे जी संकल्पनेच्या निर्मितीशी संबंधित आहे. ते इटालियन मार्क्सवादी विद्वान होते. जेव्हा त्याला तुरुंगात टाकण्यात आले, तेव्हा त्याने या संकल्पनेबद्दल **प्रिजन नोटबुक** या पुस्तकात लिहिले. धुरीनत्व हे एका गटाचे दुसऱ्यावर वर्चस्व असते, जे सहसा नियम आणि कल्पनांना वैध ठरवते. हेजेमोनी ही ग्रीक संज्ञा हेजीमोनिया ("वर प्रभुत्व") पासून आली आहे, जी शहर-राज्यांमधील संबंधांचे वर्णन करते. ग्रामसीच्या धुरीनत्वाची चर्चा अत्यंत प्रगत पाश्चात्य देशांमध्ये भांडवलशाही राज्याचे अस्तित्व समजून घेण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनंतर झाली. एक धुरीण वर्ग इतर सामाजिक शक्तींची सहमती मिळवू शकतो आणि या सहमतीची धारणा एक चालू प्रकल्प आहे. या सहमतीला सुरक्षित करण्यासाठी एका गटाला उत्पादन पद्धती, तसेच इतर गटांच्या प्रेरणा, आकांक्षा आणि हितसंबंधांच्या संबंधात त्याचे हित समजून घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या शब्दांत,धुरीनत्व म्हणजे एका शक्तिशाली गटाद्वारे व्यक्तींवर नियंत्रण. हे नियंत्रण अशा संथ, निष्क्रीय प्रक्रियेद्वारे आहे की प्रतिस्पर्ध्याला हे समजत नाही की ते शक्तिशाली लोकांद्वारे नियंत्रित किंवा हाताळले जात आहेत. उदाहरणार्थ - आजच्या काळात लोक चैनीवर खर्च करतात. लक्झरी मिळवणे हे प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते. वर्गाला बहुसंख्यांकडून आदर आणि मूल्य दिले जात आहे आणि ते प्राप्त करणे हे मोठ्या लोकसंख्येचे ध्येय आहे. भांडवलदार या कल्पना सिमांतीक समुहांना विकत आहेत. यामुळे उपेक्षित गट अनेकदा असंतुष्ट होतात. उपभोक्तावादी वर्तन हे देखील याचे प्रतिबिंब आहे. लोक बरीच उत्पादने ऑनलाईन किंवा मॉलमध्ये खरेदी करतात कारण ती स्वस्तात उपलब्ध असतात; तथापि, त्यांच्याकडे एक उपयुक्तता नसेल. स्मार्टफोन हे आणखी एक उदाहरण आहे ज्याद्वारे लोकांना त्याचे व्यसन लागले आहे, तरीही ते त्याचे उपयुक्तता मूल्य म्हणून वेगळे करू शकत नाहीत.

**तुमची प्रगती तपासा**

१. स्त्रीवाद आणि सांस्कृतिक अभ्यास स्पष्ट करा?

२. सांस्कृतिक अभ्यासाबाबत धुरीनत्वाची संकल्पना स्पष्ट करा?

## ११.११ सांस्कृतिक अध्ययने आणि भारत

विविधतेमुळे भारतामध्ये विविध अभ्यास, स्तर, परिमाण आणि पैलूंमधून सांस्कृतिक अभ्यास केला जाऊ शकतो. वर्ग, जात, डिजिटलायझेशन, भाषा, तंत्रज्ञान, बॉलिवूड, चित्रपट उद्योग, रिअलिटी शो, इलेक्ट्रिक वाहने आणि उद्योग हे संस्कृती आणि पदानुक्रमावर परिणाम करतात. भारतात, कधीकधी, आपल्याकडे 18 व्या शतकातील पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या विचारांशी संबंधित व्यक्ती देखील असतात. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला विद्यापीठ शिक्षण मिळू शकते परंतु तरीही हुंडा, बालविवाह, जात श्रेष्ठता, अंधश्रद्धा इत्यादी अस्वास्थ्य पद्धतींचे पालन करू शकते, म्हणून सांस्कृतिक अभ्यासाचे दस्तऐवजीकरण करणे आणि समजून घेणे एक जटिल काम आहे. तथापि, विविध मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, साहित्य विद्यार्थ्यांनी याचे स्वतंत्र अभ्यास केले आहेत.

## ११.१२ सारांश

या प्रकरणात, आपण संस्कृती समजून घेऊन सुरुवात केली आणि नंतर सांस्कृतिक अध्यायने नावाच्या विद्याशाखेची ओळख करून घेतली. हा विषय प्रामुख्याने संस्कृतीचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतो, एखाद्या विशिष्ट समाजात त्याचे प्रतिनिधित्व कसे केले जाते, त्याची गुंतागुंत आणि त्याच्या शक्तीचे पैलू. आम्ही संस्कृती उद्योग, लोकप्रिय संस्कृतीसारख्या अनेक प्रमुख संकल्पनांचा अभ्यास केला, ज्या संकल्पना प्रभूत्व गटांची संस्कृती जनतेला कशी विकली जात आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करतात. मुळात, सांस्कृतिक अभ्यासाची ओळख बर्मिंगहॅम विद्यापीठातील समकालीन सांस्कृतिक अभ्यास केंद्र (1964)ची स्थापना ही रिचर्ड हॉगार्ट, स्टुअर्ट हॉल आणि रेमंड विल्यम्स सारख्या विद्वानांनी केली होती. सांस्कृतिक अभ्यास हा एक आंतरविद्याशाखीय विषय आहे ज्याने जगभरात परिणाम केला आहे. आपण स्त्रीवाद आणि भारतीय संदर्भातील सांस्कृतिक अध्ययनाबद्दल देखील शिकलो.

## ११.१३ प्रश्न

१. सांस्कृतिक अभ्यासाचे अर्थ आणि उदय याची चर्चा करा.

२. खालील संकल्पना स्पष्ट करा -

अ. लोकप्रिय संस्कृती ब. संस्कृती उद्योग. क लोकसंस्कृती.

## ११.१४ संदर्भ


१. Rege sharmila, Conceptulising Popular Culture, Lawani and Powada in Maharashtra, EPW,16 March 2002, Page 1038-1047.

२. रेगे शर्मिला,लोकप्रिय संस्कृती व भारतातील आधुनिकता : लिंगभाव परिप्रेक्ष्यातून, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, 2009


❖❖❖❖